# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ — अकोला, रविवार ता० २ माहे सप्तंबर सन १८७७ इ० — अंक ३५

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साळअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ८४ |
| डांकहांशील | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.

---

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८४ |
| ,, दुसरे खेपेस | ८२ |

---

## जाहिरात.

### नोंदण्याचा कायदा.

ह्मणजे

**सन १८७७ चा आक्ट ३.**

**ह्यावर विशेष समजूत, आणि मुंबई, मद्रास, कलकत्ता व वायव्य प्रांत येथील हायकोर्टांचे फैसले व प्रिव्हि कौन्सिलचे फैसले ह्यांचा सारांश व निवाड्यास परस्पर हवाले.**

प्रत्येक कामाखालीं दिले आहेत. प्रारंभीं उपोद्घातांत सदर्हू आक्ट संबंधी फार उपयुक्त माहिती दिली आहे. हा ग्रंथ रा. रा. त्र्यंबकटराव रामचंद्र वकील यानीं केला आहे. याची किंमत १८८ व टपाल खर्च ८२ एकून एक रुपया दाहा आणे आह्माकडे अगर ग्रंथ कर्त्याकडे पाठाविले असतां पुस्तक रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर.
ज्ञानचक्षूचे मालक.

---

## जाहिरात.

### विविधज्ञानविस्तार

**मासिकपुस्तक.**

[कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां. ]

शास्त्रीयविषय, आरोग्यविषय, भाषासुधारणा, मनोरंजन, पुस्तकपरीक्षा, सुंदर ग्रंथांचीं भाषांतरें, इतिहास, विख्यात पुरुषांचीं चारित्रें, कविता इत्यादि विषयांचा समावेश करणारें या प्रकारचें, सर्व महाराष्ट्र देशामध्यें हें एकच पुस्तक आहे.

किंमत.

| | रु. आ. |
|---|---|
| वर्षाची आगाऊ ………… | ३—० |
| मागाहून. …….. | ४—८ |
| सहामाही आगाऊ. | २—० |
| किरकोळ अंकास | ०—६ |
| टपालहांशील वर्षाचे. | ०—६ |

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं मुंबई काळकादेवीच्या रस्त्यावर देवीसमोरील विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत व्यवस्थापक यांच्या नांवें वर्षाची अगाऊ वर्गणी ( रु. ३ आ. ६ ) सुद्धां पत्र पाठाविल्यास पुस्तक चालू होईल.

व्यवस्थापक, विविधज्ञानविस्तार.

☞ मराठ्यांच्या इतिहासाला साधनीभूत अशा आमचे लोकांनीं लिहिलेल्या मराठे व मुसलमान यांच्या राज्याविषयीं जुन्या बखरी छापून प्रसिद्ध करण्याचा आजपर्यंत कोणी यत्न केला नव्हता, त्या आमचे पुस्तकांतून प्रसिद्ध व्हावयास आरंभ झाला आहे; तसेंच नागपुरकर भोसले यांचा निराळा इतिहास अद्याप कोणी लिहिला नाहीं तोही या पुस्तकांत येत आहे. हें पाहून राजेरजवाडे, विशेषतः संस्थानिक व वऱ्हाडप्रांतस्थ लोक याकडे लक्ष देतील अशी उमेद आहे.

---

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० आपला व माझा आजपर्यंत पत्रव्यवहार नव्हता परंतु अलीकडेस सुरू झाला आहे व असाच सतत चालावा अशी आशा आहे.

महाराज, काल रात्रीं मी. बिछान्यावर निद्रित निमग्न होतों पुढें तीन वाजण्याचे सुमारास मला स्वप्न पडलें तें फारच चमत्कारिक असल्यामुळें आपल्या पत्रीं सादर करितों तें असें:—

मी बहुत दिवसांपासून दुष्काळ संबंधी विचार करीत असतों व या मुळें पुढें सर्वांचा निभाव कसा लागेल याविषयींही विचार करीत असतों. असा पुष्कळ दिवसांपासून विचार करीत असतां काल त्याचा निर्णय स्वप्नांत झाला तो असा:—

कोणी एक तरुण व सभ्य चालीची स्त्री शुभ्र वस्त्र परिधान केलेली माझे उशाकडे येऊन बसली व माझे तोंडावर हात फिरवून ह्मणाली तूं रात्रंदिवस दुष्काळसंबंधी विचार करीत असतोस त्यास दुष्काळ बंद करून सर्वांस सुखी करण्यास नाइलाज आहे. पुढें मी तीस प्रश्न केला कीं तूं जगन्मता असून आपल्या मुलाबाळांस मारण्यास प्रवृत्त कशी झालीस ! तिनें उत्तर दिलें कीं, या भरत खंडांत पातक फार होऊं लागलें आहे. पुन्हा मी विचारलें यास कांहीं तरुणोपाय सांगा तेव्हां ती ह्मणाली तुला तरुणोपाय सांगून उपयोग नाहीं कारण तुझे एकट्याच्यानें कांहीं होणें नाहीं व तूं दुसऱ्यास सांगितला असतां ते तुझे गरिबीमुळें तुजवर विश्वास ठेवणार नाहींत. परंतु मी फारच आग्रह धरल्यामुळें मला असें सांगितलें कीं हे हिंदुस्थान ह्मणून पुण्य भूमी असून ह्यांत गोवध जो हिंदु धर्मांत निंद्य तो फारच होऊं लागला यामुळें हा दुष्काळ पडला आहे आणि हा अगदीं बंद झाल्यावाचून दुष्काळ बंद होणें नाहीं. पुढें मी विचारलें मातोश्री हा गोवध बंद होण्यास उपाय काय करावा. तेव्हां तिनें सांगितलें बाळा हा मजकूर तूं सुज्ञास विदित कर ह्मणजे ते ठिकठिकाणीं सभा भरवून राजास गोवध बंद करण्याविषयीं विनंती करतील इतका मजकूर सांगून ती स्त्री गुप्त झाली. महाराज सुज्ञहो ती स्त्री कोण असावी व या स्वप्नाचा अर्थ काय ? हें कृपाकरून मला कळवावें. कळावें तारीख २५ माहे आगष्ट सन १८७७ इसवी.

आपला एक
" क्ष "

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. खालील मजकुरास अवश्य आपले पत्रीं जागा मिळेल अशी आशा धरून तसदी दिली आहे.

जामोद तालुके जळगांव एथील सरकारी मराठी शाळेंत तारीख ६ जुलै सन १८७७ इसवी रोजीं वार्षिक बक्षिसें वाटण्याचा मोठा समारंभ केला त्यावेळीं रा. रा. यादव रावजी पांडे स्कूल कमिटीचे अध्यक्ष, रा. रा. बाळकृष्ण चिमणाजी देशपांडे मेंबर यांणीं गावांतील शेट सावकार व इतर संभावीत लोकांस बोलाविलें त्यावरून शंभर लोक जमले होते. सर्व लोक जमल्यावर एथील प्रसिद्ध सावकार रा. रा. हिरालाल टुकडादास हे सभेच्या मुख्यस्थानीं होते. यांणीं शाळेंतील पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्गाच्या मुलांची परीक्षा घेऊन मुलांस सरकारांतून आलेलीं पुस्तकें वाटलीं. नंतर शाळेंतील पहिल्या वर्गांतील एका मुलानें विद्यावृध्धीवर केलेला एक निबंध वाचला व असिस्टंट मास्तर यांणींही, लोकांनीं शाळेला चांगली मदत दिली असतां मोठे फायदे होतील अशा अर्थाचा निबंध वाचला. नंतर हेड मास्तर यांणीं प्रथमतः लोकांचे येण्याबद्दल आभार मानून नंतर इंग्रजी राज्यापासून कोणकोणते फायदे आहेत अशा विषयावर भाषण केलें. नंतर स्कूल कमेटीचे अध्यक्ष रा. रा. यादव रावजी यांणीं आलेल्या मंडळीस अशी सूचना केली कीं, ह्या शाळेला घड्याळ व घंटा जरूर पाहिजे त्यावरून दोन रुपये, एक रुपया, आठ आणे अशी सुमार २५ जणांकडून २३॥ रुपये वर्गणी जमली. नंतर असें ठरलें कीं, पंध्रा रुपयांचें घड्याळ व आठ रुपयांची घांट घ्यावी व ८ आण्याची मुलांस मिठाई वाटली. नंतर पानसुपारी होऊन सभा विसर्जन झाली. कळावें तारीख २१ माहे आगष्ट सन १८७७ इसवी.

एक
जामोदकर

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. मी आपल्या भेटीस आलों आहे तर स्थल मिळावें अशी आशा आहे.

या गावांत दवाखाना असून पोलिस स्टेशनही आहे. या स्टेशनांत बारा कान्स्टेबल, दोन हेड कान्स्टेबल आणि एक चीफ कान्स्टेबल हीं आहेत. एके दिवशीं रात्रीं अशी एक गोष्ट घडली कीं एका मनुष्यानें टपालआफिसासमोर एका ब्राह्मणाच्या कवाडावर दुर्गंधीचें भांडें फोडलें त्या वेळीं * * * इसम असतां कांहीं बंदोबस्त झाला नाहीं त्यास ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. असा प्रकार अर होऊं लागला तर मग दिवसा घरें फुटतील यांत संशय नाहीं तर आमचे चीफ कानस्टेबल.याचा बंदोबस्त करतील अशी आशा आहे.

इकडे महर्गता फार आहे. मेघराजानें तर डोळेच लाविले आहेत. अड्यांत पाणी नाहीं. कळावें तारीख ११ माहे आगष्ट सन १८७७ इसवी.

एक
निशाचर

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

मूर्तिजापुराहून वि. वि. काल रात्रीपा
सून एथें पर्जन्यवृष्टीस आरंभ झाला आहे
व आजही झड सारखी होती या पूर्वी
इकडे पर्जन्य नव्हता ह्मणून या तालुक्यांत
चोरांची फारच धूम माजली होती. गेल्य
आठवड्यांत ३ दरवडे पडले. एक सुल
तानपुरचा, दुसरा तिकापुरचा व तिस
उमर्ड्यांचा. या तिहींत कोणाचें का
काय चोरीस गेलें व त्यापैकीं काय का
मिळालें हें अद्याप पक्कें समजलें नाही
परंतु उमर्ड्यांचे दरवड्यापैकीं रा. र
विनायकराव चीफ कान्स्टेबल कारंजा
नीं बहुतेक लोक पकडले आहेत अ
ऐकतों. आणि सुलतानपुर एथील चो
पैकी एक इसम मिळाला आहे. हल
मि० डंडलाप साहेब असिस्टंट कमिशन
यांची स्वारी चार दिवसांपासून सदर्हू क
माचा शोध लावण्यासाठीं आली आहे
साहेब बहादूर व मि० मुबारकअली त
शिलदार हे आणि पोलिस चीफ कान्स्
बल वगैरे तपास बारीक रीतीनें लावि
आहेत. तपशिलवार हकीकत समज
ह्मणजे लिहून पाठवीन.

रा. रा. वामन गोविंद जमादार यांजला पळसो एथील मारुती पाटील व एक मुसलमान यांणीं तारीख ११ मिनहूस भर रस्त्यांत काठीनें व जोड्यानें मारिल्याबद्दल आसि. कमि. कडे काम चाललें होतें. त्यांत रा. रा. पांडुरंग गोविंद वकील होते. सदहू मुकद्दम्याचा निकाल झाला. कोणावर कांहीं शाबीद झालें नाहीं. वामनरावजीस मारल्यापासून एथील सावकार लोकांनीं दोन दोन तीन तीन शिपाई नेहेमीं हातांत काठ्या देऊन बाळगिले आहेत. या गावांत अदावत फार आहे.

गेल्या बाजारीं ह्मणजे काल एथें धान्य दर रुपयास वजनी शेर गहू ८, तांदूळ ८ तुरीची डाळ ८, जवारी १० याप्रमाणें भाव होता. कळावें तारीख २९ आगस्ट सन १८७७ इसवी.

एक क्ष.


THE GREAT INDIAN PENINSULA RAILWY.

**ग्रेट इंडेयन पेनिनसुला रेलवे.**

NOTICE.

**नोटिस.**

CLOSING OF THE KHAM GAON STATE RAILWAY.

**खामगांव स्टेट रेलवे बंद करण्याविषयीं.**

या लेखाअन्वयें असें जाहिर करण्यांत येतें कीं, तारीख १ सप्तंबर सन १८७७ रोज शनवार पासून दुसरी नोटिस देण्यांत येईपर्यंत खामगांव स्टेट रेलवे बंद केली जाईल.

ह्मणून चालू महिन्याची तारीख ३१ रोज शुक्रवार नंतर खामगांव व ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवेचें स्टेशन जलंब यांच्या दरम्यान गाड्या जाणार येणार नाहींत; आणि तारीख १ सप्तंबर सन १८७७ शनवार या दिवशीं व नंतर जलम व खामगांव यांच्या दरम्यानच्या स्टेशनावर जाण्यायेण्याबद्दल व थेट जलमपर्यंत जाण्यायेण्याबद्दल टिकिटांविषयींच्या नोटिशी व माल व उतारू पाठविण्याविषयींची व्यवस्था रद्द केली आहे.

**हेनरी कांडर,**
जनरल ट्राफिक म्यानेजर,
मुंबई, तारीख २६ आगष्ट
सन १८७७ इसवी.



**वऱ्हाडसमाचार**

मिति श्रावण वद्य १० शके १७९९


## वाशीम एथें दुष्काळपीडितांकरितां उद्योग.

आज महिना झाला तिकडे पाऊस नाहीं. दिवसास प्रखर ऊन पडतें रात्रीं निरभ्र होऊन स्वच्छ चांदण्या दिसतात. पिकें फार उत्तम आलीं आहेत. परंतु ओलावा नसल्यामुळें तीं वाळत चाललीं आहेत. दुष्काळपीडित प्रांतांतून गुणी लोक एकामागून एक येत आहेत. भिकाऱ्यांची गर्दीच झाली आहे. पंढरपुर, सोलापुर, व मोगलाईंतील लोकांचे थवेचे थवे दररोज येऊन अन्न अन्न करीत दारोदार फिरत आहेत. कसी तरी चतकोर अर्धी मिळेल तीवर उपजीविका करून रहात होते. तशांत दुष्काळपीडित प्रांतांत माल पाठवावा या हेतूनें अकोला, औरंगाबाद एथील व्यापाऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी येऊन माल घेऊन जाऊं लागल्या. तेणेंकरून धान्याची चणचण झाली व भावही भडकला. मग लोकांची स्थिति लिहिणेंच नको. सर्व लोक घाबरून गेले. बाजारांत माल मिळण्याची मारामार झाली. कोणाचें मन स्थीर नसून सर्व पुढे काय होईल याचा विच्यार करूं लागले. दंगे होण्याचा प्रसंग आला. बाजारांत पोलिस बंदोबस्तास येऊं लागले. बाहेरून आलेल्या लोकांस तर दुष्काळांत तेरावा महिना या ह्मणीप्रमाणें झालें. त्यांस जें कांहीं मिळत होतें तें बहुतेक बंद होत चाललें. त्यांनां काम नसल्यामुळें स्वस्त पडून रहावें लागे. कित्येक फक्त पाणी पिवून व कित्येक भाजीपाला मिळेल तो खाऊन राहूं लागले त्यांतून अशक्त, आंधळे पांगळे यांची दुर्दशा विच्यारणेंच नको. हें वर्तमान तेथील दयाळु डिपुटी कमिशनर मेहेरबान क्यापटन बुलक साहेब यांस कळतांच त्यांनीं लायब्ररींत तारीख २४ रोजीं सर्व गावांतील शेट, सावकार, वकील, नोकर व इतर संभावित गृहस्थांस बोलाविलें होतें. साहेबांनीं रा. रा. वामनराव बाळाजी डे. ए. इ. यांनां सभेचा उद्देश, लोकांची स्थिति वगैरे बद्दल सर्वांस समजून सांगण्याविषयीं इंग्रजींत सांगितलें. त्याप्रमाणें वामनराव यानीं सर्व लोकांचे हाल व त्यांनां दोनदोन तीन तीन दिवस कसे फाके पडतात व तेणेंकरून ते कसे मरणोन्मुख झाले आहेत वगैरे थोडक्यांत सांगितलें. व या लोकांचे प्राण वांचविण्याकरितां कांहीं तरी तजवीज करणें आज अवश्य आहे तर पुढें सरसावण्याचा हा प्रसंग आहे असें सर्वांस सुचविलें. या नंतर खालीं लिहिल्याप्रमाणें ठरलें.

१ दोन अडीच शें लोक जमले आहेत व त्यांनां अन्न मिळण्याची तजवीज जरूर व्हावी असें सर्वांनीं सांगितलें त्याकरितां पैसा जमा केला पाहिजे. वर्गणीची याद लागलीच सुरू झाली व २७६ रुपयांचे आंकडे पडले व त्यां पैकीं कांहीं रकमा लागलीच वसूल झाल्या.

२ या कामाची व्यवस्था पहाण्याकरितां कमेटी नेमली ती येणेंप्रमाणें:—

मि. ताजुदीन हुसेन अ. क.
,, डकवर्थ साहेब डाक्टर
,, बाकरअली तहशिलदार
,, इमामोदीन चीफ कानस्टेबल
काजी खान महंमद जहागिरदार
रा. रा. वामन बाळाजी डे. ए. इन्स्पेक्टर
,, ,, शेषराव रघुनाथ वकील
,, ,, गनेश्वर बावा
,, ,, लक्ष्मण गोविंद हेडमास्तर
,, ,, तात्या तालिमकर
,, ,, बाळाजी नाईक दंडे
,, ,, गोविंदराव नारायण बावणे
,, ,, पांडुरंग विनायक वकील
,, ,, बालमुकुंद जहागिरदार
,, ,, रामराव वकील
,, ,, शेट शिवनाथ सावकार
,, ,, भिवराव अनंत नायब तहशि०

वरील गृहस्थांपैकीं रा. रा. वामनराव बाळाजी व रा. रा. शेषराव रघुनाथ यांस सेक्रेटरी योजिलें.

३ जो पैसा जमा होईल तो रा. रा. शिवनाथ शेट यांचे दुकानीं जमा व्हावा व जसजशा रकमा लागतील त्याप्रमाणें चिठ्ठ्या लिहून आणवाव्या. त्यांजवर मि० ताजुदीन हुसेन व दोघांपैकीं एका सेक्रेटरीची सही असावी.

४ पहिल्यानें बरोबर अंदाजा समजण्याकरितां दोन दिवस अन्न तयार करून सिव्हिल आस्पिटल एथें डाक्टरसाहेब यांजकडे पाठवावें ह्मणजे ते आंधळे पांगळे जे अगदी निःशक्त झाले आहेत, त्यांनां काम करण्याची ताकद नाहीं तसेंच लहान मुलें मुली वगैरेस निवडतील त्यांनांच वाटण्यांत येईल. पुढें इस्पितळाजवळच एक लहानसी कोठडी खालीं आहे तींत स्वयपाक होईल.

कांहीं दिवस दररोज बंदोबस्त बरोबर होईपर्यंत कमेटीच्या मेंबरांनीं एकत्र जमून सर्व गोष्टींचा विचार करावा.

हें झाल्यावर पहिल्यानें डाक्टर यांनीं जे ५१६ लोक अगदी मुंडवर टाकले होते व ज्याचे अस्थिपंजर मात्र उरले होतें अशा लोकांस इस्पितळांत नेलें व त्यांचे औषध पाण्याची व्यवस्था ठेविली आहे. पाहिले दिवशीं २० लोकांपुरतें अन्न तयार करविलें होतें. परंतु लोक पुष्कळ आल्यामुळें तें पुरलें नाहीं. दुसरे व तिसरे दिवशीं ४० लोकां पुरतें अन्न करविलें तरी लोकांची संख्या वाढतच आहे. चौथे दिवशीं ५० लोकांचें अन्न तयार होतें तरी कित्येकांस परत जावें लागलें. दररोज लोक येतात त्यांत कित्येकांस दोन तीन दिवस अन्न नाहीं. उठत बसत अन्ना करितां कसे तरी प्रवास करीत येतात. काय बिचाऱ्यांची ही दुर्दशा! त्यांची स्थिति पाहिली ह्मणजे व त्यांचे दीन स्वर ऐकिले ह्मणजे कोणाचेही आंगावर कांटे आल्या वाचून राहणार नाहींत. अन्न तयार करून वाटण्याकरितां या लोकांपैकींच दोन गड्या व दोन मनुष्यें ठेविलीं आहेत. सर्व लोक जमल्यावर नेटिव डाक्टर मि: पुनास्वामी हे आपले समक्ष अन्न मोठे काळजीनें वाटवितात मनुष्यें, बाया, मुलें जशीं असतील तसें त्यांचे शक्तीप्रमाणें त्यांनां देववितात; नाहीं तर जास्त कमी झाल्यास ते अधाशा सारखे खाऊन प्राणास मुकतील. रा. रा. वामनराव बाळाजी हेही दररोज त्यावेळेस तेथें जातात. गरीब व अनाथांस बरोबर मिळतें किंवा नाहीं हें पहातात. व त्यांची मोठ्या कळकळीनें दाद घेतात. मेंबरांपैकीं दोन दिवस मि. इमामुदीन चीफ व तिसरे दिवशीं रा. रा. लक्ष्मण गोविंद व रा. रा. भिवराव अनंत, चौथे दिवशीं रा. रा. बाळाजी नाईक दंडे हेही आले होते. वर्गणी दररोज वाढत आहे. वसूल ही आजपर्यंत २९० रुपयेपर्यंत झाला आहे. शिवाय कित्येकांनीं मण दोन मण ज्वारी देण्याचें कबूल केलें आहे. सावकार लोकांचे आंकडे फारच कमी आहेत ही मोठी दिलगिरीची गोष्ट आहे. अशा प्रसंगीं त्यांनीं आपले हात आंखडून धरिले हें वाईट आहे. आज जर ते आपले द्रव्याचा कांहीं योग्य अंश या धर्मार्थ कामाकारितां देणार नाहींत तर कधीं देतील न कळे. तसेंच इतर लोकही घालावे तसे आंकडे घालीत नाहींत. मि. ताजुदीन साहेब फार बोधपर त्यांस समजवितात तरी त्यांचीं मनें वळत नाहींत. ह्या ठिकाणीं क्यापटन बुलक साहेब यांची तारीफ करणें फार अवश्य आहे. ते दररोज नवीं नवीं कामें काढून या लोकांपैकीं सशक्त मनुष्यें व बायका पाहून त्यांस तीं करण्यास पाठवितात. व यांनां पोटभर मजुरी देववितात. असे लोक सरासरी १२५ झाले आहेत. त्यांनीं हा स्तुत्य उद्योग काढून अशा प्रसंगीं गरीब लोकांचे प्राण वांचविले हें पाहून सर्वांस फार संतोष होत आहे. त्यांनां या लोकांचे अन्नदाते इतकेंच नाहीं पण प्राणदातेही ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

## वऱ्हाडांतील नाटकें.

अलीकडे आमच्या वऱ्हाडी लोकांनीं नाटकाचे खेळ तयार करून प्रांतांतून बाहेर फिरण्याचें मनांत आणलें आहे अशाबद्दल आह्मांस एक दोन ठिकाणाहून पत्रें आलीं आहेत त्या पैकीं आमच्या ता. १९ माहे मजकूरच्या अंकांत मुद्राव्याचें एक पत्र प्रसिद्धही झालें आहे. व दुसरें आज देऊळगाव राजा एथूनही आलें आहे, त्यांत त्यांचें "सांगलीकराचे दर्बार नाटक झालें" "अमुक पात्रांनीं आपलें काम उत्तम प्रकारें बजाविलें" इत्यादि स्तुतिपर वर्णनें, त्यांची बाहेर प्रांतीं फिरण्याची इच्छा व अशा प्रकारच्या मंडळ्यांचें गावोगाव प्रसार हीं ऐकून आह्मांस फार खेदाश्चर्य वाटतें. कारण पुणें प्रांतीं जरी आजवर नाटकाच्या बऱ्याच मंडळ्या उद्भवल्या तरी त्यांतून नावाजण्यासारख्या काय त्या एक दोनच आढळतात. बाकी पाहिल्या असतां तमाशाच्याच दर्जावर असतात तेव्हां इकडील लोकांनीं आपले उद्योग, धंदे व नाव लौकीक सोडून अज्ञान मुलांस स्त्रियांचे वेश देऊन गावोंगाव नाचत हिंडविणें यांत कांहीं भूषण नाहीं. या क्षुलक गोष्टीपासून अनेक प्रकारच्या दुर्व्यसनांचें बीजारोपण देशांत कायमचें होण्याचा संभव आहे ह्मणून आमचे होतकरू देशबांधव या नाक्या कलेला न अनुसरतील तर बरें होईल. कारण या पेक्षां महत्वाचे विषय आपल्यास अवगत नाहींत असे अजून पुष्कळ शिलक राहिले आहेत व त्यां वाचून आपण अतोनात दुःखें भोगित आहों. तीं दूर व्हावीं ह्मणून कला कौशल्य व उ

द्योग व्यापार यांत शिधाव करून तरबेज व्हावें व आपल्या जन्मभूमीचें सार्थक करून देशबांधवांस सुखी करावें हे अधिक श्रेयस्कर होईल. आतां असेंही कोणी ह्मणतील कीं 'नाटकांतही नृत्यगानादि कौशल्य आहेच' तर तें त्यांचें ह्मणणें अन्यथा नाहीं, पण हल्लीं जितकीं नाटकें आपल्या महाराष्ट्र देशांत आहेत तितकीं सद्गुणांच्या संरक्षणार्थ ह्मणा किंवा इष्की जनांच्या मनरंजनार्थ ह्मणा बस आहेत. सर्वांनीं या नादीं लागणें चांगलें नाहीं असें आह्मी मुळावें एथील व देऊळगाव राजा एथील नाटककार मंडळीस व तत्संबंधी पत्रें पाठविणारांस सुचवितों. त्यांनीं कृपाकरून इकडे अवश्य लक्ष देऊन या क्षणिक सुखासाठीं सतत परिश्रम करण्याचें वर्जावें कारण आपला हा वऱ्हाड प्रांत चांगला सुपीक आहे तेणेंकरून कोणताही व्यापार धंदा उचलला असतां अडचण नाहीं.

मन मानेल तसें वर्तन ठेऊन पैसे मिळविण्याची ही एक सुलभ रीति आहे असें कांहींकास वाटत असेल परंतु तेच जर याचा पूर्ण विचार करतील तर त्यांचे लक्षांत येईल कीं जें थोड्या मेहेनतीनें साध्य होतें त्याची किंमतही थोडीच असते. फार दूर कशाला? पट्टेवाल्याची नोकरी मिळण्यास जी मेहेनत लागते तिजपेक्षां सिविल सर्विसची मिळविण्यास हजारों पट अधिक लागते व ह्मणूनच त्या दोन व्यक्तींत अतरही त्याच प्रमाणांत आहे. तेव्हां सर्वांनीं आपल्या शक्तीप्रमाणें देशाचें कल्याण करण्यास झटावें तरच कालांतरानें आपली दुःखद स्थिति दूर होण्याचा संभव आहे व सें करण्यास ईश्वरानें साह्य करावें.

---

**झाडें लावण्याचा हंगाम**— आपले इकडे बहुत लोक मृगशितळांत ह्मणजे वरसात लागण्याच्या सुमारास वेलीचें बीं, शाकभाज्या, व इतर झाडें लावितात व हाच हंगाम उत्तम असें इकडे समजतात. त्याजबद्दल एकानें टाइम्समध्यें पत्र लिहिलें आहे कीं, ती रीति अशुद्ध आहे. सडकेच्या बाजूस, स्टेशनावर, किंवा छावणींत अथवा दारीं, लहान मोठीं झाडें लावणें तीं, कलमें लावणें तीं एप्रिल महिन्याच्या आरंभीं लावावीं व दोन महिने पाऊस लागेपर्यंत त्यांना चांगलें पाणी द्यावें ह्मणजे वरसातींत तीं चांगलीं जोरावतात. विलायतेकडे स्प्रिंग ह्मणून जो ऋतु आहे तो हिंदुस्थानांत एप्रिल व मे महिन्याचा होय, या ऋतूंत झाडांना बार ह्मणजे पालवी फुटते व नवीं झाडेंही जोमानें वर येतात. व याच सबबेनें एप्रिल महिन्यांत लावलेलीं झाडें जून महिन्यांत लावलेल्या झाडांपेक्षां फार त्वरेनें व चांगलीं वाढतात, असा या लिहिणारानें अनुभव घेऊन पाहिला आहे. शिवाय तो ह्मणतो कीं, जून महिन्यांत लाविलेल्या झाडांस पाऊस अधिक झाला तर त्यांतून किड्यांच्या कोवळ्या मुळ्या कुजून तीं मरतात, तसें एप्रिल महिन्यांतील झाडांस होत नाहीं. कारण त्याच्या मुळ्या उदक शोषण्यास चांगल्या तयार झालेल्या असतात.

भावनगराकडे कोणी कपाशीची पेरणी पावसाचे अगोदर सुमार २०।२५ दिवस केली होती व पाऊस लागेपर्यंत त्याला मोटेचें पाणी दिलें होतें, तर त्या कापसाचें पीक इतर बरसातींतील कापसाच्या तिप्पट आलें होतें. असेंही तो लिहिणारा लिहितो.

## वऱ्हाड.

या आठवड्यांतही शुक्रवारीं रात्रीं पाऊस फार चांगला पडला.

मे. ग्रांट साहेब अकोल्याहून उमरावतीस जातील व मे. दस्तुर बहिमनजी साहेब एथें स्माल काज जडज होतील असें वर्तमान आहे.

मे. दस्तुर बहिमनजी साहेब असिस्टंट कमिशनर शिगावास गेले आहेत.

एक मुलगा जिवंत असतां तो मरण पावल्याचा पुकारा होऊन पोलिसानें मुद्देसुद कैदी धरला, माजिस्त्रेटानें कमिट केला, व सेशन जडजानें त्यास फांशीची शिक्षा सांगितली व त्याच्या गळयास फांस लावला इतक्यांत तो जिवंत मुलगा त्या ठिकाणीं हजर झाला व आरोपी मोकळा झाला. या गोष्टीचें एक सुरेख व नवें नाटक काल रात्रीं इचलकरंजीकरांनीं केलें.

**उमरावती**—येथें ग्रहणापासून पाऊस फारच उत्तम पडत आहे. बहुधा दररोज थोडाबहुत पडल्या शिवाय राहत नाहीं. गुरुवारीं सायंकाळीं थोडाचवेळ पण धुवाधार पाऊस पडला.

धान्याच्या चोऱ्यांचा मोठा पर्वकाल चालला आहे. च्यार चोऱ्या मिळून मूर्तिजापुर तालुक्यांतून सुमार ७४ लोक धरले असें समजतें. असाही बाहेर पुकारा झाला आहे कीं पोटाकरितां ९ शेर धान्य घेण्याची सरकारांतून मुभा मिळाली आहे; सबब प्रत्येकानें तितकें चोरण्यांत गुन्हा नाहीं असें ते लोक समजतात. त्या बिचाऱ्या सर्वांस आतां शिक्षा होतील.

मि० हावसन साहेब अकोल्याहून येथें पोलिससुपरइंटेंडेंटचें काम पाहण्यास आले आहेत हे मोठे हुशार असून यांस मराठी भाषा चांगली येते. व पुष्कळांशी मेठि गोड बोलतात.

सेशनाकरितां जुडिशियल कमिशनर साहेब येथें आले आहेत. यके मुकदम्याचा निकाल झाला. इलिचपुराहून इतक्यांत दुसरा येणार आहे.

डिपुटी कमिशनर साहेबापुढें वऱ्हाडसमाचारांतील मूर्तिजापुरच्या एका नोटिसीबद्दल फौजदारी मुकदमा चालू आहे.

सिमल्याहून कमिशनर साहेब अजून आले नाहींत लवकरच येतील.

मि० लक्ष्मीपाति नायडु बारिस्टर कांहीं कामाकरितां एथें आले होते त्यांनीं गुरुवारीं सायंकाळीं लायब्ररींत दुष्काळाबद्दल व सार्वजनिक सभेच्या अवश्यकतेबद्दल सुरस व्याख्यान दिलें.

**अकोट**— दीड महिना पाऊस नव्हता त्यामुळें मोठी धास्ती होती ती परमेश्वरानें दूर केली. ग्रहणाचे सायंकाळापासून २ दिवस पर्जन्य पडला. तो सुमार २॥। इंच होईल. लोकांच्या तोंडावर टवटवी आली आहे आणि कुजलेल्या धान्याचीं पेवें रिकामीं करून तीं चांदीच्या तुकड्यांनीं भरावयाची उमेद बाळगणारे व्यापारी लोकांचा तिळपापड झाला आहे!

अतिशय महागाईमुळें गोरगरीब उपाशी मरूं लागले त्यांकरितां एथील तहशिलदार मि. दोराबजी शेट व मि. गबूसिंग जमादार यांनीं पुष्कळ खटपट करून रु. ५०० जमविले. व त्यांची जवारी घेऊन गरिबास स्वस्त दरानें द्यावी व अंधळ्यापांगळयास वगैरे धर्मार्थ द्यावी अशी तजवीज केली आहे. विक्री फारशी होत नाहीं पण धर्मादाय घेणारांचीं संख्या सुमार २०० पर्यंत जमते.

---

मंगरूळ जिल्हा वाशिम एथील तहशिलदार मि० शावासखान यांचे प्रयत्नानें गोरगरीबास मदत करण्याकरितां तेथें एक मंडळी स्थापन होऊन १५० रुपये वर्गणी देण्याचें त्यांनीं कबूल केलें. २३ वे तारखेपासून ५।४ दिवस पाऊस पडत आहे तेणेंकरून लोकांच्या मनास बरीच स्वस्थता झाली. व दर मणी १० रुपये भाव होता तो ७ रुपये झाला.

---

देऊळघाटचे नवाब साहेबाचे मुलास अव्वाची करावें ह्मणून बुलढाण्याचे डिपुटी कमिशनर यांणीं शिफारस केल्याचें समजतें.

**शिगाव**—एथें दुष्काळ संबंधांत लोकांनीं उदार आश्रय देऊन वर्गणी दिली ती खालीं लिहिल्याप्रमाणें:—

| | |
|---|---|
| मि. बहिमनजी सा. व. अ. क. | २५ |
| ,, खटावभाई | १०१ |
| रा. रा. श्रीराम शाळिग्राम साहू | १०१ |
| ,, कुकाजी महादाजी पाटील | १०१ |
| ,, मारुती वल्दद कडताजी पाटील | ५० |
| ,, सुकरामदास खुशालचंद | १०१ |
| ,, गणेशदास भिवराज मारवाडी | १०१ |
| ,, गुमाणीराम सिताराम | १०१ |
| ,, नामदेव बापू | १०१ |
| ,, तनसुक हरि मारवाडी | १०१ |
| ,, लधा खेतसीभाई भाटे | १०१ |
| ,, दिनानाथ साधुराम | ७१ |
| ,, हुलासराय भवानीदास साहू | ११ |
| रा. रा. शेडमल त्रिंबकराव साहू | ११ |
| ,, भास्कर महेश्वर तहशिलदार | ५ |
| ,, भगवान माळी | ६१ |
| ,, कस्तुरचंद कुकाजी | ५१ |
| ,, वलजीअसरिया | १५ |
| ,, रामजी कृष्णाजी | ११ |
| ,, नागो दिगांबर | ११ |
| ,, नवलराम जिवनराम | ११ |
| ,, रतनसी पुनसी | ११ |
| ,, सालग्राम दलाल | ११ |
| ,, सुरजी जीवन | ११ |
| ,, बक्तावर कन्हयालाल | २१ |
| ,, गोविंदराम साहेबराम | ४१ |
| ,, गणपत शाहजी | ११ |
| ,, सिवदास भय्या | ९ |
| ,, डोसाभाई | ७ |
| ,, भारमल तेजराम | ७ |

याशिवाय ३६ जणांकडून लहान लहान आकडे मिळून ११७॥ रुपये जमले. व एकंदर १४७८॥ वर्गणी झाली.

## वर्तमानसार

विलायतेस दुष्काळ फंडाची रकम चांगली जमत आहे. म्यानसन हौस मार्फत साडेपांच लक्ष रुपये जमले आहेत. आपल्या चक्रवर्तिनी साहेब, युवराज प्रिन्स आफ वेल्स, त्यांच्या पत्नी यांनींही पांच पांच दहा दहा हजार रुपये दिले.

नवीन गप्प— सन १८५७ सालच्या बंडांतील फिरोजशहा दिल्लीच्या बादशहाचा पुत्र हा तुर्कस्थानची राजधानी कानस्टंटिनोपल एथें होता तो नुकताच मरण पावला. व अजीमशहा जो नाना साहेबाचा मुख्य मुत्सद्दी तो अजून तेथेंच आहे असें एका इंग्लिश वर्तमानपत्रांत लिहून आलें आहे.

रशियन फौजेंतील ९ जनरल मरण पावले.

नामदार व्हाईसराय साहेबांची स्वारी बुधवारीं मद्रासेस गेली. व येत्या बुधवारपर्यंत तेथें राहून मग म्हैसुरास जाणार आहे.

**लढाई; तुर्कस्थान**—तुर्की खलित्यांवरून समजतें कीं, एके दिवशीं देशाची पाहणी करणाऱ्या रशियन फौजेच्या टोळीनें कासलर एथें तुर्की फौजेवर हल्ला केला, पण तुर्कांनीं त्यास हटविलें; त्या लढाईंत रशियनांचे ५०० लोक मेले व जखमी झाले.—सालोनिका शहरास वेढा पडला.—रशियाच्या बादशाही पलटणी दान्यूब उतरून येऊन रस्तचक एथें किरकोळ लढाया करीत आहेत. त्या शहरावर रशियनांनीं फौजेची एक मोठी तुकडी पाठविली होती तिला आंतील तुर्की लष्करानें पळवून लावलें.—१७ आगष्ट रोजीं दानुच्यांत तुर्की फौज उतरली तिजशीं लढण्याकरितां रशियन लोक चालले आहेत. कस्तेनजी रेलवेच्या रस्त्यालगत ज्या रशियन लोकांच्या छावण्या आहेत त्यांवर मिसरी फौज हल्ला करणार आहे.—उस्मान बाजारच्या रस्त्यावर जे रशियन लोक पाहणी करीत होते त्यांस एका तुर्की फौजेनें धुडावून लावलें.— रशियनांनीं कस्तेनजी गांव घेतलें.— तिरनोवा व शिपका खिंड यांच्या दरम्यानच्या रहदारीचा रस्ता रशियनांच्या स्वाधीन आहे. हांकोई खिंडींत रशियनांनीं सुलेमान पाछाचा पराभव केला. एकसीमुमा एथें मेहेमेत पाछाची व रशियन लोकांची मोठी लढाई झाली.—रशियन जनरल गौको हा शिपका खिंडीकडे परत जात असतां आह्मीं यांचे ४,००० लोक मारले असें तुर्क ह्मणतात.— पाछा बेकर ह्म० मानी कर्नल बालंटाईन बेकर यास तुर्क सरकारानें आपल्या रिसाल्यांवर मुख्य नेमलें; तो हल्लीं बल्गेऱ्यांत पाहणी करीत आहे. तुर्क सरकार बल्गेऱ्यांत अणीबाणीच्या प्रसंगासाठीं ९०,००० फौज जमा करून ठेवीत आहे.—आगष्ट २१ रोजीं शिपका खिंडींत रशियनांनीं सुलेमान पाछाचा पराभव केला. तुर्कांचे पुष्कळ लोक पडले. उस्मान पाछा लिहितो कीं, त्याच दिवशीं प्लेवनाच्या पश्चिमेस रशियनांची एक टोळी पाहणी करीत होती तिला म्यां पळवून लावलें.

एका युरोपियन स्त्रीनें टाइम्समध्यें पत्र लिहिलें आहे कीं आस्त्रेलिया बेटांतून मज कडे कांहीं बटाटे आले. ते हिंदुस्थानांतील बटाट्यापेक्षां फार उत्तम असून चांगले शिजवून खाल्ले तर गव्हाच्या पोळीप्रमाणें त्याचे अंगीं गुण आहेत याजकारितां हल्लीं इकडे धान्याची विशेष महर्गता झाली आहे सबब आस्त्रेलियांतून खंडोगणती बटाटे भरून कांहीं जहाजें येतील तर लोकांची चांगली गुजराण होईल. ही तजवीज कोणी साहसी गृहस्थांनीं अवश्य करून पहावी.

एक नोकरीवरून दूर झालेला युरोपियन गृहस्थ कुटुंबासुद्धां मुंबईस रहात आहे तो बायकोसुद्धां तापानें आजारी पडला व त्यास दुसरे कोणी नाहीं असें पाहून एका नेटिव डाक्टरानें दररोज त्यांस औषध देऊन त्यांचीं उत्तम शुश्रुषा केली व त्याबद्दल कांहीं घेतलें नाहीं. पुढें ती दोघेही बरीं झालीं आणि त्यांनीं आपले असे उद्गार प्रसिद्ध केले कीं "नेटिव लोक युरोपियनाविषयीं इतके मायाळू असतील अशी आजन्मप्रभृति मला कल्पना नव्हती."

धनी आणि मास्तर यांचा संबंध सुरक्षित रहाण्याकारितां हिंदुस्थान सरकारचे कायदे कौन्सलांत एका आक्टाच्या मसुद्याची वाटाघाट चालली आहे.

ईस्ट इंडिया रेलवेच्या बहुत स्टेशनांवरून आतां माल तुंबून राहिला आहे.

बडोद्यास पुण्यांचे गणेश वासुदेव जोशी गेले होते त्यांनीं हिंदुस्थानांत "पब्लिक ओपिनियन" ह्मणजे लोकमत अजून ठरीव झालेलें नाहीं तें असावें अशा संबधानें व्याख्यान दिलें.

मद्रास इलाख्यांत फौज इकडून तिकडे पाठविण्याच्या संबंधानें बहुत अदला बदली विलायत सरकारानें सुचवून छापून प्रसिद्ध केल्या आहेत त्याविषयीं मद्रासचे गवरनर साहेबांनीं अशी शिफारस केली आहे कीं या दुष्काळाचे गर्दींतही हाल चाल न केली असतां बराच त्रास कमी होईल.

सोलापुरास मकेच्या कणसाबद्दल खून— एक शेतकरी रात्रीचे वेळीं आपले शेत राखीत बसला असतां त्याचे शेतांत कांहीं लोक येऊन त्याच्या समक्ष मकेचीं कणसें मोडूं लागले इतक्यांत बिच्याऱ्या मालकानें कांहीं प्रतिबंध केल्यावरून अखेर चोरट्यांनीं त्याचा खून केला व कणसें घेऊन गेले. क. त.

इसवी सन १६४८त जान बिलकिन्स नांवाचे शास्त्रवेत्त्यानें अमेरिकेंत ' गणित विषयाचे अद्भुत चमत्कार, या नांवाचा एक ग्रंथ छापला त्यांत त्यानें घोडा, बैल वगैरे वाहकें गाडीस न लावतां वायू वेगानें चालण्याच्या गाडीचें वर्णन दिलें आहे. या गाडींत पाहिजे त्या दिशेनें वारा चालला असला तरी तो धरता यावा अशी अवजारांची योजना केलेली असते. या अवजारांचे योगानें चाकास गति येऊन चाकें फिरूं लागूं लागतात व तेणेंकरून फारच सुलभ रीतीनें व बिनखर्चानें एके ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं जातां येतें. अशा प्रकारच्या गाड्या सर्वत्र ठिकाणीं उपयोगी पडतील यांत शंका नाहीं. अशा गाड्या हल्लीं अमेरिकेंत एका गृहस्थानें तयार केल्या आहेत.

सदरील गाडीची रचना फारच सुलभ असून उपयोगाची आहे. या गाडीस खर्च वगैरे नसल्यामुळें आमचे देशा सारख्या निर्धन देशांत या गाड्या अत्युपयोगी होतील. तर आह्मांपैकीं शिल्पकार लोक इकडे लक्ष पुरवून कांहीं उपयोग करितील तर फार बरें.

आमचे इकडील लोकांस तारायंत्राची माहिती होऊन बरेच दिवस झाले व आतां तारायंत्र संबंधाच्या लोकांच्या मनांतील विलक्षण कल्पना बहुधा नाहींशाही झाल्या असतील.

तर एकाच तारेनें एकाच वेळीं चार मजकूर पाठवितां येतात असें लोकांस कळविलें असतां फारसें विलक्षण वाटणार नाहीं.

अमेरिकेमध्यें तारायंत्रांत इतकी सुधारणी झाली आहे कीं एकाच तारेनें एकाच वेळीं ते निरानिराळे चार मजकूर पाठवितात. अशा प्रकारचें तारायंत्र अमेरिकेंतील न्यूयार्क व सर्व मोठ्या शहरांत चालू आहे. ही कल्पना इंग्लंड देशांत देखील अद्याप सुरू झाली नाहीं. मग हिंदुस्थान देश तर फारच लांब राहिला त्या बिच्याऱ्याकडे एव्हांशीच कोठून येणार.

अमेरिकेंत एम ओमिनस या नावाचे गृहस्थानें विद्युत् प्रवाहानें जखमा बऱ्या होतात व सुकवितांही येतात असें शोधून काढलें आहे. किरण.

मि. एच. एन. बी. एर्स्किन उत्तरभागचे रेवेन्यु कमिशनर यांस खानदेश, अहंमदनगर व सुरत या जिल्ह्यांची हालहवाल पाहून कळविण्याकारितां सदहू जिल्ह्यांत जाण्यास हुकूम झाला आहे असें कळतें.

ह्मैसूर सरकारापाशीं हल्लीं शिलक नाहीं व दुष्काळामुळें इतर इलाख्यांतून व इतर खात्यांतून जे कामदार आपले प्रांतीं मागविले त्यांचे पगार वगैरे मोठे आहेत सबब त्या सरकारास कर्ज काढावें न लागावें ह्मणून त्या कामदारांस परत पाठविलें असें समजतें.

इंग्रज सरकारानें आह्मास कांहीं जरूरीचे कारणाकरितां तुमची फौज लागल्यास तुह्मीं किती द्याल, असें होळकर सरकारास विचारलें त्याजवरून होळकर सरकारानीं १९०० पायदळ देण्याचें कबूल केलें.

आग्रा येथील एका श्रीमान गृहस्थानें तेथील कमिशनरास असा अर्ज केला आहे कीं हल्लीं दुष्काळ आहे सबब स्वस्त दरानें ह्मणजे रुपयास २९ शेर गहूं प्रमाणें तीन वर्षेंपर्यंत विकण्याचा मला मक्ता दिल्यास मी घेण्यास कबूल आहे; परंतु या तीन वर्षांत जो वाणी माझ्या दरानें धान्य विकण्याबदल आपलें नांव सरकारांत नोंदील याशिवाय इतर वाणी लोकांस धान्य विकूं देऊं नये.

पुणें येथें उत्तम प्रकारच्या कारागिरीच्या पदार्थांचें प्रदर्शन ता० २० रोजीं सुरू झालें. समारंभ गव्हर्नर साहेबांच्या हातानें झाला. त्यावेळेस पुष्कळ लोक जमले होते. प्रदर्शनास मागील वर्षांपेक्षां चांगलें सामान आलें आहे असें समजतें.

ढाका येथें पुष्कळ व्यापारी तांदुळ खरेदी करण्यास गेले आहेत त्यामुळें तेथें धान्याचा भाव फार चढला असून तें विकत घेण्याचें तेथील गरीब लोकांस सामर्थ्य नाहीं हें पाहून तेथील कांहीं मुसलमान लोक एकेठिकाणीं जमून त्यांनीं ह्या खरेदी करणारांपैकीं बऱ्याच व्यापाऱ्यांस मार हाण केली असें समजतें. यामुळें धान्याचा भाव बराच उतरला आहे असेंही कळतें.

काश्मिरामध्यें सोपुई ह्मणून एक फार जुनाट शहर आहे त्यास कांहीं दिवसांपूर्वीं आग लागली. सुमोर १६० घरें जळालीं व दोन अडीच लक्षांचें नुकसान झालें. ने. ओ.

अलाहाबाद खेरीजकरून वायव्य प्रांतांतील सर्व कालेजें बंद करण्याचा सर जार्ज कूपर यांचा विचार आहे असें सिमल्याकडून वर्तमान आलें आहे. यावरून सरकार हिंदु लोकांस उंच प्रतीचें शिक्षण देण्यास इच्छित नाहीं असें दिसतें.

शिकारपुर एथें एका दैवज्ञाकडे माझ्या प्रारब्धीं काय आहे हें विचारण्याकरितां एक स्त्री गेली होती. तिच्या प्रारब्धाचें भवितव्य सांगण्याकरितां जोशानें आपली पोथी उघडल्याबरोबर त्याच्या अंगास थरथराट सुटला व सुमोरें पाव तासाच्या अवकाशानें तो एकाएकी मरण पावला.

केरळमतानुसार भाविष्य— निजज्येष्ठ पंचमीस प्रारंभ करून श्रावण वद्य पंचमीपर्यंत वृष्टीला खंडमंडलयोग व मंदयोग फार होता. आतां श्रावण वद्य पंचमीस प्रारंभ करून चाळीस दिवसपर्यंत वृष्टियोग चांगला आहे. पूर्वा नक्षत्रापासून वृष्टीस प्रारंभ होईल. उडीद वगैरे पिकाचा नाश झाला; पण जोंधळा वगैरे पीक चांगलें होईल सालमजकुरीं सर्व देशोदेशीं रुद्रस्वाहाकाराद्यनुष्टानें झालीं असतीं तर सुभिक्ष झालें असतें; परंतु उपाय नाहीं. पुण्यवान व स्वस्वधर्मनिरत जनांला सुख आहे. गतवर्षीं दक्षिण देशांत मोठे नक्षत्राचें पतन झालें. हा तारा यमस्वरूप होय. याप्रमाणेंच यंदा उत्तर देशांत एक मोठा तारा पडेल. तो इंद्रस्वरूप होय. पापिष्ठांस यमरूप ताऱ्याच्या पतनापासून भय व नाश आहे. पुण्यवानांचें इंद्ररूप ताऱ्याच्या पतानापासून रक्षण होईल. कलियुगप्रारंभापासून पंचसहस्त्रवर्षां नंतर या कलियुगांत ही विष्णवंशलोकप्राबल्यापासून किंचित द्वापारधर्मासारखी पुनः धर्मप्रवृत्ति होणार ईश्वरनामक संवत्सरापासून पुढील वीस व वें हीं संधिवर्षें होत. यांत पुण्यवानांला सुख आहे. पापिष्टांस नाश व दुःख आहे. आश्विनापासून सुभिक्ष होईल. गेल्या आश्विनमासापासून दक्षिण देशांत आठ दुष्ट योग होते. त्यांपैकीं श्रावण वद्य अष्टमीस सहा कमी झाले, बाकी दोन शिलक आहेत. ई. प्र.

हिंदुस्थानांतून तुर्कस्थानच्या जखमी लोकांकरितां जी मदत तुर्की काउन्सल जनरलच्या मार्फत पाठविण्यांत आली त्याजबदल तुर्कस्थानच्या मुख्य वजिराकडून आभारदर्शक पत्र आलें आहे. त्यांतील हशील पुढीलप्रमाणें आहे:—तुमच्याकडून तुर्कस्थानचे जखमी व लढाईत पडले त्यांचीं पोरकीं मुलें यांच्या मदतीकरतां ज्या वारंवार रकमा येतात त्यांजबदल मला फारच आनंद होतो. याच कामाकरतां मुद्दाम नेमलेली मंडळी व मी स्वतां तुमचे फार अभारी आहों. हिंदुस्थानातील लोकांनीं इतक्या अंतरावरून आपल्या जातभाबांचा पक्ष घेऊन अगदीं वेळेवर जी मदत केली तिच्याबद्दल मी त्यांचे फार अभार मनतों. स्वतां तुह्मीं व हिंदुस्थानांतील लोकांनीं जे श्रम घेतले त्याजबद्दल तुह्मांस इहलोकीं तसेंच परलोकींही योग्य बक्षीस मिळो अशी मी ईश्वराजवळ मनापासून प्रार्थना करतों.

अलाहाबादेस एका सोजिरानें दुसऱ्या एका गोऱ्यास मारल्यावरून त्यास तारीख १७ रोजीं फांशी दिलें.

रेवाच्या महाराजांनीं आपल्या संस्थानांतील अन्नार्थी रयतेस फुकट धान्य मिळावें ह्मणून ४९,००० रु. खजिन्यांतून दिले.

ब्रह्मदेशांत धान्याचे दर फारच वाढत चालले आहेत व जर असेच पुढें व्यापारी लोक ते जास्त वाढवतील तर त्यांजवर फारच कठीण प्रसंग येतील असें प्रसिद्ध जाहिरनामे लावून त्यांस सुचवलें आहे.

मध्यप्रांतांत सरकारानें एकंदर ६०१ रानटी जनावरें मारलीं, पण रानटी जनावरांनीं सरकारची रयत ( मनुष्यें व जनावरें मिळून ) १४१८ ठार मारलीं असें कळतें. रानटी जनावरेंच विजयी समजावयाचीं!

इकडून सिक सबबनें विलायतेंत गेलेल्या डाक्टरांची तेथें त्यांच्या आजारीपणाची चांगली परीक्षा करवून जे इकडे येण्यास लायक असतील त्यांस एकदम इकडे पाठवावे असें या सरकारानें विलायत सरकारास तारेनें कळवलें आहे.

बंगलोरास एक गोरा सरजंट मेला त्याचें वय ८० वर्षांचें असून तो १८१४ त चाकरीस राहिला. तो आशरगड, नागपुर, महिदपुर वगैरे लढाईंतही होता. त्याचप्रमाणें तो १८२४ त ब्रह्मदेशच्या लढाईंतही होता. त्यानें पेनशन घेतल्यावर, तो चाकरीवर असतां जी समशेर नेहमीं आपल्या गळ्यांत बाळगित असे ती त्यास बक्षीस दिली होती.

कोलंबो एथें एका मनुष्याची एका उमेदवार मुलीवर प्रीति बसली, पण तिच्याशीं आपलें लग्न होत नाहीं व ती दुसऱ्याच्या ताब्यांत खचीत जाणार, असें त्यास वाटून दुसऱ्याच्या ताब्यांत तिला पहाण्यापेक्षां ती मेली तर बरें असा विचार करून त्यानें तीस ठार मारलें, व आपण होऊनच अधिकाऱ्याच्या स्वाधीन झाला. अधिकाऱ्यानें तुला फांशी देतों असें विच्यारल्यावरून "फाशी द्या पण मेल्यावर तिच्या शेजारींच मला पुरा" असें त्यानें उत्तर दिलें अ. द.

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ | अकोला, रविवार ता० ९ माहे सप्तंबर सन १८७७ इ० | अंक ३६


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| „ अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी म्हणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| „ दुसरे खेपेस | ०२ |

THE GREAT INDIAN PENINSULA RAILWY.

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE.

## नोटिस.

CLOSING OF THE KHAMGAON STATE RAILWAY.

खामगांव स्टेट रेलवे बंद करण्याविषयीं.

या लेखाअन्वयें असें जाहिर करण्यांत येतें कीं, तारीख १ सप्तंबर सन १८७७ रोज शनवार पासून दुसरी नोटिस देण्यांत येईपर्यंत खामगांव स्टेट रेलवे बंद केली जाईल.

ह्मणून चालू महिन्याची तारीख ३१ रोज शुक्रवार नंतर खामगांव व ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवेचें स्टेशन जलंब यांच्या दरम्यान गाड्या जाणार येणार नाहींत; आणि तारीख १ सप्तंबर सन १८७७ शनवार या दिवशीं व नंतर जलम व खामगांव यांच्या दरम्यानच्या स्टेशनावर जाण्यायेण्याबद्दल व थेट जलमपर्यंत जाण्यायेण्याबद्दल टिकिटांविषयींच्या नोटिशी व माल व उतारू पाठविण्याविषयींची व्यवस्था रद्द केली आहे.

**हेनरी कांडर,**

जनरल ट्राफिक म्यानेजर,

मुंबई, तारीख २६ आगष्ट सन १८७७ इसवी.

## नोटिसा

नोटिस---चुनीलाल शिवचंदराय वोहवाटदार रामजस प्रसादीराम दुकान अकोट यांस खालीं सही करणार याजकडून जबाब देण्यांत येतो कीं तुह्मी तारीख २१ आगष्ट सन १८७७ इसवीची नोटिस अकोला वऱ्हाडसमाचार छापखान्यांत प्रसिद्ध करून एक अंक आह्माकडेस रजिस्टर करून पाठविला तो पावला त्याचें उत्तर--ज्वारी खंडी १९०१। चा सवदा मुळींच तुमसी व आमसी झाला नसून भगिरथ मारवाडी रहाणार अकोट यांसीं झाला आहे. व त्याजपासून आह्मी रुपये घेऊन त्याजला आमचे अकोली जहागीर एथील ज्वारीचें पेंव दाखवून देऊन ज्वारी नेण्याचें सांगितलें त्याप्रमाणें भागिरथ यानीं पेंव खंदून पेवांतील ज्वारी नेली आहे. कदाचित् कांहीं ज्वारी त्याजला नेणें राहिली असेल तरी ती त्याचीच आहे. तुह्मास आह्मावर नोटिस देण्याचेंच कारण नसून विनाकारण दिली आहे असें असतां तुह्मी आह्मावर काय कारणानें फिर्याद केली असेल हें कळत नाहीं. हा जबाब विनाकारण आह्मास देणें पडला याचा खर्च छापखान्यांतील खर्चासुध्धां सर्व घेण्याविषयीं तुह्मावर दावा केला जाईल. कळावें. तारीख २७ आगस्ट सन १८७७ इसवी.

(सही) चौयमल शिवनाथ दुकान
अकोली ता० अकोट
दस्तुर खुद.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यासः—

वि. वि. मौजे नाझें तालुके यवतमाळ एथील पाटील माधोजी वलद नागोजी रुईकर यांणीं बाजारचे ओटे दगडी चुनेगच्चीचे सुमार दहा बांधिले आहेत व लगत धावडी बंगलेदार बांधिली आहे. त्यांत बसलें असतां बाजार सर्व दृष्टीस पडतो. ओट्याच्या नजीक नानाप्रकारचीं झाडें लाविलीं आहेत. व ओट्याच्या दक्षिणेस शंभर कदमावर विहीर आहे. त्यामुळें ओटे चांगली शोभा देताहेत. त्या कामास सुमारें तीन शें रुपये लागले असा अदमास आहे. ओट्यापासून तळ्यापावेतों चांगली सरळ सडक करण्याचा त्यांचा इरादा दिसतो व लवकरच होईलही. सदहू पाटील यांणीं केलेल्या सदुद्योगाबद्दल सरकारांनीं त्यांस बक्षीस द्यावें ह्मणजे त्यांस अधिक उत्तेजन येऊन ते सार्वजनिक कामें विशेष लक्ष्य लावून जास्त करतील— आज १९ दिवस झाले, पर्जन्य बिलकूल नाहीं. त्यामुळें पिकास धक्का बसेल अशी भीति वाटत आहे. परंतु दयाळु परमेश्वरानें कृपा केल्यास उत्तम होईल. धान्यास भाव पूर्वीपेक्षां दुप्पट झाले आहेत. कळावें.' तारीख २३ आगष्ट सन १८७७ इसवी.

एक क्ष.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यासः—

सिंदखेडाहून— वि० वि० खालीं लिहिलेल्या चार ओळींस जागा मिळेल अशी आशा आहे.

मी फिरत फिरत जाधवरावाच्या कारकीर्दींतलें जें नामांकित गाव सिंदखेड एथें गेलों व तेथें कांहीं दिवस मुक्काम झाला त्यांत कांहीं मागील गोष्टी ऐकण्यांत आल्या. आणि तेंथील लोकांच्या ज्या कांहीं रीतिभाती दृष्टीस पडल्या त्यांपैकीं आपणास कांहीं विदित करितों. गावांत वस्ती पाहिली असतां विशेषेकरून दोन जातीची आहे एक मुसलमान आणि एक ब्राह्मण. ब्राह्मण लोकांत बहुतेक सर्व लोक भिक्षुक ह्मणजे याचना करणोर आहेत. ब्राह्मण लोकांचा गावांत एक कट आहे. ह्या गावचा माजी पाटील शंकर नारायण हा मनुष्य फार भोळवट होता असें ह्मणतात व तो गावकीचे बाबदींत ब्राह्मण लोकांची फार दया करीत असे व ब्राह्मणांस पैसेही पुष्कळ देत असे आणि तो जसा पैसे देईनासा झाला तसे गावचे लोक त्याची निंदा करूं लागले. त्याजवर एक वेळ असा कांहीं प्रसंग आला कीं त्या प्रसंगांत गावचे लोकांनीं इनसाफानें जी मदत देणें रास्त होती ती न दिल्यामुळें त्यास हल्लीं कैद भोगावी लागली' आहे व त्याचा अशा परिणामाचा शेवट होण्यास बहुतकरून त्यानें ज्याजवर उपकार केला तेच कारण होते असें ह्मणतात, खरें काय-असेल तें ईश्वरास ठाऊक. दुसरी गोष्ट अशी कीं ह्या गावांत एक मारवाडी आहे त्याचा आणि ब्राह्मणांपैकीं एकाचा देण्याघेण्या संबंधी तंटा झाला आणि होतां होतां अशी वेळ येऊन बितली कीं लागलीच मारहाण झाली व त्या मारहाणींत मारवाड्यास ब्राह्मण लोकांनीं बेदम मारलें तेव्हां मारवाडी यानें माजिस्त्रेटाकडे फिर्याद केली, असें होतांच ब्राह्मणानें कांहीं साक्षीदार ठेविले व त्या बिच्याऱ्या मारवाड्याकडचे कोणीच साक्षीदार नसल्यामुळें एवढ्या मोठ्या मारहाणीचा खटला माजिस्त्रेटास दहा रुपये दंडावर सोडणें भाग पडलें. पुष्कळ अधिकारी लोक ह्या गावास भितात तेव्हां केवढा हा अनर्थ आणि काय हा लोकांचा गहजब. असो.

गावांत बाजार भरत असतो. बाजार भरण्याचा दिवस सोमवार आहे. एथें बहुत लोक टवाळ आहेत ते टोळ्याटोळ्यानीं जमून गरीब व इतर लोक पुरुष अथवा बायका रस्त्यांतून चालल्या असतां त्यांच्या कुचेष्टा करतात, त्यांस लावून बोलतात, त्यांचेकडे पाहून हसतात, हे फार वाईट आहे. शिवाय रिकामें बसण्यांत एकादि मारामारी झाली तर फारच चांगलें, कारण साक्षी देण्यास तयारी. एके दिवशीं रात्रीं माझा स्नेही ह्मणाला कीं चला लायब्ररींत जाऊं तेव्हां मी त्यास विचारलें कीं ह्या गावांत लायब्ररी आहे काय? त्यानें उत्तर दिलें, होय आहे. असें ह्मणतांच मी त्याजबरोबर लायब्ररींत गेलों पहातों तों तेथें दिवा ना बत्ती! नंतर त्यांनीं दिवा वगैरे लाविल्यावर त्या ठिकाणीं लायब्ररीचें चिन्ह कांहींच दृष्टीस न पडतां तेथें एक तंबुरी, मंजरी, चोणकें ( तुंतुणें ) डफ, ढोलकी असें दृष्टीस पडलें तेव्हां मी त्यास विचारलें अहो हें काय? तेव्हां स्नेही ह्मणाले महाराज ही गायन शाळा ह्मणजे लावण्या वगैरे ह्मणण्याची जागा आहे तेव्हां अशा जागेला एथील मंडळीनीं असें योग्य नाव दिलें आहे तें पाहून फारच आश्चर्य वाटलें. मग लावण्या वगैरे गाणें झाल्यावर दुसरा गाण्याचा जो कांहीं प्रकार झाला तो तर पत्रीं सुद्धां लिहिवत नाहीं. येणेंप्रमाणें गावचा नित्यक्रम दृष्टीस पडला. ह्या गावांत हल्लीं महर्गता अतिशय आहे. पाऊस बरेच दिवसांत पडला नाहीं. रात्रीं गावांत चोऱ्या वगैरे पुष्कळ होतात त्यांत चोरीचा असा चमत्कार दृष्टीस पडला कीं चोरी तरी घरचे घरांत होते. गावांत तर बभ्रा फार होतो आणि पोलिसास तर खबर सुद्धां लागू देत नाहींत.

हा गाव कसबा आहे. गावांत पोलिसाचें औटपोस्ट आहे. पोलिसाचा बंदोबस्त साधारण आहे, ह्या गावाला तालुक्याचें गाव मेहेकर आहे, पोलिसाचे चिफाचें ठाणें चिनगाव राजा आहे. ह्या गावावर तहशिलदार आणि चीफ यांचें लक्ष्य विशेष आहे. परंतु असे न्यायी तहशिलदार व निष्पक्षपाती चीफ असून सिंदखेड एथील कसाही खटला त्यांचे समोर गेला असतां त्यास नाशाबित ठरवणें भाग पडतें तर यावरून जें बर मी थोडक्यांत! लोकांच्या वर्तणुकेचें- नित्यक्रमाचें वर्णन केलें आहे तें यथार्थ आहे असें वाचकांस वाटल्यावाचून रहाणार नाहीं, कारण निकाल करणें जरी न्यायाधिशाकडे आहे तरी जबानी देणें पक्षकाराचे हातीं आहे यामुळें ज्या गावचें सूत्र एक दोन गुंडांच्या हातीं असतें तेथें निःपक्षपाती न्यायाधीश झाला तरी त्यानें काय करावें ? नुकताच मुनसरीम यांसीं एकानें तंटा केला होता पण तो पुढें वाढला नाहीं. आतां हें खरें कीं, एथें कांहीं लोक सभ्य, निष्पक्षपाती व उदार मनाचे असेही आहेत पण एकंदर संख्येच्या मानानें त्यांची संख्या फारच कमी असल्यामुळें व इतर गावगुंडांचा समाज फार असल्यामुळें त्यांच्या तेजाखालीं या बिच्याऱ्या भले लोकांचीही कीर्ति दूषित झाली आहे त्यास त्यांचा नाइलाज आहे कळावें. तारीख २० माहे आगस्ट सन १८७७ इसवी

एक फिरस्ता.

वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद शुध्ध २ शके १७९९

## मद्रासेकडे दुसरा दुष्काळ

दोन आठवड्यामागें पर्जन्य न पडून जी स्थिति दिसत होती, व आलीकडे कित्येक ठिकाणीं चांगला पर्जन्य पडला तरी मद्रासेकडील पहिल्या स्थितींत कांहीं बदल झाला नाहीं व तिकडे खास दुसरें सालसाही दुष्काळ पडणार- असें समजून आह्मांस फार वाईट वाटतें. नामदार व्हाईसराय साहेबांची स्वारी तो मुलूख स्वतां पहाण्याकरितां मोठ्या परिश्रमांनें तिकडे गेली, इतक्यांत कृपाळु परमेश्वरानें चांगला पर्जन्य तिकडे पाडला असता तर मोठी संतोषाची गोष्ट झाली असती. तरी व्हाईसराय साहेब बाहेर निघाल्या नंतर वायव्यप्रांत, गुजराथ, काठेवाड, वऱ्हाड, हैदराबाद, व दक्षिण इतक्या ठिकाणीं चांगला पाऊस पडला. व तेथील तेथील दुष्काळ पडण्याची भीति कमी झाली ही थोड्या संतोषाची गोष्ट आहे असें नाहीं. एकल्या मद्रास इलाख्याला या वर्षीं जगविण्याला सरकाराला ९ कोट रुपये लागणार आहेत. शिवाय जमीनीचा सारा बुडाला तो मुदलांत तोटा. तेव्हां त्याचप्रमाणें मुंबई इलाख्याची व वायव्यप्रांताची स्थिति असती तर केवढी भयंकर गोष्ट झाली असती व सरकारास किती कोट रुपये खर्च आला असता याची कल्पना आमचे वाचकांस सहज करितां येईल! अस्तु. अजूनही मद्रास इलाख्यावर ईश्वरानें कृपा करावी अशी आमची त्यास प्रार्थना आहे.

व्हाईसराय साहेब मद्रासेकडे जाऊन ड्यूक आफ बकिंगहाम तेथिल गवरनर यांस भेटल्या नंतर जो एकंदर संकेत ठरला त्याजबद्दल तारायंत्रांतून गेलेले लेख इंग्रजी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाले आहेत त्यांचा आशय आह्मी आपले वाचकांस कळवितों.

पहिला दुष्काळ अजून चांगला संपला नाहीं तोंच दुसऱ्याची उठावणी झाली आहे. हिंदुस्थान सरकारचा असा हेतु आहे कीं माल जाण्या येण्यास सर्वत्र सुलभता करावी, व लोकांच्या खासगी उदीम व्यवहारास बिलकूल अडथळा आणूं नये तो चालण्यास सहाय्य होईल तितकें करावें. जेथें लोक माल पोंचविणारच नाहींत तेथें सरकारास त्याविषयीं तजवीज करावी लागेल. सार्वजनिक कामें काढून गोरगरीबांचें संरक्षण केलें जाईल. तसेंच दुर्बळ व व्यंग हे मरूंच लागले तर धर्मार्थ अन्न देऊन जगविले जातील. सारांश कोणावर अन्नावाचून मरण्याची पाळी न येऊं देण्याविषयीं सरकारच्यानें होईल तितकें सरकार करील. दक्षिण हिंदुस्थानांत कित्येक ठिकाणीं पेरलेलें धान्य सुकून गेलें व बाकीचें पावसावाचून मोठे धोक्यांत आहे. धान्याच्या किमती हरहमेशापेक्षां चौपट पाचपट वाढल्या आहेत. २९ लक्ष मनुष्यें सरकारानें जगविलीं पाहिजेत असा अजमास आहे. त्यां पैकीं साडेचार लक्ष लोकांस हमेशाचीं कामें पुरतील व बाकींच्या करितां नवीं कामें योजिलीं पाहिजेत. स्थिति मोठी भयंकर आहे. तरी लोकांस सरकार उपाशी मरूं देणार नाहीं. कालवे, रस्ते, आगगाड्या ट्रामवे अशा प्रकारचीं कामें काढून दुष्काळाच्या भागांत धान्य पोंचविण्याची होईल तितकी खटपट सरकार करील. बंगाल्याकडील उडीसा प्रांतासारखीच या दुष्काळाची स्थिति आहे. तिकडे सरकारानें स्वतां दुकानदार होऊन धान्याचा पुरवठा केला होता पण इकडे तसें करण्याचें कारण दिसत नाहीं. कां तर लोकांचा खासगी व्यापार इकडे मोठा भारी आहे. गडबड दुराचार व भ्रष्टता न होऊं देण्याविषयीं काळजी घेतली जाईल. कित्येक गावांच्या मध्यावर मोठमोठाले कामांचे तळ दिले जातील व निराश्रितांकरितां गावागावांच्या लगतही कामें काढून कोणास फार लांब भटकूं दिलें जाणार नाहीं. धर्मार्थ मदत लोकांकडून किति होते ती पाहून बाकीची सरकार करील. ४९०० टन धान्य मद्रास इलाख्यांत अशा लोकांच्या चारितार्थाकरितां दररोज गेलें पाहिजे. गाड्यांना बैल तरआतां मिळणार नाहींत, तेव्हां आबडधोबड ट्रामवे करावे किंवा रेलवेचे नजीक लोकांस आणून वसवावें किंवा पिकाऊ प्रांतांत लोकांस वसतीकरितां पाठवावें याविषयीं सरकार विच्यार करणार आहे. साऱ्या हिंदुस्थानांत इंजिनियरी कामाची जेथें जेथें उत्तम वाकबगारी आहे तिचा उपयोग मद्रासेकडे आतां केला जाईल, व कोणकोणतीं कामें केलीं असतां पुढें अक्षय फायद्याचीं होतील तीं पाहून त्याच्याच मागें लोक लावले जातील. व त्यांकरितां एक स्पेशियल चीफ इंजिनियर नेमला जाईल. मुंबई इलाख्याकडे गुदस्त सालीं जनरल किनडी यांनीं फार चातुर्य खर्च केलें याबद्दल व्हाइसराय त्यांची स्तुती करितात. जर पाऊस चांगला पडला नाहीं तर हा दुष्काळ सन १८७८ च्या आगस्ट महिन्यापर्यंत राहील व तेथपर्यंत सरकारचे प्रयत्न चालू रहातील. लक्षावधि लोकांचें जीवन सरकारावर आतां अवलंबून आहे. मुंबई इलाख्यांत मद्रासे इतकें आतां भय नाहीं. तिकडे या वर्षीं पाऊस बराच झाला आहे. म्हैसूरची स्थिति मात्र मद्रासेपेक्षांही भयंकर आहे. व्हाईसराय साहेबाचा हा प्रवास करण्याचा हेतु महासचे गवरनर ड्यूक आफ बाकिंगहाम यांस भेटून त्यांशीं सल्ला मसलत करून हिंदुस्थानचा किति खजीना त्यांच्या सहाय्यास लागेल त्याचा खुलासा करावा हा आहे. गवरनर साहेब व त्यांच्या हाताखालील मंडळी या कामासाठीं जे प्रयत्न करीत आहेत त्यांस आडवा यावें असा हिंदुस्थान सरकारचा बिलकूल इरादा नाहीं. पोक्त विचारानें व पक्या तजविजीनें सर्व काम व्हावें इतकीच त्यांची इच्छा आहे. मुंबईचे जनरल किनडी यांस ड्यूक साहेबांचे पर्सनल असिस्टंट केलें आहे व त्यांच्या आणि ड्यूक आफ बकिंगहाम यांच्या विचारानें जी गोष्ट करण्याचें ठरेल ती त्यांनीं अपमुख्त्यारीनें करावी. हिंदुस्थान सरकारास लिहिण्याचें कारण नाहीं असें ठरविलें आहे. दुष्काळ संबंधाचे सर्व रिपोर्ट जनरल किनडी यांचे हातून होत जातील. व्यवस्था व प्रसिद्धी वगैरे सर्व मुंबई इलाख्याप्रमाणें रहावी असा संकेत आहे. कामाचे थोडथोडे भाग करून देखरेखीला पुरेसे आफिसर ठेवणार. ६० इंजिनियर व स्टाफ पैकी १०० लष्करी आफिसर मदतीला देण्याचें हिंदुस्थान सरकारानें कबूल केलें आहे. पाट बंधाऱ्याचीं मोटमोठालीं ६ कामें ड्यूक आफ बकिंगहाम यानीं योजिलेलीं आहेत. व तीं करण्यास त्यांना कुलमुखत्यारी दिलेली आहे. व त्यांना जें उणें पुरें दिसेल व त्या करितां ते हिंदुस्थान सरकारास जी मदत मागतील ती देण्यास ते तयार आहेत. मुंबई इलाख्यांत पाऊस पडला व सुकाळ होईल अशी आशा उत्पन्न झाली आहे. व गुजराथ आणि काठेवाड इकडे अनावृष्टी झालीच तर काय करावें याविषयीं जनरल किनडी यानीं योजना करून ठेविली आहे. त्या प्रमाणें कारण पडेल तर एकदम आफिसर लोक पाठवून कामांची सुरवात केली जाईल,

## अकोल्याची म्युनिसिप्यालिटी.

अकोला शहर दिवसानुदिवस वाढत आहे व चांगल्या स्थितीस येत आहे. येथें सरकारी आफिसर पुष्कळ आहेत. साऱ्या वऱ्हाडचे जुडिशियल कमिशनर येथें आहेत; व्यापार आलीकडे बराच वाढत चालला आहे. बाजारांत दुकानांच्या मोठमोठ्या हवेल्या उठत आहेत. या सर्व गोष्टी पाहिल्या ह्मणजे मोठा संतोष होतो. आणि नंतर एथील म्युनिसिप्यालिटीकडे लक्ष द्यावें ह्मणजे बरेंच वाईट वाटतें. एथील म्युनिसिप्यालिटी फारच दरिद्र दर्शेत आहे. तिला उत्पन्न वर्षाचें पांच सहा हजार रुपये आहे. त्यांतून पोलिसास सुमार दोन हजार रुपये जातात. दवाखान्याकडे सुमार दीड हजार रुपये जातात. व इस्टाब्लिशमेंट आणि शहर सफाई यांकडे बाकीचे रुपये जातात. नवें काम ह्मणण्याजोगें होण्याला म्युनिसिप्यालिटीकडे फंडच नाहीं व आहे तोही फार कमती आहे यामुळें शहराला सोई असाव्या त्यापेक्षां फार कमी आहेत. तालुक्याचें ठिकाण खामगाव तेथें म्युनिसिप्यालिटीला सुमार बीस हजार रुपये उत्पन्न आहे व अकोल्यास त्याच्या निमेही नसावें ही मोठी दुःखाची गोष्ट आहे.

आतां म्युनिसिप्यालिटीला फंड थोडे यामुळें सर्वच गोष्टी संक्षेपानें चालतात. साऱ्या शहराचें रात्रीं रक्षण करण्यास पोलिसचे लोक डझनभर आहेत. त्यांत निमे गावांत व निमे नदीपलीकडे. मग बंदोबस्तास काय पहावयाचें आहे! ईश्वराचे कृपेनें आजवर चोऱ्या फारशा झाल्या नाहींत परंतु असाच काळ सर्वदा राहील असें समजतां कामां नये. काळ हल्लीं बदलत चालला आहे, व चोरटे लोक वर डोकीं उचलूं लागले आहेत. आतां एवढी गोष्ट संतोषाची आहे कीं, आमचे एथील पोलिस अधिकारी फार हुशार व मेहनती आहेत; तथापि नुसत्या त्यांच्या स्वतांच्याच करामतीनें या वाढत चाललेल्या शहराचा अशा काळांत उत्तम बंदोबस्त राहील असा नेम नाहीं. ह्मणून रात्रीं गस्त घालणारे लोक पुष्कळ व चौकाचौकावर आणि शहराच्या कोपऱ्याच्या भागावर पोलिसचीं कांहीं गेटें ठेवणें फार अवश्य आहे याखेरीज शहरचा चांगला बंदोबस्त होणें नाहीं. चोरटे लोक इतके बेदर्द झाले आहेत कीं, ते प्रसंगीं जीव घेण्यासही कमी करावयाचे नाहींत. गेल्या बुधवारीं रात्री रा. रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर जु० कमि० आफिसांतील डिपुटी क्लार्क यांच्या घरीं चोर आले होते त्यांनीं चोरी केली एवढेंच नाहीं पण निजल्या ठिकाणीं त्यांच्या कुटुंबास काठ्या मारिल्या व त्यांनीं एका चोरास धरिलें असतां दुसऱ्यानें त्यांच्या मस्तकावर इतकें जबरदस्त मारिलें कीं तें रक्तबंबाळ झालें, व त्यांनां तिरमिरी येऊन त्यांच्या हातून चोर सुटून सर्व पळून गेले. ही केवढी भयंकर गोष्ट आहे! रा. रा. रंगो रामचंद्र वकील यांच्यां घरीं आलेला चोर धरला तेव्हा त्यानें बोलून दाखविलें कीं, मी तुमचा कधीं तरी जीव घेईन. अशा तऱ्हेची अकोल्यासारख्या शहरांत स्थिति असणें किती वाईट आहे! यासाठीं पोलिसचे लोक बंदोबस्तास अधिक पाहिजेत. व ते अधिक लोक सरकार आपले खर्चानें देत नाहीं. म्युनिसिप्यालिटीनें निमा पैसा दिला तर सरकार निमा देऊन अधिक भरती देणार. आणि म्युनिसिप्यालिटीची तर सदरीं लिहिल्याप्रमाणें निकृष्ट स्थिति आहे तेव्हां ही गोष्ट होणार कशी आणि लोक निर्धास्त होणार कसे तें कळत नाहीं.

अंधाऱ्यारात्रीं रस्त्यांतून कंदील असणें हें चोऱ्यांच्या बंदोबस्तास एक चांगलें साधन आहे पण तेंही येथील म्युनिसिप्यालिटीकडून होत नाहीं. अकोल्यास आज १८ वर्षें म्युनिसिप्यालिटी आहे आणि तिजकडून कंदील लावण्याचें काम देखील आजपर्यंत झालें नाही व तिला तें करण्यास अनुकूलता आली नाहीं ही गोष्ट सामान्य उणेपणाची आहे असें नाहीं. दुसऱ्या कित्येक खर्चांत, हाही एक अवश्यक खर्च आहे आणि तो झालाच पाहिजे असें म्युनिसिप्याटीनें मनांत आणिलें असते तर, झाला नसता असें आह्मांस वाटत नाहीं. ही गोष्ट निघाली होती तेव्हां येकवेळ नेटानें कंदील विकत आणूनही ठेविलेले आहेत व खांबही त्यांकरितां करविले होते पण दिवे लावण्याचा प्रकार घडून आला नाहीं. व कित्येक वर्षे ती गोष्ट पुन्हा मागें पडून खांब कुजून सडून त्यांचें लिलाव झालें व कंदीलांतही फूट तूट बरीच झाली हें पाहून आह्मास फार वाईट वाटतें व सा

ऱ्या लोकांस या योगानें अतिशय त्रास हो तो व त्यांचा वित्त विषय चोरीस जाण्यास "रस्त्यांतून गुडुप अंधार" हें एक मोठेंच साधन म्युनि० कडून राहिलेलें आहे असें त्यास वाटून ते म्युनिसिप्यालिटीस दोष देतात.

म्युनिसिप्यालिटीकडे पैसे नसल्यानें श हरांत सडकाहीं सर्वत्र नाहींत आणि आहे त त्या चांगल्याशा नाहींत. कित्येक भागा त अजून सडका झाल्याच नाहींत व तेथें कशी स्थिति असते ती गंजांतून नवाबपुऱ्या कडे जाऊन पहावी. तसेंच जेथें जेथें सड- का झाल्या आहेत त्याची अवस्था पर्जन्य पडून गेल्या नंतर गर्द चिखलानें कशी होते ही तर प्रसिद्ध रस्त्यावर सर्वांच्या प हाण्यांत येतेंच आहे.

इत्यादि प्रकार पाहिला ह्मणजे अको ल्याच्या म्युनिसिप्यालिटीस जीं कामें कर- णें अवश्य आहे तीं करण्यास प्रस्तुतच्या स्थितींत तिला बिलकूल ताकत नाहीं हें खचित आहे. व याजविषयीं कांहीं विच्या र न झाल्यास पुढें कित्येक वर्षें ही अशी चे ओटालोट चालेल. पण अशी स्थि ति असणें बरोबर आहे कीं काय, याचा म्युनिसिप्यालिटीच्या मेंबरांनीं व विशेषें प्रमुखांनीं विच्यार करावा. व तिचें फंड वा ढेल आणि सर्व कामें सुयंत्र चालतील अ शी तजवीज अवश्य करावी. वर्षेच्या वर्षे अशी दीनावस्था राहूं नये.

पोलिसपट्टी सारी दोन हजार रुपयेही येत नाहीं सबब तो कर बंद करून शह रांत येणाऱ्या मालावर जकात बसवावी अ सा मागें विचार चालला होता व एक गृह स्थ दहा हजार रुपयांस जकातीचा मक्ता घेण्यासही तयार झाले होते पण त्या प्रक- रणाचा पूर्ण विचार होऊन तें रेसिडेंट साहेबांकडे अजून गेलें नाहीं, दोन वर्षें झालीं कमिटीच्या दप्तरांत आहे. त्यास म्युनिसिप्यालिटीनें पुन्हा जागृति दिली व तें पास करून आणविलें तर या शहरांती ल म्युनिसिप्यालिटीचीं कामें चांगली व सुर ळीत चालतील, नाहीं पेक्षां हा काड्या मोड्याचा खेळ असाच चालावयाचा व लोकांचीं गाऱ्हाणीं अशींच चालू राहून वा रंवार दोष माथीं यावयाचा असें आह्मा- स वाटतें. सबब म्युनिसिप्यालिटीनें कृपाळु पणें या सर्व गोष्टीचा अवश्य विचार करा वा व झटून उद्योग करून जमेला एखादि मोठीशी बाब काढावी असें आह्मी इच्छितों.

**नवीन वर्तमानपत्र**— पुण्यास तारी- ख २६ आगष्ट पासून किरण या नावाचें इंग्लिश मराठी एक वर्तमानपत्र निघूं ला- गलें आहे. त्याचे दोन अंक त्याच्या कर्त्यां- नीं आह्मांकडे पाठविले ते आदरपूर्वक आह्मी ग्रहण करितों. याचे कर्ते चांगले विद्वान असावेत व ते उत्तम रीतीनें पत्र चालवितील असें त्याच्या शोकावरून दिसू न येतें. पत्रही बरेंच मोठें ह्मणजे फूलस्के- प साच्याचे ४ तावांचें आहे. व त्याची किंमत डाकहाशिलासुद्धां १० रुपये आ हे. यास पुष्कळ वर्गणीदार मिळून ते दी र्घकालमर्यादा चालो असें आह्मी इच्छि तों. पुण्यासारख्या नामांकित ठिकाणीं या पत्राचा उदय आहे. आणि त्याचप्रमाणें तेथील नामांकित लोक त्यास हातीं धरून हें किरण भव्यप्रकाश व अक्षय नामांकित करितील अशी आह्मी उमेद बाळगतों.

---

वऱ्हाडांत शाळाखातें स्थापन होऊन आज बरेच दिवस झाले पण येथील लो कांचें आजवर तिकडे लक्ष्य गुंतलें आहे अशाविषयीं कांहीं विशेष क्रम घडल्याचें प्रसिद्ध नाहीं पण अलीकडे शाळांकडे गावकरी लोकांचें व तालुक्याचे अधिका ऱ्यांचें बरेंच लक्ष्य पोंचल्याचें दिसून येतें. प्रांतांतील बहुतेक लोअरक्लास स्कुलांतून सुद्धां मुलांस वार्षिक बक्षिसें वाटण्याचे प्रसं- गीं बरेच समारंभ होऊन शाळांना घाटा, घड्याळें इत्यादि उपयोगीं सामानाकरितां २०,२१,१० व १०० रुपये देखीलउदा र लोकांकडून मिळाले आहेत व तशीं पत्रें आमचे पत्रांतून कित्येक ठिकाणांहून आले लीं प्रसिद्ध झालीं आहेत. त्याचप्रमा- णें खडीधामणी एथें मंगरूळपीरचे तह- शिलदार मि. शावासखा यांनीं वार्षिक ब क्षिसें वाटण्याचा समारंभ सुशोभित करून कांहीं गरीब मुलांस फी देण्याचें सामर्थ्य नाहीं असें दिसून आल्यावरून त्या करि तां १०१ रुपयांची वर्गणीनें रक्कम जमवि ली व त्याचे व्याजावर अनाथ मुलांची फी देण्याचें ठरविलें यावरून वऱ्हाडी लोकांस विद्येची अभिरुची लागत चालल्याचें दि सून येतें व त्याचप्रमाणें अधिकारी लोकही विद्यावृद्धीकडे अधिक लक्ष्य पोचवूं लागले आहेत हें पाहून आह्मास संतोष वाटतो.

---

## वऱ्हाड.

गेले रविवारीं व सोमवारीं रात्रीं एथें चांगला पाऊस पडला. व तेणेंकरून नदीलाही चांगला पूर आला होता. त्यापु ढें पाऊस नाहीं. पिकें चांगलीं आहेत. हवा स्वच्छ आहे. शुक्रवारीं कुणबी लोकां नीं पोळ्याचा सण मोठ्या आनंदानें केला.

हैदराबादेकडे पावसाची हाकाहाक होती परंतु गेल्या आठवड्यांत तिकडेही उत्तम पाऊस पडला असें वर्तमान आहे.

---

विद्याखात्याचे डायरेक्टर रा. रा. नारा यण भाई यांस दिल्ली दरबारचे प्रसंगीं राव बहादूर किताब मिळाला त्याची सनद गेले आठवड्यांत सरकारांतून त्यांस मिळाली.

---

मि० म्याकिंटाश साहेब उमरावतीच्या हाय स्कुलावरील माजी हेड मास्तर ने तुर्कस्थानांत गेले होते व जातां जातां मो- ठें नाव करून गेले होते, त्याप्रमाणें तिकडे ही त्यांनीं मोठें नाव केलें. तें इतकें कीं, यांच्या लीला कानस्टांटिनोपलच्या लोकां- स न आवडून त्यांनीं त्यास कैदेंत टाकिलें आहे. व ती कैद बऱ्याचकालमर्याद त्यास भोगावी लागेल असें तिकडून लिहून आलें आहे. प्रतापी पुरुष कोठेंही गेले तरी यांचा प्रताप झाकून रहात नाहीं !

---

गेले बुधवारीं रात्रीं रा. रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर जुडिशियल कमिशन रचे डिपुटी क्लार्क आफ धि कोर्ट यांचे घरीं चोरटे येऊन त्यांनीं दाराजवळील भिंत फोडून आंतील कडी काढिली व निजण्याच्या खोलींत जाऊन कापडांनीं भरलेल्या दोन पेट्या चोरून नेल्या. एका पेटींत दागिन्याचा डबा व चांदीची भांडींही होतीं. त्या पेट्या लांबवून पुन्हा एक चोरटा वासुदेवरावाच्या बायकोच्या अंगावरील पाटल्या वगैरे काढण्याचे इरा द्यानें बिछान्याशीं येऊन बसला इतक्यांत वासुदेवराव जागे झाले व त्यांनीं त्याला पकडला. इतक्यांत त्याच्या मदतीवर अ सलेल्या दुसऱ्या चोरानें पाठीमागून येउन वासुदेवरावांच्या डोक्यावर व पाठीवर जो- रानें दोन तीन सोटे मारिले. तेणेंकरून रक्त पुष्कळ वाहून त्यांस घेरी आली, व हा त ढिले पडले, तों तो धरलेला चोरहीपळू न गेला. चोरी तर झालीच पण हे वासु देवरावांच्या जिवावरचें अरिष्ट टळलें. बरें तर बरें, नाहींपेक्षां डोक्यावरचा तडाखा बोटभर पुढें आलावर लागला असता तर तत्काल प्राणघातही झाला असता. चोरट्यांचा अजून पत्ता नाहीं. दुसरे दिव शीं सकाळीं मि० साबियल साहेब इन्स्पे- क्टर यांनीं फार बारकाव्यानें तपास करून दोन मैलांवर पेट्या व कापड चोरांनीं टाकून दिलेलें हुडकून आणिलें. त्यांत दोन चांदीचीं भांडींही सापडलीं. पुढें तपास चालूं आहे. वासुदेवराव त्या मा रानें दोन दिवस आजारी होते. त्यांनीं झोपेंतून उठून चोरांस धरलें हें त्यांचें धैर्य वाखाणण्यायोग्य होय. व मागें कुमक न- सती तर तो चोर त्यांच्या हातून कधीं सुटला नसता, पण होणारे गोष्टीसइलाज काय ?

---

रा. रा. वामन त्रिंबक भवाळकर मूर्ति- जापुरचे स्कुलमास्तर पेनशन घेण्याच्या इ राद्यानें डायरेक्टर साहेबास भेटण्याकरि तां एथें आले होते.

---

रा. रा. श्रीधर बाळकृष्ण आपटे उम रावतीच्या इंजिनियर आफिसांतील क्लार्क यास धोंड मनमाड रेलवेकडे ८० रुपये पगारावर अकौंटंट नेमिलें. हे मोठे हुशार व लोकहिताचे कामीं दक्ष आहेत सबब यांच्या बढतीनें बहुतांस संतोष झाला आहे.

---

बुलढाणें जिल्ह्यांतील चांदोळ्याहून ए क पत्र आलें आहे त्यावरून समजतें कीं, बोदेगांव नावाच्या खेड्यावर १९ वे ता रखेस डाका पडला. ३० लोक होते ते मशाली, वाद्यें वगैरेच्या मिरवणुकीच्या था टानें गावांत शिरले. कित्येक लोकांस त्यांनीं तरवारीनें जखमा केल्या. सोनाराचें नाक कापलें व एका कोमट्यास मशालीचे चट- के देऊन त्याचे घरावर दरवडा घातला. त्यांतील मांग जातीचा एक मनुष्य गाव कऱ्यांनीं धरीला. व दुसरे दिवशीं मि० रा ईट साहेब पोलिस सुपरइंटेंडेंट व रा. रा. अमृतराव देशमुख यांनीं १७ चोर पकडले.

---

काल परवा एथें युरोपियन लोकांच्या चेंडूफळीच्या खेळाची फार मौज झाली. वर्षास हा खेळ होत असतो त्याचप्रमाणें यंदा झाला. इलिचपुराहून ब्यांडवाला आ णविला होता. यवतमाळ, इलिचपुर, उम रावती, वाशीम, बुलढाणें एथून कित्येक युरोपियन लोक या खेळाकरितां एथें आले होते. यासाळांत पूर्व वऱ्हाड व पश्चिम वऱ्हा ड अशी दुफळी असते त्याचप्रमाणें यंदा ही होती. प्रथम दिवशीं ह्मणजे शुक्रवारीं पूर्व वऱ्हाडचे रन्स १४३ व पश्चिम वऱ्हा- डचे सारे ८० झाले होते व त्यावरून प श्चिम वऱ्हाड हरेल असें दिसत होतें पण काल शनिवारीं पश्चिम वऱ्हाडच्यानीं फा र उत्तम कामगिरी बजावली यामुळें त्यांचे रन्स १९३ व पूर्व वऱ्हाडचे १२८ झाले. व एकंदर बेरीज पूर्व वऱ्हाडची २७१ व पश्चिमवऱ्हाडची २७३ होऊनपश्चिम वऱ्हा ड विजयी झालें. व या पश्चिम वऱ्हाडांत डिपुटी कमिशनर मे. मेनसाहेब, असिस्टंट कमिशनर मि. हेर साहेब, जेलर मि. ला साहेब, अपाथिकरी डा. रीड साहेब व वा शीमचे मि. चार्लस साहेब हे फार उत्तम खेळले असें समजतें.

---

मे० स्मिथ साहेब हैदराबादचे फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट व आफि० यर्ड क्लास पो लिटिकल एजंट यांस आफि० सेकंड क्ला स पोलिटिकल एजंट केलें.

---

असिस्टंट व एक्स्ट्रा असिस्टंटकमिशनर यांची वार्षीक परिक्षा अकोल्यास जुडिशि यल कमिशनर आफिसांत नोवेंबरचे १९ वे तारखेस होईल. इतर कायद्याबरोबर रे जिस्ट्रेशनचा सन १८७७ चा तिसरा का यदाही उमेदवारास विच्यारिला जाईल.

---

मेजर बेल साहेब जुडिशियल कमिशन र यांचे एथें ले० कर्नल मेंजिस साहेब उ मरावतीहून पाहुणे आले आहेत त्यांची पेटी परवाचे दिवशीं चोरीस गेली. ति- च्यांतील कपडे वगैरे चोरानें टाकून दिले व नगद ५९ रुपये लांबविले. यांचा पत्ता अजून लागला नाहीं.

---

## वर्तमानसार

गेल्या आठवड्यांत टर्कांची सरशी हो ती पण या आठवड्यांत रशियनांची आहे.

दुष्काळफंडाकरितां विलायतेहून आज वर ८लक्ष रुपये धर्मात्मे लोकांकडून आले.

गेल्या आठवड्यांत मुंबईत चांगला पा ऊस पडून हवेत थंडावा आला आहे. या- च मुदतींत सुरत, नाशिक, खानदेश व अहमदनगर इत्यादि ठिकाणीं जिकडे आ जपर्यंत पाऊस मुळींच नसून सर्व प्रकारें दुष्काळाचें भय प्राप्त झालें होतें तिकडेही चांगला पाऊस पडला असें समजतें.

लखनौ येथील वर्तमानपत्रावरून कळतें कीं, हर्दोई जिल्ह्यांतील सांडिला नांवाचे गावांतून एक स्त्री एका डोलींत बसून जात होती, एवढ्यांत अर्ध्या वाटेवर तिघे चोर हातांत तलवारी घेऊन अंगावरील

दागिन्याचे आशेनें आपलेजवळ येतात असें पाहून तिनें हें वर्तमान आपले पुढें गेलेल्या नवऱ्यास जाऊन सांगण्याकरितां त्या डोलीवाल्यांस सांगितलें. एवढ्यांत ते चोर जवळ येऊन दागिने मागावयास लागले व तिनें कांहींएक न बोलतां ते सर्व आंगावरून काढून दिले. ह्यांत त्यांची तृप्ती न होतां आंगावरील कपडेही मागूं लागले. ह्या वेळेस कंबरेच्या साडी सभोंवती बांधलेल्या दोरीची गांठ शस्त्राशिवाय सुटणार नाहीं असें सांगून तिनें त्यांपैकीं एकाची तलवार घेतली व ती गांठ तोडतांना साडी कदाचित खालीं पडल्यास आपली लाज राखण्याकरितां तिनें त्यांस आपलेकडे पाठ करून उभे रहाण्यास सांगितलें. ते त्याप्रममाणें उभे राहिल्यावर तिनें लगेंच त्या तलवारीनें त्या चोरांपैकीं दोघांचीं डोकीं उडविलीं व तिसऱ्यास बरेंच घायाळ करून सोडून दिलें. ही स्त्री सुमारें १९ वर्षांची होती.

रंगून येथें प्रोमि नांवाचे शहरांत एके दिवशीं पाण्याचा असा पूर आला, कीं तेथील आगगाडीचें स्टेशन अजिबात दिसेनासें झालें. एंजीनमधील विस्तव न राहिल्यामुळें आगगाडीस हत्ती लावून ती चालविणें भाग पडलें. सु. प.

## रा. ब. गोपाळराव हरी देशमुख.

दिल्ली दरबारच्या वेळीं ठरल्याप्रमाणें ठाण्याचे जाइंट जज्ज व सेशन जज्ज मि. गोपाळराव हरी देशमुख यांस 'रावबहादूर' हा किताब देण्याचा समारंभ किंवा दरबार हिंदुस्थान सरकारच्या हुकुमावरून मागील शनवार ता. १ माहे सप्तंबर सन १८७७ रोजीं ठाण्याच्या अदालतीच्या बांड्यांत भरला होता व दरबारचे अध्यक्ष ठाण्याचे जज्ज मि. कागलन यांणीं प्रसंगाप्रमाणें मि. गोपाळराव यांस हा किताब देण्याचा समारंभ एथें माझ्या हातून करण्याचें ठरल्यावरून मला फार आनंद वाटतो असें सांगून यांणीं ३४ वर्षें सरकारची चाकरी फार उत्तम रीतीनें केली व त्यांणीं कोणकोणत्या खात्यांत काम केलें हें सांगून इनाम कमेटी खातें हें फार नाजूक व अति महत्वाचें असतां त्यांत त्यांणीं फार उत्तम काम केल्याबद्दल स्तुती केली. नंतर इंग्रजी राज्यापासून नेटिवांची सुधारणा होत चालली आहे व त्या मानानें थोड्याच दिवसांत असल्या समारंभास नेटिव स्त्रियाही येऊं लागतील अशी आशा आहे असें सांगितलें. नंतर हजर असलेले हायकोर्टाचे जज्ज मि. पिन्ही यांची वाखाणणी करून त्यांणीं ठाण्याच्या वकिलांची फार सुधारणा केली असें सांगून आपणही वकिलांची स्तुती केली. नंतर जमलेल्या युरोपियन व नेटिव लष्करी कामदारांची स्तुती करून त्यांच्या शूरत्वाचें वर्णन केलें आणि शेवटीं नेटिव वर्तमानपत्रांबद्दल हल्लीं जरी कियेक कांगाळ्या येत आहेत तरी तीं दिवसेंदिवस सुधारत चाललीं असून लवकरच इंग्लंड व अमेरिका यांच्याप्रमाणें योग्यतेस येतील अशी आशा आहे असें ह्मणाले व पुन्हा मि. गोपाळराव यांकडे वळून त्यांची थोडी तारीफ करून "राव बहादूर" पदवीची सोनेरी शाईनें छापलेली सनद त्यांच्या हातांत दिली व खालीं बसले. नंतर मि. गोपाळराव यांणीं ती सनद घेऊन आपण आपल्या शक्तीप्रमाणें जीं थोडीं कामें केलीं त्याबद्दल सरकारानें आपला सन्मान केल्याबद्दल आनंद प्रदर्शित करून सरकारची थोरवी व न्यायीपणा यांचें वर्णन केल्यावर ते खालीं बसले व लागलींच वकिलांच्या तर्फे मि. चिंतामण सखाराम करंदीकर यांणीं मि. कागलन व मि. गोपाळराव यांची जज्ज या नात्यानें स्तुती करून राव ब. गोपाळराव हे १८४४ सालीं साधे कारकून असतां आज जज्ज झाले व ते मोठे अनुभवी, हुशार व योग्य असून नेटिवांत व विशेषेंकरून ब्राह्मणांत, असलीं मोठालीं कामें करणारे लोक आहेत असें यांनीं सिद्ध करून दिल्याबद्दल त्यांचे सर्वांवर उपकार आहेत असें सांगून जज्जाच्या जागा सनदीकरतांच असून त्या जागा बिनसनदी नेटिवांस द्याव्या असा जो स्टेट सेक्रेटरीनीं ठराव केला त्याचें हें पहिलेंच उदाहरण असून तें याच इलाख्यांत झाल्यामुळें सर्वांच्या तर्फें सरकारची स्तुती करून आभार मानले आणि हार तुरे होऊन दरबार खलास झाला. या समारंभास गावांतील बऱ्याच लोकांस आमंत्रणें केलीं होतीं व त्यावरून लोकांची गर्दीही बरीच झाली होती. मि. देशमुख हे आजपर्यंत जज्ज किंवा कामदार या नात्यानें राव ब. होते. पण आतां खासगी रीतीनेंही राव ब. झाले हें त्यांस व आह्मा सर्वांस भूषण असून पूर्वीं असि. जज्ज व हल्लीं जाइन्ट जज्ज या हुद्यास नेटिवांपैकीं निदान कांहीं लोक तरी लायक आहेत असें यांणींच सिद्ध करून दिल्यामुळें ते स्तुतीस पात्र असून त्यांचे आह्मा सर्वांवर उपकारही आहेत, पण त्यांची हल्लींची योग्यता, त्यांणीं इनाम कमेटीपासून आजपर्यंत बजावलेल्या कामगिऱ्या, या सर्वांस हा मिळालेला फुकट्या भिकार किताबाचा मोबदला फारच लहान असल्यामुळें, वाईट वाटतें. साधारण एकादा दरोडा पकडणारे कित्येक पोलिस इन्स्पेक्टर, अमुक पूल पडण्यास झाला आहे अशी वर्दी लावणारे साधे मामलेदार, एकाद्या शहरांतील किंवा गावांतील रस्ते किंवा गटारें स्वच्छ ठेवण्याकरितां झटणारे मुन्सफ, असल्या लोकांसही वरील प्रकारचे किताब मिळालेले असल्यामुळें, मि. व आतां झालेले रावबहादूर देशमूख, यांणीं अतिश्रमानें, अतिस्वामिभक्तीनें व अतिशहाणपणानें सातारा, नगर वगैरे जिल्ह्यांत जीं इनामकमेटीचीं वगैरे कामें केलीं त्यांसही तसलाच किताब देऊन त्याच मालिकेंत ढकलून दिलें हें चांगलें झालें नाहीं असें ह्मणावें लागतें. व यापासून मि. देशमुखांसही आनंद झाला असेल असें वाटत नाहीं. आतां मि. देशमूख हे वयोवृद्ध झाले असून त्यांची चाकरीची हयात फारच थोडी राहिलेली असल्यामुळें त्यांच्या समाधानाची सरकार फारशी काळजी करीत नसेल, पण तसें असलें तरी मि. देशमुखांनीं जसल्या कामगिऱ्या बजाविल्या तसल्या कामगिऱ्या बजावणें अवश्य आहे अशा प्रकारचें एकादें नवें खातें सरकारच्या मनांत उपस्थित करण्याचें असल्यास त्या वेळीं मि. देशमुखांसारखे लोक मिळणें फार कठीण पडेल याचा सरकारानें विचार करणें जरूर होतें. असो, झालें हें सर्व चांगलें झालें व या नव्या किताबाचा उपयोग मि. देशमुख हे पुष्कळ काळपर्यंत सुखानें घेतील अशी अशा आहे. अ. द.

## नोटिस

नेमिचंद वलद चुडामण अगरवाले राहणार अकोट यास खालीं सही करणार याजकडून नोटिशीचा जबाब देण्यांत येतो कीं तुह्मी तारीख १८ माहे आगष्ट सन १८७७ इसवीची नोटिस वऱ्हाडसमाचार छापखान्यांतून मजकडे पाठविली ती पावली तिचें उत्तर

लाडेगाव व वसाळी ऊर्फ नागापूर व मौजे अवरंगाबाद तालुके अकोट असे तीन गावीं पाच शेतें माझे नावें असून त्यांत तुमचा तिसरा हिस्सा आहे व सर्वे जमाबंदी समयीं रजिस्टरास दाखल आहे हें तुमचें लिहिणें खरें आहे. मागें तुह्मी मजला झटलें कीं सर्व शेतांत जो माझा हिस्सा आहे याचे मुबादल्यांत लाडेगाव येथील माझे हिश्शाचीं शेतें मुबादल्यांत घ्यावीं तुमचे ह्मणणें मी कबूल करून लाडेगाव येथील दोनी शेताचें खातें माझे नावें आहे त्यांत सर्वे नंबर ३८ यांत माझा ८४८६चा हिस्सा असून ८४८९चा हिस्सा विक्रमजीचा आहे व ८२८८चा हिसा केडमाजीचा आहे सर्वेनंबर ५५ पंचावनचें शेतांत माझा तिसरा हिस्सा असून तिसरा हिस्सा विक्रमचा आहे व बाकी हिस्सा या दोन्ही शेतांत तुमचा दाखल आहे. मी आपले हिश्शापुर्वीं दोन्ही शेतें तुह्मास तिसरे हिश्शाचे सालीम शेताचे मोबदल्यांत वाहण्यास दिलीं असतां तुमचे नोटिशींत लिहिणें सालीम शेताचा मोबदला केला हे वाजवी नाहीं व तुह्मी मुस्तकीम लिहिता कीं, तारीख १९ मे १८६८ इसवी रोजीं जो दस्तैवज मी तुह्मांस लिहून दिला आहे त्यांत सालीम शेतें लिहिलीं आहेत परंतु मी माझे हिश्शापुर्तेंच शेताचा मोबदला दिला आहे यास ईश्वर साक्ष आहे. तुह्मी दस्तैवजांत जरी लिहून घेतलें असेल तरी तें तुमचें लिहिणें दगाबाजीचें आहे व माझे हल्लीं दृष्टोत्पत्तीस आलें आहे व यांत तुमची इमानदारी कळून आली. चिंता नाहीं.

जे वेळेस तुह्मी दस्तैवज लिहून घेतला ते वेळीं लिहिणारानें मजला तुमचे सल्लेनें वाचून दाखविलें एक व दस्तैवजांत लिहून घेतलें एक अशा प्रकारें तुह्मी मसी ठकबाजी केली आहे व सदरील तारखेस तुह्मी जो मजला दस्तैवज लिहून दिला आहे त्यांतही तसेंच कृत्य केलें आहे. आजपर्यंत तुमचे विश्वासामुळें दस्तैवज कोणास वाचून दाखविला नाहीं. आज समजलें. व याचप्रमाणें हमेशा तुह्मी दगाबाजीचीं कामें अशींच करितां असा शिगावात तुमचा बलवा असून रामलाल भुसारी तुमचा आप्त याच्याशीं तुह्मी अशीच दगाबाजी करून कपटाची फारकती लिहिणाराकडून लिहविली. नंतर रामलाल यास समजतांच तो तुमचेवर फिर्याद करीत होता मग तुह्मी त्याची आपसांत समजूत केली याचप्रमाणें मज गरिबाशींही बेमानी केली करितां मी तुह्मावर फौजदारींत फिर्याद करून साबिदी करून घेईन. बाकी जो मजकूर तुह्मी नोटिशींत लिहिला आहे तो सर्व खोटा आहे.

सन १२८६ फसली सालचा शेतांतील माल तुह्मी आपले हिश्शाचा नेलाच आहे याजबद्दल पुरावा आहे परंतु याच सालीं तुह्मी शेतास लागवड न लाविल्यामुळें तुमचे हिश्शाची लागवड रुपये ५३ मी आपल्याजवळून लाविली आहे व माल तुह्मी घेऊन गेले तरी मी तुह्मास हरकत केली नाहीं. नागापुर व लाडेगाव एथील शेताचा तुमचे हिश्शाचा सारा मी भरला आहे व दोन्ही बाबीचे रुपये तुह्मास मागत गेलों तर देतों देतों ह्मणून छकाविलें पण एक पैसा दिला नसून पंध्रा दिवस झाले तुह्मी स्पष्ट सांगितलें कीं रुपये देत नाहीं. फिर्याद करा त्याप्रमाणें केलें जाईल.

तुमचा मुख्य हेतु लाडेगाव येथील शेताचें खातें आपले नावें करून घेऊन विक्रमजीस व केडमाजीस बुडवावें परंतु लोकाचें घर मिळणें कठीण पडतें व या उभयताचे शेताचे हिश्शाचा मुबदला नसून माझे हिशापुरताच शेताचा केला आहे. त्याअर्थीं ते कायमच राहणार आहेत व त्यांचीं नावेंही रजिस्टरास दाखल आहेत अशाकरितां शेताचे खातें मी तुमचे नावें करून देत नाहीं. जर माझ्या प्रमाणें तुह्मी शराकतदार यांजला वागवाल व उभयताचे नावें प्रथम दस्तऐज करून द्याल तर मी शेताचें खातें तुमचे नावें करून देईन असें तुह्मी कबूल न केल्यास न्यायाचे कोर्ट खुलें आहे व हा जबाब तुह्माकडे पाठविल्याबद्दलचा खर्च तुह्मापासून घेतला जाईल. कळावे. तारीख १ माहे सप्तंबर सन १८७७ इसवी.

( सही ) झाडाजी वलद लक्ष्मणजी भाडे वस्ती अकोट याचे हातची निशाणी.

## जाहिरात नंबर ३

सरकारी नोकरीकरितां उमेदवारांची परीक्षा तारीख १९ माहे नोवेंबर रोजीं अकोलें व उमरावती एथें हायस्कुलांत होईल. पहिल्या प्रतीच्या सर्टिफिकिटाकरितां ९व्या इयत्तेंत आणि दुसऱ्या प्रतीच्या सर्टिफिकिटाकरितां ६व्या इयत्तेंत ( इंग्रजी खेरीज करून ) होईल. उमेदवारांनीं आपले अर्ज हायस्कूलच्या हेड मास्तरांकडे तारीख १० नोंवबरेच आंत पाठवावे.

Narayan B. Dandekar'
डैरेक्टर आफपब्लिक इन्स्ट्रक्शन -
मु० अ० हैदराबाद.

अकोलें तारीख ५ सपटंबर
सन १८७७ इसवी

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ — अकोला रविवार ता० १६ माहे सप्तंबर सन १८७७ इ० — अंक ३७


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी म्हणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिस

राजश्री बाबाराव श्रीपत रहाणार कसबे अकोट जिल्हा अकोला यास इंदिराबाई जहागिरदारीण रहाणार मौजे अडगाव खुर्द इनकडून कळविण्यात येते कीं तुम्हास मी दिलेलें जनरल मुख्त्यारपत्र तारीख १ माहे आगष्ट सन १८७७ इसवीपासून रद्द करून तुमचेपासी असलेले कागदपत्र आणून द्यावे म्हणून सांगितलें असतां तुम्ही आणिले नाहीं ते नोटिस पोहोंचल्या तारखेपासून दोन दिवसांत आणून द्यावे. कळावें तारीख ८ माहे सप्तंबर १८७७ इसवी.

( सही ) इंदिराबाई जहागिरदारीन
दस्तुर यादव कृष्ण कुलमुखत्यार

### नोटिस.

मिरी उर्फ शिमाई मर्द उकर्डा पली रहाणार मौजे जउळखेडे तालुके अकोट इला खाली सही करणार यानकडून देण्यात येते कीं तूं माझी गंधर्वाची बायको असून गंधर्व झाल्यास सुमार बारा महिने झाले सदरहू मुदतींत तूं माझे घरी सुमार तीन महिनेच राहिली व नंतर तुझा भाऊ येउन त्याजबरोबर तुं निघून गेली त्यानंतर तुला आणाययास दोन च्यार वेळ आलो असतां तूं आली नाहींस व कोठे भेटलीही नाहीं व हल्लीं आमचे वाडेगावचे पाटिल वगैरे दोन च्यार लोक बरोबर घेऊन मी आलो तरी तूं आली नाहींस व त्यास कारण असें सांगतेस कीं, मी तुला माय म्हटलें. पण ही गोष्ट सर्वथैव खोटी आहे तूं दुसऱ्या कोणाच्या नादी लागून व जावयाचे वगैरे फंदानें हें तुफान घेतेस तर अशा तुफानानें माझा हक्क तुजवरचा उडेल असें समजू नको तूं सुखानें माझे घरी येऊन नांदावें यांतच चांगलें आहे. याकरितां तुला मी ८ दिवसांची मुदत देतों. सदर्हू मुदतींत जर तूं माझे घरीं आली नाहींस तर तुजवर सरकारांत नालिश करून ताबेंत घेतलें जाईल अगर माझा गंधर्वाचा झालेला खर्च तुजजवळून भरून घेईन व तुला जसें रखडत पडूं देईन पण दुसरा नवरा करूं देणार नाहीं हें खुप समजावें. कळावें. तारीख १४ माहे सेप्टेंबर सन १८७७ इसवी.

(सही) उकर्डा वल्लद राघोजी सरप
वस्ती कसबें वाडेगाव याचे
हातची निशाणी रेघ.

## जाहिरात.

सर्वांस कळविण्यांत येते कीं, बाबाराव श्रीपत रहाणार अकोट याजला जनरल मुखत्यारनामा दिलेला तारीख १ आगष्ट सन १८७७ इसवीपासून रद्द केला आहे. ता. ८ सप्तंबर सन १८७७ इसवी.

( सही ) इंदिराबाई जहागिरदारीण
दस्तुर यादव कृष्ण कुलमुखत्यार

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० आपला धंदा चांगला आहे आपले हातीं लोकांची दुःखें व अडचणी दूर करण्याचें साधन मोठें बलवत्तर आहे. यःकश्चित प्राण्यापासून तों एकादे मोठें राष्ट्रापर्यंत कोणाचेही गुणदोषाचें विवेचन आपले द्वारें करून त्याची सुधारणा करण्यास आपणासारखा दुसरा मार्ग दुर्लभ आहे.

अहो हल्लीं आपल्या या हिंदुस्थानांत जेथें तेथें दुष्काळाच्या गोष्टी. कारण गुदस्ता सरसालांत कित्येक ठिकाणीं पर्जन्य मुळींच नाहीं व कित्येक ठिकाणीं फारच थोडा पडला तेणेंकरून दक्षणेत मोठा अनर्थ गुदरून यंदाच्या वृष्टीसाठीं लोक टक लावून बसले होते परंतु पर्जन्यवृष्टी एकीकडे राहून अश्रुवृष्टीसही लोकांच्या तोंडचें पाणी राहिलें नाहीं यंदा विशेष इतकेंच कीं गत वर्षापेक्षां दुसऱ्या पुष्कळ मुलखांत अनावृष्टी झाली.

या अशा दिवसात महर्गतेची अगदी कमाल व्हावयाची तशी होऊन लोकांवर पूर्ण अमल बजावित आहे. गोर गरीब तर उपास करकरून तोंस आपले प्राण बळी देत आहेत. हलक्या पगाराच्या नोकराचें तर कुत्रा हाल खाईनासें झालें आहे. त्यास आपलें व बायकोचें पोट भरण्याची पंचाईत, दोन चार मुलें असलीं म्हणजे मग काय विचारता? पगारांत तर त्याचें पोट भरेना आणि सरकारी नोकर म्हणून भिक्षा मागवेना. ही गोष्ट दहा रुपयाचे आंतील नोकरांची झाली. या पेक्षां अधीक पगारवाल्यांची या पगाराची त्या पगारास भेट होत नाहीं इतकेंच नव्हे पण एखादे धडोतीचें वस्त्र घेणें असेल तर रुपया आठ आणेही वारीस येत नाहींत. उधार घ्यावें तर पोटासाठीं कुत्तरओढ होत असतां दुकानदारांच्या दृष्टीस पडते तेव्हां उधार तें कोठून मिळणार.

मी या तुमच्या वऱ्हाडांत हिंडत; असतां एके-खेडे गावचे बाजारांत कागद हातीं असलेले एके गृहस्थाचा व दुकानदाराचा संवाद - खालीं लिहिल्याप्रमाणे ऐकला.

दुकानदार— कां हो रावसाहेब कागद कसला? तुमची चर्या खरकन उतरली कां?

गृहस्थ— काय बाबा तुला काय सांगावें, "आलीया भोगासी असावें सादर" अहो पहा नुक्ता परवाच माझा पगार आला तेव्हां मी किरकोळ तिखट, मीठ, तेल, मिरची याचा पैसा चुकवून दाणेवाल्याची मागली बाकी फेडून दोन रुपये उरले होते त्यांत एक ज्वारीस व एक डाळीस देऊन ठेविला आहे कीं आठ दिवस तरी पोराबाळांस अमटी भाकर वेळेवर मिळेल. तेंच हातीं असते तर त्यांच्या मागें दहा गिराहिकें लागतीं. व हातीं असल्यावर देणेंदारास नाहीं म्हणवत नाहीं.

दुकान०— खरेंच आहे. मास्तर साहेब हातीं पैसा दिसत असून नाहीं म्हणाल तर त्यांनीं तरी तुमचा काय भरवसा धरावा तुम्ही आज एथें तर उद्या तेथें. हें पहा आजच तुम्हास किती अडचण पडली ती. एथें चार लोकाचें थोडेथोडे म्हणतां वीस पंचवीस रुपये देणें असेल. खेरीज वाटखर्चास कांहीं लागतीलच. गांव तरी किती लांब आहे? जवळपास असला तर फारशी अडचण नाहीं. तोंड उतरलें यावरून बढती तर नाहींच पण कमीतर नाहीं ना?

गृ० अहो माझी बदली नाहीं झाली. मी एथें कायम आहे. अहो आम्हांस पगाराखेरीज कागद, शाई, झाड सारवण वगैरे साठीं एक रुपया मिळतो. ती आम्हांस जणूं दक्षणा मिळते. असें जाणून सरकार त्या मागें सतरा लचांडें आणितें. आज त्यांतून चार रुपये सरकारांत भरण्याचा हुकूम आला आहे. हा पाहून माझा जीव आंत बाहेर करीत आहे. पण उपाय नाहीं, तुम्हां सारख्यास दादा, बाबा करून म्हणा किंवा दोन पैसे व्याज कबूल करून म्हणा पण रुपये भरलेच पाहिजेत.

दुका०— तुम्हांस बारा रुपये वर्षाचे येणार त्यांतून चार गेले म्हणून काय झालें?

गृ०— अहो बारा कोठचे. सुटीच्या महिन्याला दक्षिणा नाहीं. कारण त्यांत झाडसारवण नाहीं. तेव्हां सगळ्या सालचे अकरा रुपये राहिले. त्यांत झाडसारवणास दरमहा आठदहा आणे लागतात त्यांतील एक कवडी म्हणाल तर दातांवर हणायाला उरत नाहीं. शिवाय कागद शाई, दऊत लेखण्या वगैरेस दोन तीन आणे जातात. आणि बाकीच्या दोन तीन आण्यांत खडू, सुईदोरा, किरकोळ मोडतोड, केरसुण्या, व कुलूपकिल्ली वगैरे जिन्नस. शिवाय अंदरकी राम जाने.

दुका०— बरे पण हे चार रुपये दिल्यानें यांतील कांहीं खर्च, वाचतो, किंवा हा आहे तो आहेच?

गृ०— आमचे शाळेकरितां कांहीं बुकें लागतात तीं आम्ही एथें कशी तरी थोडे बहुतानें करून घेत होतो तीं आतां सरकारांतून म्हटलें म्हणजे पैशाचे ठिकाणी दीड पैसा पडेल हें असो पण आज एकदम चार रुपये कोठून आणावे? सरकार आम्हास एक रुपया देते त्यांतून दरमहा दोन चार आणे कापून घेतील किंवा आम्हांस राखण्यास सांगतील तर हरकत नाहीं पण एकदम चार रुपये देण्याचीच कायती आज मला मोठी अडचण पडली आहे.

दु०— हें हो कसलें तुमचें सरकार आधीं तुम्हा लोकांस आतांशा कोणास अक्रा कोणास बारा फार तर कोणास पंध्रा असे पगार देते तेच तुम्हास खाण्यापिण्यास या महागाईचे दिवसांत पुरण्याचे कठीण त्यांतून सरकारी कामासाठीं तुमच्या पगारांतून एकदम चार चार रुपये घेऊन तुम्हास दरमहा दोन दोन चार चार आणे काटकसरीनें आपले वसूल करून घ्या म्हणून सांगते हा अन्याय आहे. आम्हा सारखा व्यापारी ही गोष्ट कधीं कबूल करणार नाहीं.

पत्रकर्ते महाराज या संवादावरून मास्तर लोकांची सध्याची तुमच्या एथील स्थिति पाहून मला फार करुणा येते सरकारी कामासाठीं खासगी पैशांतून एकदम चार रुपये अशा काळाच्या दिवसांत घेणें आणि तुम्ही किरकोळ दोन दोन चार चार आण्यानीं ते वर्ष दोन वर्षांत वसूल करून घ्यावे याचा अर्थ. वसूल झाले तर झाले नाहीं तर नाहीं म्हणणेंच दिसतें हा केवढा अन्याय या तुमच्या इंग्रजी अमलांत कोणी सदय अधिकारी असेल तर या विषयीं विचार करो. लोभ असावा ही विनंती. तारीख ४ सप्तंबर १८७७ इ.

एक फिरस्ता.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. आपली माझी ओळख आहे करितां खालीं लिहिलेल्या चार ओळींस आपल्या अंकीं स्थल द्याल अशी आशा आहे.

आमचा जळगाव तालुका छोटासा असोन बागाइती असल्यानें फारच रमणीय दिसत आहे अलीकडे पर्जन्य नसल्यामुळें मात्र सर्वत्रांची पोचावर धारण बसून सर्वतोमुखीं हाहःकार या शद्बाची गर्जना दुष्टरूपी काळाच्या तडाक्यांत आपण सापडतो कीं काय ह्या धास्तीमुळें चालू होती. पण जगन्नियंत्या परमेश्वर इच्छेनें तसा प्रसंग प्राप्त न होतां तारीख २९ आगस्ट सन १८७७ पासून तारीख ३१ मिनहू पावेतों पर्जन्य पडल्यामुळें जिकडे तिकडे आनंदच आनंद होऊन गेला. जे कडबे व पऱ्हाट्या वाळत चालल्या होत्या त्यांनीं आपलीं डोकीं उंच केली व तीं योंठीं झोकदार तरतरीत दिसूं लागलीं आहेत. धान्याचे बाजारभावांत मात्र अद्यापि ह्मणण्यासारखा फेरफार नाहीं तरी पायलीस एक पैसा दोन पैसे उतरले असून मजुरी जारी झाल्यामुळें गोरगरिबास हिम्मत येऊन त्यांचीं कोमेजलेलीं मुखकमलें टवटवीत दिसूं लागलीं आहेत. तसेंच आमच्या ह्या जळगावास पोलिस स्टेशन असून एथें आज दोन वर्षांपासून रा. रा. मनुसिंग हे चीफ कानस्टेबल आहेत. यांचा स्वभाव व वागणूक फार चांगली आहे व आपले कामांत हे मोठे हुशार आहेत असेंच ह्मटलें पाहिजे. रयतेच्या कनवाळूपणाविषयीं त्यांची पूज्यबुध्धी असोन निस्पृहता ही तशीच, स्वभावानें शांत, स्नेहसंबंधांत सर्वांचे मर्जीप्रमाणें वर्तन करणारे, आपल्या कामांत दक्ष, गुन्ह्याचा पत्ता लावण्याविषयीं तर जांचा बाणाच आहे. एडिटर महाराज, असें पहा कीं, हे गृहस्थ एथें आल्यापासून त्यांनीं आपल्या खऱ्या धैर्यानें शौर्यानें व त्यांनीं जे महत्विक गुन्हे नापत्यांत येण्यासारखे होते तेही पत्यांत आणिले मौजे दादुलगाव एथें राहाजनींचा गुन्हा झाला तो त्यांनीं पत्यांत आणिला व आरोपितास माजिस्त्रेटाकडून योग्य शासन मिळालें. तसेंच मौजे अकोलें, निंभोरें खूर्द व मौजे वडसिंगी या गावीं तीन खून झाले असून त्याजला मध्यंतरीं कांहीं दिनावधी ही झाली होती. असें असतां मोठी मेहेनत घेऊन त्यांचा पत्ता लाविला यामुळें तीनही गुन्हे पत्त्यांत आले व त्यांतील आरोपी लोकांतून कोणास फाशी व कोणास काळें पाणी याप्रमाणें शिक्षाही झाली.

त्याचप्रमाणें एथून तीन कोसांवर मौजे बोराळें खुर्द ह्मणून गाव आहे. तेथें सखाराम पाटील या नावचा मनुष्य संभावित असून त्याजपाशीं दहा पांच हजाराची जमा असावी अशीही लोकवार्ता आहे पण धर्म करतां कर्म उभें रहातें. तसें तो पाटील तारीख २ सेप्तेंबर रोजीं महायात्रेस गेला व दुसरें दिवशीं रात्रौं बारा वाजतां त्याचे दोन मुलगे व सुना वगैरे घरांत निजल्या असतां वीस पंचवीस चोरट्यांनीं त्यांच्या घरीं जाऊन डाका घातला तेव्हां घरांतील मनुष्यास ज्यास जशी सवड सापडली तसे ते निघून पडले. कोणास इजा ह्मणोन कांहीं झाली नाहीं. पण चोरट्यांनीं घरादाराची नासाडी केली. गुडघ्याबरोबर [illegible] खणून टाकिलें. गहाणाचा चांदी वगैरेचा माल व सुर्द्यांचे नद्रे, कागद पत्राचे रुमाल, रोकड, तेल तुपाच्या घागरी आणि दही दुधाच्या खोबऱ्या वगैरे जो ह्मणून माल दिसला तो सर्व घेऊन गेले.

ह्या डाक्याची खबर स्टेशनांत दाखल होतांच चीफ कान्स्टेबल यांणीं बोराळ्यास जाऊन तपास केला व पुढें तेथून जवळ सुनगाव आहे तेथें गेले. व हिकमतीनें महार लोकांच्या घरीं मुद्दा पकडला. व दहा वीस महार लोकांस पकडून आणिले.

दुसरे दिवशीं मौजे सुकळी व मौजे अकोलें या गावींही मालाचा कांहीं थांग लागल्यावरून तेथें जाऊन मुद्देमाल काढला आणि आरोपी लोकांस पकडून स्टेशनांत घेऊन आले. नंतर मि० सबदरअली इन्स्पेक्टर आले त्यांनीं तपास लावून कागदपत्र वगैरे माल डाकेखोरानीं विहिरींत टाकला होता तो काढिला- अणखी चोरटे लोकांचा तपास चालू आहे. फिर्यादीचा गेलेला माल बहुतेक सर्व मिळाला. पत्रकर्ते महाराज, इतकें चांगलें काम चीफ कानस्टेबल यांजकडून झालें आहे त्यासाठीं त्यांच्या वरिष्टाकडून त्यास मोबदला चांगला मिळूं नये काय? मिळेल तर फार चांगलें होईल. कळावें हे विनंती. तारीख८ सपटेंबर सन १८७७ इसवी.

एक
जळगावकर.

---

नोटिस—सुरतरामजी पेमाजी बेपारी मारवाडी वहिवाटदार धनराज लाडो दुकान नसराबाद जिल्हा खानदेश यांस ताराचंद सरूपचंद मारवाडी वहिवाटदार मुलतानमल आटोजी दुकान नांद्रें तालुके मलकापुर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचा आमचा सवदा नांद्रें या ठिकाणीं जवारी पोते ८१ खंडी ८॥२ दर पोत्यास दोन मण प्रमाणें पायली नांद्रें एथील दर खंडी ११४ रुपये प्रमाणें शिक्का सरकारी माल जळम तालुके खामगाव एथील रेलवे स्टेशनवरून भुसावळ एथें तुमचे सांगितल्यावरून रायमल धनराज मारवाडी दुकान भुसावळ जिल्हा खानदेश याचे नावावर चढवून पास रेलवेचा तुह्मास पाठविण्याचा करार ठरल्याप्रमाणें तुमचे कडेस मिती भाद्रपद वद्य २ मारवाडी मराठी श्रावण वद्य २ संवत १९३४ मारवाडी रोजीं नांद्रें स्टेशनावर तुमचे हातीं दिला त्याप्रमाणें सदर्हू जवारीचा माल रायमल धनराज याचे जिमेस रेलवेतून दिला गेला आहे त्या मालाचे किमतीबद्दल रुपये ९२३८=॥ व पोत्यांबद्दल रुपये ३०।=॥ एकूण ९९३॥।०॥ हे आजपर्यंत पाठविले नाहींत ते रुपये ही नोटिस पावल्यापासून चार दिवसांत पाठवावे न पाठविल्यास शिरस्त्याप्रमाणें नोटिशीचे खर्चासुध्धां सर्व रुपये फिर्याद करून घेतले जातील त्याचा खर्च तुह्मावर पडेल. जाणिजे ता. १३ माहे सेप्तेंबर १८७७ इसवी.

(सही) ताराचंद रूपचंद मारवाडी वहिवाटदार मुलतानमल आटोजी दुकान नांदुरें तालुके मलकापुर दस्तुर खुद

नोटिस.

बाळाजी लक्ष्मण देशपांडे प्रगणे नेर परसोपंत तालुके दारव्हे जिल्हा वणी यास खाली सही करणार याजकडून मौजे रेनकापुर प्रगणे नेरपरसोपंत हा गाव आपण च्यार ईसम मिळून इजाऱ्यानें केला होता त्यांपैकी भगवंत बाळाजी देशपांडे यानी राजिनामा देऊन सोडला नंतर तीन इसमाचे तीन हिसे राहिले त्यांजपैकी नंबर ४चा इसम देवराव गणेश रहाणार नेर याचा हिसा मी आपले बाकींत ह्मणजे कोर्टांत हुकूमनामे त्याजवर झालेले बाकींत त्याचा हिसा दस्तऐवजात इजारा पुरा होईपर्यंत सर्व मालकी घेतली असतां सदरील गावांत तुमचा हिस्सा १ व माझे हिस्से २ असे गावचे नफ्या नुकसानींत याप्रमाणे असून तुह्मी सन १२८६।८७ सालचा हिसेब केला नाहीं. तुम्ही गवत ४०००० चाळीस हजार पेंडी कापून दर हजारास ८ रुपये प्रमाणें विकलें त्याजबद्दल गवताचा हिशेब सन १२८६ सालचा करून या पंधरा दिवसांत आमचे रुजुवातीनें करून आमची सही घेऊन आमचे दोन हिश्शाचे रुपये खर्च वजा जातां जे होतील ते लागलेच देऊन आमचे सहीची पावती घ्यावी व आमचेपाशीं तुमचे रुपये सन १२८६।८७ सालचे बायद्याचे नफ्याबद्दल जे हिशेबानें होतील ते लागलेच आह्मी तुह्मास वजा करून देऊं जर तुह्मी सदरी लिहिल्याप्रमाणें मुदतींत हिशेब न कराल तर तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून नोटिसीचें खर्चासुद्धां रुपये घेतले जातील या शिवाय तुमचेवर रुपये हुकुमनाम्याच्या खर्चाबद्दल आहेत त्याची रीतीप्रमाणें तजवीज केलीच आहे मात्र हिशेबास देर लावू नयें पुढें कोर्टासमोर तक्रार कराल तर ऐकली जाणार नाहीं तुह्मास काय जबाब देणें असेल तो १५ दिवसांत द्यावा नंतर मी हैदराबादेस जाणार आहे. कळावें तारीख १४ सप्तंबर सन १८७७ इसवी.

[ सही ] बाळकृष्ण सखाराम देशपांडे दस्तुर खुद.

---

## वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद शुध्ध ९ शके १७९९

## व्यभिचारसंततीचें पालन

“बाललक्षक गृहाचे चिटणीस” या नात्यानें रा. रा. गंगाधर नरसिंह केतकर यांणीं दिलेली जाहिरात कित्येक वर्तमानपत्रांत आमचे पहाण्यांत आली आहे. ती वरून समजतें कीं ज्या व्यभिचारिणीस बालहत्या भ्रूणहत्यादि पातकें करण्याचीं नसतील व आपली हाल अपेष्ठा न होऊं देतां योग्यरीतीनें बाळंतपण करून घेण्याची इच्छा असेल त्यांसाठीं आतां नाशिक पंढरपुर वगैरे ठिकाणीं कांहीं स्वदेशहितेच्छु गृहस्थानीं सर्व अवश्यक सोई करून ठेविल्या आहेत. या गृहांत आणून सोडलेल्या मुलांचें संरक्षण करण्यांच कबूल करून शिवाय या ठिकाणीं व्यभिचारजात मुलें आणणारास उत्तेजन यावें ह्मणून मुलें आणणारास दर मुलाबद्दल दहा रुपये बक्षीस देण्यांचें वरील गृहस्थांनीं कबूल केलें आहे. व्यभिचारिणीस बाळंतपणासाठीं बालरक्षक गृहांत आणण्याबद्दल तितकेंच बक्षीस ठरवून या कृत्यासाठीं एक घर तयार करून त्यावर एक व्यवस्थापक मंडळी नेमली आहे. या मंडळींत वकील व डाक्तरांचीं योजना जरी सहज रीतीनें झालेली असावी असें दिसतें तरी त्या गोष्टीचा या कार्यांत चांगला उपयोग होण्याचा संभव आहे. व्यभिचारिणीचें नांव गाव कोणा परक्यास न कळावें ह्मणून व्यवस्थापक मंडळीनें या बाबदींतील सर्व गुह्य मजकूर गुप्त ठेवण्याचा निग्रह केला असून शपथा घेतल्या आहेत असें कळतें.

वरील मजकूर जाहिरातीचे संबधानें पाहिलें असता योग्य दिसतो; कोणतीही उणीव नजरेस येत नाहीं. व या चांगल्या इराद्याबद्दल या कृत्यांतील पुढारी मंडळींची आह्मी शिफारस करतों. परंतु त्यांचे जें खावरून या कामांत त्यांस जितका भरवसा असल्याचें दिसत आहे तितकी खरोखरच त्यांस उमेद असल्यास आमच्या या पुढारी मंडळीस जगताचा तादृश अनुभव नाहीं असें ह्मणणें जरूर येतें. या मंडळीचा हेतु निर्दोष खरा पण संभाव्य नाहीं. मांजराचे गळ्यात घंटा बांधण्याचे ठरावाची वरील व्यवस्थेवर छाया पडलेली दिसते. घंटा बांधतां आली तर फायदा होईल पण ती बांधतां येत नाहीं इतकीच उणीव रहाते बाकी सर्व तयारी आहे. सत्कर्में करण्याचा इरादा मनांत न बाळगण्यापेक्षां बाळगणें हें चांगलें. स्वस्थ निमुटपणीं बसण्यापेक्षां लोकहितवादी होणें एक अशीं श्रेष्ठ, परंतु त्यास ज्यास्ती योग्यता नाहीं. इरादा स्वतःसिद्ध पंगू आहे. कर्तृत्व पाहिजे, निश्चय पाहिजे, आपण पुढारी झालें पाहिजे, उदाहरण दाखविलें पाहिजे, व प्रसंगीं कीर्ति अपकीर्ति वगैरेवर लाथ मारली पाहिजे तेव्हां मात्र आपले हातून लोकोपयुक्त खरीं सत्कर्में होण्याचा संभव आहे. राजेश्वराचे देवळांत भजन करण्यास एकांत जागा चांगली आहे असें दुरून बोटांनें दाखवून ईश्वरभजनाकडे रामदास तुकारामादिकांच्यानें लोकांस वळवितां आलें नाहीं. ते साधू जें तोंडानें दुसऱ्यास सांगत गेले तसें स्वतः करीत त्यांणीं आयुष्यें घालविलीं. जाहिरातीनीं कामें झालीं असतीं तर पुष्कळांनीं तीं केलीं असतीं. या अनुभवावरून आह्मांस असें वाटतें कीं जें कृत्य आपण करण्यास तयार नाहीं तें कृत्य दुसऱ्यास सांगितलें तर तो बुद्धिवाद लोकांचे मनावर तादृश वठणार नाहीं हें जर आमचे देशहितेच्छु ध्यानांत ठेवतील तर त्यांची पुढें उपहास्यता होते ती होणार नाहीं. जें कृत्य उत्तम ह्मणून दुसऱ्यास सांगावें, करण्यास आग्रह करावा, बक्षिस

द्यावीं, जाहिराती सर्व नगभर लावाव्या, पण तेंच कृत्य करून दाखविण्याचा स्वतःस उत्तम प्रसंग आला असतां विहिणीचा आग्रह, कन्येवरील प्रेम, वडिलांची इच्छा इत्यादिक सबबी पुढे आणाव्या. क्षौर प्रायश्चित्तें, दंडवत, प्रणाम वगैरे करावें त्यापेक्षां कोरडें पांडित्य न करणें फार चांगलें. या बालरक्षक योजनेचा परिणाम एकंदरींत चांगला व्हावा अशी आमची इच्छा आहे तरी अखेरीस आह्मांस विशेष आशा दिसत नाहीं याबद्दल आह्मी दिलगीर आहों.

ज्याची दृष्टि दूर पोंचत नाहीं त्याच्या मनांत एकादें बरें वाईट करण्याचें आलें ह्मणजे त्यास फारसे अडथळे दिसतच नाहींत. पण मोठ्या जाणत्या स्वदेशहित वादीनीं, स्वदेशहितेच्छूंनीं दूरवर नजर पोंचविली पाहिजे. वरील मंडळीस असें वाटत असल्याचें दिसतें कीं, नाशिक व पंढरपूर या दोन ठिकाणीं बालरक्षक गृहें स्थापन करून टाकलीं आणि गर्भपात होण्यासाठीं औषधें देणाऱ्या बायकांस एकदां बटहुकूम एक दोन वर्तमानपत्राद्वारें फिरविला ह्मणजे तेथील बालहत्या भ्रूणहत्या एकदम बंद होतील. या बाबदींतील या गृहस्थांचे भोळेभावाचें आह्मांस कौतुक वाटतें. जर या मंडळीस तसें वाटलें नसतें तर सेक्रेटरीचे मार्फत "गर्भपात करण्याचीं औषधें" देणाऱ्या बाया वगैरे लोकांसहि सुचवितों कीं, त्यांनीं गर्भपाताचीं औषधें देण्याचें बंद करून "गर्भपाताचा प्रसंग येणार नाहीं अशी तजवीज ठेवावी" हें आज्ञापत्रासारखें लिहिणें ते न लिहिते.

व्यभिचार, बालहत्या व गर्भपातादिक कर्में जाहिराती देऊन बंद होण्याचा तर संभव नाहींच नाहीं. इतकेंच नव्हे पण कदाचित बालरक्षक गृहासारखे तजविजीनें व्यभिचारास परंपरेनें उत्तेजन मिळण्याचा मात्र विशेष संभव आहे. हिंदूंच्या उंच जातींत स्त्रीशिक्षण व स्त्रीपुनर्विवाह करण्याची चाल हीं नाहींत ह्मणून व्यभिचार व बालहत्या होतात अशी कोणाची समजूत असल्यास ती चुकीची होय. ज्या जातीस पुनर्विवाहाचा प्रतिबंध नसून स्त्रियांस उत्तम शिक्षणही चालू आहे. त्या जातींत हीं दुष्कर्में फार घडत आहेत. विद्वत्तेच्या मानानें तीं जास्ती होतात असें जरी आमच्यानें ह्मणवत नाहीं तरी त्या कारणानें तीं कमी झालीं असें ह्मणवणार नाहीं. विलायतेंत "बेबीफार्मिंग" ह्मणून जो या कृत्यापासून एक नवीनच धंदा उत्पन्न झालेला आहे व व्यभिचारजन्य संततीचे कसेकसे हाल होऊन पुढें सारखेच वाईट परिणाम घडत आहेत त्याची माहिती ज्यांस झालेली आहे ते वरील प्रकारानें बालहत्यादि दुष्कर्माचा प्रतिबंध करण्याचा व्यर्थ आयास करणार नाहींत.

बालरक्षकगृह असल्यानें एकादे जारज अर्भकाचा प्राण वाचण्याचा कदाचित संभव आहे; परंतु उच्च जातीच्या व्यभिचारिणीची संतति वाचविण्याचा उपाय ह्मणून या गृहावरून फायदा होण्याचा संभव बिलकूल नाहीं. अब्रूच्या भीतीनें जर बालहत्या होत आहेत तर बालसंरक्षक गृहानें त्या कशा बचावतील हें समजत नाहीं. या गृहांत प्रसूत होण्यास जाणाऱ्या जारिणीच्या गुह्य गोष्टी व्यवस्थापक मंडळीनें गुप्त ठेवण्याचें कबूल केलें आहे. त्याप्रमाणेंच ती मंडळी खरोखर चालेल; सुइणी धोबिणी व इतर चाकर नोकर आपल्या जातीच्या स्वभावास वेसण घालून बसतील व गुह्य गोष्टी गुप्त ठेवितील असें क्षणभर ह्मटलें तरी ज्या जारिणीस आपल्या आई बापांसही जी गोष्ट सांगण्याची शरम ती गोष्ट ती जारिणी आपल्या व्यवस्थापक मंडळीकडे स्वसंतोषानें जाऊन सांगेल काय? आह्मास वाटतें कीं, असें करण्यापेक्षां ती सुखानें अफू खाऊन मरेल. जीस मंडळीच्या साक्षीनें बाळंत होण्यास जाण्यास शरम वाटणार नाहीं, तिला आपल्या आप्तांचेच घरीं बाळंत होण्यास काय हरकत आहे? तेव्हां उच्च जातीची जी जारिणी लज्जेस्तव भ्रूणहत्या बालहत्यादि पातकें या गृहाचे अभावीं करते तीं पातकें हीं गृहें स्थापित झालीं असूनही करीलच करील. व्यभिचारिणीचीं मुलें पूर्वी जीं मरत होतीं तीं सर्व किंवा त्यांपैकीं कांहीं तरी या गृहाचे योगानें वाचतील कीं काय हें पाहूं. आमच्या मतें ह्याचाही संभव नाहीं. सुरक्षित स्थळीं व पूर्वी योग्य तयारी केल्यावाचून व सुईण वगैरे मदत असून प्रसूती झाल्यावाचून तीस झालेलें मूल बालरक्षकगृहांत कसें जाऊन पोंचेल? ज्या व्यभिचारिणीस गर्भिणी असल्याबद्दलची शंका देखील दुसऱ्यास येऊं देण्याची भीति असते तिला या प्रकारानें प्रसूत होण्याचा कसा संभव? आणि तिचें मूल बालरक्षक गृहांत कसें जाऊन पोंचावें? मात्र ज्या जारिणीस लोकलज्जा नाहीं ती कदाचित् या गृहांत जाईल, किंवा आपलें मूल पाठवील; पण अशी गोष्ट असेल तर बालरक्षक गृहाच्या अभावींही अशा जारिणीस किंवा तिचे बालकास भीति नव्हतीच. या वरील कारणावरून इतकेंच सिद्ध होत आहे कीं, ज्या उच्च जातीच्या जारिणी स्त्रिया ज्या हेतूस्तव स्वतः इजा भोगून बालहत्यादि पातकें करीत होत्या त्यांस वरील बालरक्षक गृहें कांहीं उपयोगाचीं नाहींत; आणि ज्या अशा जारकर्माला भीत नव्हत्या त्यांनीं या गृहापासून आपणास कांहीं उपयोग करून घेतल्यास एकंदरीनें जारकर्मास मात्र सहाय्य केल्यासारखें होतें.

रोग झाल्यावर त्याची चिकित्सा करणें योग्यच आहे; पण मुळीं रोगच न होऊं देण्याची तजवीज करणें त्याहूनही अधिक योग्य. कांहीं रोग अचिकित्स्य होत. ह्मणजे ते औषधानें बरे होत नाहींत. परंतु अचिकित्स्य रोग बरे करणें जरी कठीण तरी न होऊं देणें हें त्यापेक्षां सोपें आहे. उच्च जातीचे स्त्रीचा जारिणीपणा कांहीं एक स्थितीस पोंचला ह्मणजे हल्लींचे स्थितीकडे पहातां असाध्य समजला पाहिजे तरी तो समूळ टाळण्याचें कार्य अंशतः सोपें आहे. करितां आमचे लोकहितेच्छु गृहस्थ जारिणीचीं बालकें रक्षण करण्याचा व सूतिकागृहें तयार करण्याचा बोजा आपणांवर घेण्यापूर्वी या दुष्कृत्याचे मुळास हात घालतील तर त्यांस यश मिळण्याचा थोडाज्यास्ती संभव आहे.

बालरक्षक गृहें स्थापित करण्याचा ज्यांनीं आरंभ केला आहे त्यांची नाउमेद करण्याचा किंवा त्यांस दोष देण्याचा इरादा आहे असें वरील लिहिण्यावरून समजूं नये. जे गृहस्थ या कामीं पुढारी झाले आहेत त्यांची आह्मी शिफारसच करितों. शिवाय त्यांणीं दिलेले जाहिरातीप्रमाणें त्यांचा करण्याचा इरादा आहे व लोकांवर उपकार करण्याची त्यांची अंतःकरणपूर्वक इच्छा आहे हें कबूल करितों व त्याबद्दल त्यांस मोठेपणा देतों. तरी आमचें जें मत या बाबदींत आहे कीं, या खटाटोपीपासून खरा फायदा नसून तोटा मात्र होण्याचा संभव विशेष आहे,' तें मत प्रदर्शित करणें आह्मांस जरूर आहे.

## वऱ्हाड.

व्हाईसराय साहेब पुण्याहून मद्रासेकडे गेले तेव्हां शहाबादच्या स्टेशनावर आमचे रेसिडेंट साहेब त्यांस भेटले व पीक पाणी आणि दुष्काळ या संबंधानें त्यांचें त्यांचें बराच वेळ भाषण झालें.

मे० जोन्स साहेब कमिशनर सिमल्याहून एक दोन दिवसांत परत येणार असें पुन्हा वर्तमान आहे. त्यांच्या आफिसांतील एक क्लार्क ७।८ दिवस येथेंच आहे. व क्लार्क आफ धि कोर्ट गेल्या आठवड्यांत येऊन परत गेले होते तेही आज पुन्हा येणार आहेत. कमिशनरसाहेब दोन तीन दिवस येथें राहतील असें ह्मणतात.

जुडिशियल कमिशनर मे० बेल साहेब येथेंच आहेत. सेशनाचा मुकदमा आहे पण तो या आठवड्यांत चालणार नाहीं.

पर्जन्य या आठवड्यांत मुळींच पडला नाहीं व थंडी पडूं लागली आहे. पिकें चांगलीं आहेत पण त्यांच्या वृध्धीस एक दोन पावसांची जरूर आहे. पिण्याचें पाणी तर या वर्षी दुर्मिळ होईल असें दिसतें.

मूर्तिजापुरचे जमादार रा. रा. वामनराव गोविंद यांनीं शेख इमाम नावाच्या मनुष्याच्या सहीची खोटी नोटिस वऱ्हाडसमाचारांत छापवून पुराव्याच्या उपयोगी बनाऊ दस्तऐवज केला अशाबद्दल उमरावतीचे डिपुटी कमिशनर मि० हार्डर्न साहेब यापुढें एक मुकदमा चालला होता त्याचा गेल्या गुरुवारीं निकाल होऊन च्यार्ज ठेवण्याजोगा पुरावा नाहीं ह्मणून आरोपीस सोडून दिलें. या कामीं जमादार यांनीं ३।४ वकील, बारिस्टर, व मुंबईचेही वकील आणिले होते व त्यांकरितां त्यांस दोन तीन हजार रुपये खर्च आला.

ही नोटिस छापण्याचें योगानें या अपराधास सहाय केलें ह्मणून या पत्राचे मालक खंडेराव बाळाजी फडके यांसही डिपुटी कमिशनर साहेबानीं आरोपी केलें होतें. पण त्यांचा सर्व पुरावा घेतल्यावर साहेबांची खात्री झाली कीं त्यांचा यांत कांहीं हात नव्हता. साहेबबहादुरांनीं याविषयीं प्रथमच पुरता विच्यार केला असता तर बरें होतें.

सिकंदराबादचे क्यांटनमेंट माजिस्त्रेट मे० शेख हिसामुदीन साहेब यांस ९० रुपये पर्यंत दिवाणी दावे पहाण्याचा अधिकार होता तो ६०० रुपये पर्यंत वाढविला.

डाक्टर पी सी अप्याकानू पंढारम सेकंड क्लास आस्पिटल असिस्टंट यांच्या नोकरीची १४ वर्षे पुरी झालीं ह्मणून तारीख २९ एप्रिलपासून त्यांस फर्स्ट क्लास केलें.

रा. रा. वासुदेवराव पिसोळकर यांजकडील चोरीविषयीं मि. सांवियल साहेब पोलिस इन्स्पेक्टर यांस एक निनावी पत्र आलें आहे व त्यांत अमुक तीन मनुष्य धरावे ह्मणजे चोरी सापडेल असें लिहिलें आहे पण कांहीं मुद्दा पत्ता लागल्याशिवाय तसें कोणास धरतां येत नाहीं व दुसमानीनें कोणी कोणाचीं नांवें घेऊं शकेल सबब त्या पत्र पाठविणारास आह्मी अशी शिफारस करितों कीं त्यानें स्वतां इन्स्पेक्टर साहेबांस अगर वासुदेवरावास भेटून कांहीं सुगावा लावून द्यावा. व त्याबद्दल त्यास वासुदेवराव ५० रुपये बक्षीस देण्यास तयार आहेत.

बुलढाण्यास गोरगरिबास बाजारभावापेक्षां दोन शेर स्वस्त धान्य देण्याचें दुकान झालें आहे व तें पाऊस पडला तरी अजून चालू आहे. या कृत्यास मूळ प्रवर्तक कर्नल बुशबी साहेब हे असून लोकलफंड इंजिनियर, डिपुटी इ. इन्स्पेक्टर, हेडक्लार्क, व क्लार्क आफ धि कोर्ट हे फार झटतात असें समजतें. तेथें या कामा करितां वर्गणी ६०० रुपये जमली. हा गाव अगदी लहान असतां एवढा मोठा उद्योग तेथें झाला ही संतोषाची गोष्ट होय.

आह्मांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं, मे. दस्तुर बहिमनजी साहेबांचे बंधु मे. रतनजी साहेब यांच्या पत्नी सिकंदराबाद एथें प्रसूत होऊन बाळंत रोगानें गेले रविवारीं मरण पावल्या. यांस ४ कन्या आहेत. व हल्लीं पुत्र प्रसवल्या होत्या पण तोही उपजत मरण पावला. रतनजी साहेबांस मोठ्या वयात हें कुटुंबहानीचें दुःख फार मोठें झालें. ईश्वरेच्छे पुढें कोणाचा इलाज नाहीं. यांची एक कन्या बहिमनजी साहेबांचे चिरंजीव एदलजी साहेब यांस दिलेली आहे.

देऊळगावराजाहून पत्र आलें आहे त्यावरून समजतें कीं १० वे तारखेस तेथें २ इंच पाऊस पडला व तो सभोंवार वीस वीस कोस पावेतों पडल्याची तेथें खबर होती.

## वर्तमानसार.

लॉर्डलिटन साहेब मद्रासेस गुरुवार रोजीं ज्या गाडींत बसून पालवराम एथें गेले ती उलटत होती; परंतु सुदैवानें कांहीं एक विपरीत झालें नाहीं.

अटरनी होण्याकरितां जरूर असलेली परिक्षा येत्या डिसेंबरचे पहिले आठवड्यांत मुंबई मुक्कामीं हाय कोर्टांत होणार आहे.

बंगाल प्रांतांतून येणार अफिणीचे पेटीवर सरकारची जकात पडते त्यापेक्षां माळव्याचे पेटीवर कमी पडत असे. हें सरकारास वाजवी न वाटल्यावरून त्यांनीं माळव्याचे अफूवर ४० टके जकात जाफा बसविली. किरण.

सिंद्याच्या राज्यांत दुष्काळ पडण्याचीं सर्व चिन्हें दिसत आहेत व त्याच्या निरसनार्थ सिंदे महाराजांनी ४०,००,००० रुपये रिलीफ कामाकडे खर्च करून अन्नार्थी लोकांस पोसण्याचें ठरवलें आहे.

दुष्काळामुळें अतिशय महागाई होईल या अदमासानें डिसा एथील दोन चार वाण्यांनीं पुष्कळ धान्य खरेदीकरून ठेविलें होतें, पण तेथें पाऊस अगदीं वेळेवर पडल्यामुळें त्यांच्या मनाप्रमाणें वेळ आली नाहीं व या पैशाच्या नुकसानीनें त्या वानियांस मरणप्राय दुःख होऊन त्या सर्वांनीं आपली आत्महत्या केली!

घाझीपुरच्या माजिस्त्रेटानें एका बाबु वकिलास जोडा घालून आपल्या कोर्टांत येऊं दिलें नाहीं याबद्दल खटला चालून वायव्य प्रांतांच्या हाय कोर्टानें अखेर बाबूच्या ह्मणण्याप्रमाणें निकाल केला.

सर्व पृथ्वीतील मुसलमानांचा एकोदल व्हावा या उद्देशानें एक पुस्तक प्रसिद्ध करून तें मक्केस जे यात्रेकरू येतील त्यांच्या द्वारें सर्व जगांत जाहीर करावें असें कान्स्टंटिनोपल एथें नुकतेंच ठरलें आहे.

कुर्ग एथें एक गोरा गृहस्थ रस्त्यानें जात असतां त्यास अन्नानें व्याकूळ होऊन निचेष्टित पडलेली एक बाई रस्त्यानें आढळली त्यावरून त्यानें एका दुष्काळावरील नेटिव अमलदारास तिला पहाण्यास सांगितलें, नेटिव अमलदार त्या प्रेतवत बाईकडे जाऊन "ती अद्याप, मेली नाही मेली ह्मणजे तिची पुढील तजवीज होईल असें त्या गोऱ्यास त्यानें येऊन सांगितलें असें एक इंग्रजी पत्रकर्ता लिहितो.

पहाडी संस्थानांपैकीं मंडी संस्थानाविषयीं बनारस अखबार पत्रांत बराच चमत्कारिक मजकूर आहे. तो म्हणतो— मंडी संस्थानांत कोणाचीही वस्तू रस्त्यावर पडली असल्यास मालकाशिवाय त्यास कोणीही हात लावीत नाहीं सर्व राज्यांत उत्तम पाण्याचे झरे आहेत, त्या संस्थानच्या गादीवर जे राजे बसतात ते नेहमी धर्मशील व पापभीरू असून कोणत्याही प्रकारचें राज्यावर संकट आलें असतां राजाच्या प्रार्थनेस ईश्वर तावडतोब प्रसन्न होऊन त्याचे इच्छित हेतु परिपूर्ण करतो आणि सर्वांत आश्चर्य हें कीं त्याच्या राज्यांत कोणत्याही मनुष्यास त्या राजाची शपथ घातली तर तो कधींही ती मोडणार नाहीं! खरें असल्यास या कलियुगांत हें एक सत्ययुगांतील च राज्य समजावयाचें. अ. द.

मुंबई एथील शेट एदलजी रुस्तमजी सुनावाला यांनीं दुष्काळ पीडित लोकांस फुकट रहाण्या करितां शीव एथील आपला बंगला पोलिस कमिशनर यांचे स्वाधीन केला आहे.

कासिम बाजार एथील महाराणी शरणमाई यांनीं दुष्काळ पीडित लोकांकरितां बंगालच्या लेफ. गव्ह. कडेस १०,००० रुपये पाठविले आहेत.

दिनाजपुर एथें मागील महिन्याचे ते. विसावे तारखेस धरणीकंपाचा धक्का बसला असें कळतें.

क्षार्डेड एथून सुमारें ११०० टन वजनाचा कोळसा भरलेलें पलोरा नावाचें जहाज मुंबईस येत असतां मध्येंच रस्त्यावर जळल्याची बातमी कळते.

सियाममधून या देशांत तांदुळ येण्याची आशा दिसत नाहीं कारण तेथून चीन व जपान या देशांत पुष्कळ तांदुळ जातात. एथें यदा पीकही चांगलें नाहीं.

आजपर्यंत बैबल सोसायटीनें बायबलाचें हिंदुस्थानांतील भाषापैकीं ४९ भाषांत भाषांतर केलें आहे. सु. प.

खोट्या नोटा करणाऱ्या लोकांस पकडण्याच्या कामीं मुंबई एथील पोलिसांनीं विशेष दक्षता दाखविल्याबद्दल सरकारानें त्यांजला वाटून देण्याकरतां पाठविले ले २,००० रुपये सर फ्रांक सूटर यांनीं त्यांस योग्यतेप्रमाणें वाटून दिलें.

चमत्कार— कलकत्यास एक सात फूट उंचीचा मनुष्य आला आहे तो राक्षस असें समजून लोक पूजा करतात.

अश्वजातीवर संक्रांत— खेचरें, घोडीं व गाढवें यांचे मांस भक्षण करण्याची प्रवृत्ति फ्रांन्स देशांत दिवसेंदिवस वाढूं लागली आहे.

लढाई सुरू होण्याबरोबर पंजाब व वायव्यप्रांतांतील मुसलमान लोक आपली चीजवस्त विकून स्टचांबूल एथें गेले आणि त्यांनीं आपल्या खुषीनें लष्करीखात्यांत नोकरी पतकरिली. त्यांपैकीं २,००० लोकांनीं हिंदुस्थानावर स्वारी करण्याची परवानगी मागण्याविषयीं सुलतानाजवळ विनंती केली; परंतु त्यांनीं त्यांचा धिक्कारच केला.

ब्रह्मदेशांतील मांडले शहरांत दोन मुली नदीवरून आंग धुऊन घरीं जात असतां त्यांपैकीं एक चिखलांत पडली, तिला तेथें एक अर्धवट पुरलेली पक्ष्याच्या आकाराची पेटी सांपडली. तिच्या बापानें त्या पेटीच्या मालकाविषयीं पुष्कळ शोध केला; परंतु कांहींच थांग लागला नाहीं पुढें कांहीं दिवसांनीं एका अधिकाऱ्यानें त्यास असें सांगितलें कीं, ही पेटी एका जुन्या टासगाईन राजाची आहे आणि ही तुह्मी जर आतांच्या राजापुढें सादर न केली तर तुमचे तो फारच हाल करील. शेवटीं त्याच अधिकाऱ्यानें त्यांजकडून ती पेटी राजापुढें हजर करविली राजानें त्या मनुष्याचा प्रामाणिकपणा पाहून त्यांजला २,००० रुपये बक्षीस दिले.

विलक्षण देवभोळेपणा —इतालींतील एका स्त्रीला पायांस कांहीं रोग झाला होता त्यानें ती फार व्याकुळ होई. औषधोपचार करून गुण येत नाहीं असें समजल्यावर पाय तोडल्याविना रोग बरा व्हावयाचा नाहीं असें वैद्यानें सांगितलें. त्याच रात्रीं तिनें रोमच्या धर्माधिकाऱ्यास असा नवस केला कीं, तुमचा पायमोजा मी एका मित्राच्या सांगण्यावरून औषध ह्मणून आपल्या पायांत घालते आणि माझा पाय अमुक दिवसांत बरा झाला तर मी तुमच्या दर्शनास येईन. कर्मधर्मसंयोगानें तिचा पाय बरा होऊन ती चांगली चालावयास लागली. पुढें नवस फेडण्याकरतां ती त्या धर्माधिकाऱ्याचें दर्शन घेण्याकरतां रोम शहरास गेली. तिनें त्यांच्या चरणावर अनन्यभावानें मस्तक ठेवून नवस फेडला. सुधारलेल्या खंडांतल्या स्त्रिया देखील अडाणी व देवभोळ्या आहेत हें पाहून मोठा अचंबा वाटतो. इं. प्र.

कांहीं दिवसांपूर्वीं ईस्ट इंडिया रेलवे लायनीवर एक चमत्कारिक हकीकत झाली ती अशी कीं एक बाई दुसऱ्या क्लासांत बसून बुगुलाहून सिल्दा एथें जात होती. त्या गाडींत ती एकटीच आहे असें पाहून त्या गाडीच्या मि. बाडी नावाच्या गार्डानें गाडी स्टेशनावरून निघाल्यावर गाडीचे खालचे भागास एक फळी असते त्या फळीवरून चालत जाऊन ही बाई बसली होती तेथें गेला व तिला वश करून घेण्याकरितां प्रयत्न केला यामुळें तिला धास्ती पडून ती आजारी झाली. पुढें सदर्हू हकीकत तिनें आपल्या नवऱ्यास सांगितली व तोही त्याच रेलवेवर चाकरीस असल्यामुळें त्यानें ती गोष्ट आपल्या वरिष्ठाचे कानावर घातली व त्यास साहेबानीं त्या गार्डावर फिर्याद करण्यास सांगितलें. परंतु फिर्यादीतर्फे त्या बाईशिवाय तेथें त्या वेळेस दुसरे कोणी नसल्यामुळें तीच मुख्य साक्षीदार असतां कोर्टांत हजर झाली नाहीं ह्मणून तो खटला सुटला. हल्लीं त्या बाईच्याच नवऱ्यावर उलट अब्रूची फिर्याद गार्डानें केली आहे असें कळतें.

अयोध्या प्रांतांतील उनाव एथील लोकांनीं पोलिसास असें कळविलें कीं आह्मी एथील धान्य वाणी लोकांस बाहेर गावीं पाठवूं देणार नाहीं व पाठविल्यास आह्मी धरून ठेवू. आणखी त्यांनीं असें सांगितलें कीं आमच्या शेतांचें पीक आमचें हातांत येईपर्यंत आह्मांस धान्य उधार मिळालें पाहिजे. ने. ओ.

## नोटिस

मेघराज किसनलाल व रामजीसन मारवाडी दुकान अकोट यासी खालीं सही करणार याजकडून लिहिण्यांत येते कीं, तुह्मास चार इसमांनीं दस्तैवज शेती नंबर कडतळी एथीलचा हक्क १० वर्षांचा लिहून दिला त्यांत तिसरा हिस्सा यंकटी बिप्र कवठेकर याचा होता तरी त्यानें साफ सांगितलें कीं, मजकडोन ऐवज मिळत नाहीं. आणि मजला शेताची गरज नाहीं. तुह्मी आणीक कोणास द्यावें. दुसरे हिस्से राहिले त्यांत तुह्मी त्रिवर्ग आहात, त्यांत बिरदीचंदही नकार करून त्यानींही सांगितलें. तुह्मी दोन इसम राहिले तरी तुह्मास रकम दोन तीन वेळेस मागावयास आलो तरी तुह्मी रकम कांहीं दिली नाहीं मजला अतिशय बेजार केलें परंतु कांहीं दिलें नाहीं. मजला रकमेची जरूर जाणून तुह्मास दस्तैवज लिहून दिला त्यांत तुह्मी माझी कांहीं बरोबरी ठेविली नाहीं. त्यावरून तुह्मास लिहिण्यांत येतें कीं, माझी नप्ती वगैरे झाली त्यानें माझी नुकसानी झाली. तुह्मी १२ रुपये कागदास दिलेबरकड कांहीं रुपये दिले नाहींत. रुपये वेळेवर देते तर माझें नुकसान न होतें. हल्लीं नुकसान झाल्याची नालिश तुह्मावर करून भरून घेईन याजविषयीं मुदत नोटिस पोंचल्यावर ८ दिवस आहे. नोटिशीच्या खर्चासहित भरून घेण्यांत येईल. कळावें. तुह्मास जो दस्तैवज लिहून दिला आहे तो रद्दी आहे. तुह्मी रुपये बरा दिले ते मी कांहीं भरून देणार नाहीं. माझें नुकसान मी भरून घेईन हें खूप समजावें. दस्तैवज तुम्हास पांच चार वेळेस मागितला तो तुह्मी कांहीं दिला नाहीं. सबब या नोटिसमार्गें तुह्मास कळविलें आहे. दस्तैवज ठेवून तुह्मास कांहीं हासल नाहीं. दस्तैवज माझा मजला परत द्यावा कळावें. तारीख ११ माहे सेप्तंबर सन १८७७ इसवी.

( सही ) हनवती बल्लद बापुजी पाटील रहाणार ताजनापुर तालुके अकोट दस्तुर खुद्द

---

नोटिस.

राघु बल्लद चिमणा झाली रहाणार मौजे महालगाव तालुके नागपुर इलाखे मजकूर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुझें माझें लग्न हिंदुधर्माप्रमाणें होऊन आज सुमार १४ वर्षें झालीं आजपर्यंत तुझा माझा जनरूढीप्रमाणें प्रपंचव्यवहार तुजकडून मुळीच झाला नाहीं. या कारणानें मी आजपर्यंत मायबापाचे घरीं राहून सावकाराचें कर्ज काढून उदरनिर्वाह केला. व तुझीही वाट आजपर्यंत पाहिली परंतु तूं येऊन मजला नेलें नाहींस व माझा प्रतिपाळही केला नाहीं. सबब या नोटिशीनें कळविलें जातें कीं, ही नोटिस पावल्यापासून १९ दिवसांचे आंत मौजे ढोरली परगणे यवतमाळ एथें येऊन मला झालेलें कर्जाचे रुपये १०० देऊन मजला घेऊन जावें. जर तुजकडून नोटिशींत लिहिलेले मुदतींत गोष्ट घडून न आल्यास सावकाराचे रुपयांबद्दल कोर्टमार्फत फिर्याद करून रुपये वसूल करण्याची तजवीज कली जाऊन पुढें दुसरा नवरा करण्यास तुझी हरकत आहे असें जाणलें जाणार नाहीं. तारीख ९ माहे आगस्ट सन १८७७ इ०

( सही ) जानकू मर्द राघु झाली हल्लीं रहाणार मौजे ढोरली तालुके यवतमाळ इचे हात ची निशाणी बांगडी.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ | अकोला रविवार ता० २३ माहे सप्तंबर सन १८७७ इ० | अंक ३८

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचें आगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिराती.

फार उपयोगी व फारच स्वस्त ग्रंथ. सोमवार तारीख १९ आक्टोबर १८७७ रोजीं विक्रीस तयार होईल.

### नवीन मराठी सिव्हिल प्रासीजर कोड,

(ह्मणजे सन १८७७ चा आक्ट १० वा.)

**विशेष समजूतीच्या खुलासेवार टिपा व इंडेक्स सुद्धा.**

सदरील कायद्याचें भाषांतर नुक्तेंच प्रसिद्ध झालें आहे. हें भाषांतर प्रसिद्ध होण्यास इतकी दीनावधी लागली व तो लवकरच अमलांत येणार आहे. तरी हरतऱ्हेचे परिश्रम करून, हा कायदा अमलांत येण्याचे वेळेवर लोकांस उपलब्ध व्हावा अशी तजवीज केली आहे. या कायद्यांतील प्रत्येक अवघड कलमावर खुलासेवार मजकूर लक्षांत येण्यासारख्या समजुतीच्या टीपा, तसेंच पूर्वीच्या कलमांवर हवालें वगैरे दिले आहेत. ग्रंथ समजुतीस व चालनास सुलभ व्हावा यासाठीं प्रथम, कलमांचे विल्हेवार विवेचन केलें आहे. तसेंच हा कायदा पसार करण्याचीं कारणें, व त्याचे हेतु हे प्रथम थोडक्यांत दाखविले आहेत. एकंदरींत हा ग्रंथ जितका सुलभ व सोईचा होईल तितका केला आहे.

उत्तम टाईपानें व जाड कागदावर हा ग्रंथ ता० १९ आक्टोबर रोजीं छापून तयार होईल. राहिलेला आल्प काळ तसेच ह्या कामास लागणारी मेहनत यांचे मानानें याची किंमत थोडी ह्मणजे ता० १ आक्टोबरपर्यंत पैसे भरणारांस २ रु० व मागाहून घेणारांस २॥ रुपये ठेविली आहे. याच पुस्तकांत सन १८७७ चा १ ला विशेष न्यायाचा कायदा सामील केला आहे.

विशेष सूचना.—ह्या ग्रंथाच्या प्रती आह्मी थोड्या काढणार आहों त्या अर्थी मागाहून लोकांस अडचण न पडावी याकरितां लोकांनीं पैसे भरण्याची त्वरा करावी. पैसे भरणें ते ज्ञानचक्षूचे मालक भाऊ गोविंद सापकर यांजकडे अगर किरण छापखान्याचे मालक महादेव बल्लाळ नामजोशी, अथवा मुंबईंत पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी, यांजकडे किंवा आह्माकडे पाठवावे तिकिटें पाठविणें झाल्यास वर्तोळ्यासकट पाठवावीं. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. व पैसे आल्याखेरीज पुस्तकही रवाना होणार नाहीं. कळावें ता. १२ सप्तंबर सन १८७७ इसवी.

नारायण बापूजी कानिटकर,
वकील डि. को. पुणें.

## जाहिरात.

### प्रश्नसमुदाय पृथःकरण.

विक्रीस तयार.

या पुस्तकाची चौथी आवृत्ति छापून तयार झाली आहे. यांत केरोकृत अंकगणितांतील शेवटील प्रश्नसमुदायाचें पृथःकरण असून आणखी विमाकमीशन, ठेव, क्षेत्रफळ, घनफळ यांचेंही पृथःकरण करून यास जोडिलें आहे. किंमत आक्टोबर अखेर घेणारास ६ आणे पडेल; आणि पुढें घेणारांस ८ आणे पडतील. टपालांतून मागविणारास १ आणा बंगीखर्च पडेल. पुस्तकें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत अथवा खालील पत्त्यावर मिळतील. रुपयाच्या तिकिटास वर्तोळा पडेल. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.
तारीख १८ माहे सेपटेंबर.
सन १८७७ इसवी.

नारो रघुनाथ गोहोळकर
मास्तर ट्रेनिंग कॉलेज मराठी
भाग अकोला प्रांतवऱ्हाड.

## सन १८७८ सालाकरितां रोजनिशी.

सन १८७८ सालाकरितां रोजनिशीचा सांचा पूर्वीं पेक्षां सवाईनें जास्त वाढविला असून बरीच जास्त सुधारणा केली आहे. हें पुस्तक येते नोवेंबरच्या २९ वे तारखेस छापून तयार होईल. यांत सरसालचे दीनचर्ये संबंधी मराठी तिथी, वार, महिने व इंग्रजी तारखा, महिने, सूर्योदय, सूर्यास्त वगैरेची माहिती दिली जाईल; शिवाय सरसालांत येणारे विशेष उपवास, ग्रहणें, सण व त्या संबंधे सरकारी हपिसांस असणाऱ्या सुट्या वगैरेचीही माहिती दिली जाईल. हिंदु शास्त्राप्रमाणें मौंजी, विवाहाचे मुहूर्त, तसेच मुसलमानी महिने, तारखा, सण इत्यादिकांचा समावेशही या पुस्तकांत होईल. रेल्वे, तारायंत्र, स्टांप, मनीआरडर्स, पोस्ट, इत्यादि अनेक नेहमीं जरूर लागणारे उपयुक्त विषयांची अवश्य तितकी माहिती दिली जाईल. २० रुपये पर्यंत दरमहा रोजमुरा चुकविण्याविषयीं माहिती मिळेल. स्मरणार्थ टिपणें करण्यांत समय विशेषीं जास्त मजकूर लिहिण्याची पाळी आली तर तो लिहिण्याकरितां पुस्तकाच्या अखेरीस कोरीं पृष्टेंही बरींच जोडलीं जातील.

या खेपेस अशी एक विशेष सुधारणा करण्यांत आली आहे कीं, इंग्रजींतही महिना, तारीख, वार दिला असून महिन्याची प्रत्येक तारीख, वार, तीथ वगैरे संक्षेपानें न देतां पूर्णपणें लिहिलीं आहेत व रवि उदयअस्ताचें कोष्टक तारीखवार निराळेंच दिलें आहे. इंग्रजी महिना, तारीख निराळी इंग्रजींतच घातल्यामुळें ज्यांस मराठी समजत नाहीं अशा गृहस्थांसही या रोजनिशीचा बराच उपयोग होणार आहे; व प्रत्येक तारीख महिना संक्षिप्त अक्षरानीं लिहिल्यामुळें त्याची बरावर समजूत होत नाहीं अशी जी तक्रार होती तीही या व्यवस्थेपासून दूर होणार आहे. सन १८७९ सालचे महिनेवार तारखांचें एकंदर कोष्टक इंग्रजींत व मराठींत रंगीबेरंगी तयार करून जोडलें जाईल. हरएक प्रकारची होईल तितकी जास्त सुधरणा करण्यांत येईल.

याची किंमत अक्टोबर अखेरपर्यंत अगाऊ भरणारांस दर प्रतीस सहा आणे पडेल व डांक हाशिलाबद्दल दर प्रतीस किंमती खेरीज १ आणा जास्त पाठवावा लागेल. एकदम १० प्रती घेणारांस डांक हशील पडणार नाहीं.

भाऊ गोविंद सापकर
ज्ञानचक्षूचे मालक

## मनोरमा नाटक.

आह्मी पूर्वीं जाहिरात दिल्याप्रमाणें हें पुस्तक ठसे छापावर छापून तयार आहे. ह्या पुस्तकाचा सांचा पाकीट डिकसनरी सारखा आहे. त्याची किंमत १॥ रुपया व बंगी खर्च २ आणे एकंदर १॥= एक रुपया दहा आणे आह्माकडे पाठविले असतां पुस्तक रवाना करण्यात येईल.

भाऊ गोविंद सापकर,
ज्ञानचक्षूचे मालक

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. खालील मजकूर कृपा करून प्रसिद्ध करावा.

मी परिभ्रमण करीत करीत एथें देऊळगावास आलों. तों ( अग्नींतून निघून फुफाटांत पडलों ) मी मागें व माझे पुढें दुष्काळ रूपी राक्षसाची स्वारी अम्मल करून मुलुख काबीज करीत होती त्याप्रमाणें एथेंही महाराजांचें ठाणें येऊन बसलें तों मीही एथें आलों. मला सुमार एक महिना झाला. वर लिहिलेले महाराज आले व मेघराजे गेले कारणानें लोक फारच हवालदील झाले होते व धारण सहा शेरावर आली होती.

पुढें सर्व ग्रामस्थ लोकांनीं एक विच्यार करून एथील जागती जोत संस्थान श्री मत व्यंकटेशजी यांसमोर अका दिवस भजनाचा नामसप्ताह रात्रंदिवस चाळीस चाळीस इसमांचे पहारे ठेवून केला. व पुराण भागवत भारत संतत वाचलें. तेहेतीस ब्राह्मणांनीं व्यंकटेशास रुद्रपवमानाचा अभिशेक केला. सप्तसिती, पर्जन्य सुक्त यांचे पाठ, श्रृंगऋषि, लोटांगन, नमस्कार वगैरे ज्याला ज्याला जें जें करावें वाटलें तें तें त्यानें सतत अका दिवसपावेतों सुरू केलें होतें. तेव्हां मध्यंतरीं दोन दिवस झड लागून सुमार १९ रोज झाले तीन इंच चाळीस दोकडे पाऊस पडून अबादी झाली व धारन तीन रुपये उतरली. पुढें ग्रामसंतर्पण पुरणाचें होऊन चार पांच शें रुपये खर्च झाला. त्यांत एक हिस्सा मदत दिली व दोन हिस्से संस्थानांतून खर्च झाला. या कामीं संस्थानचे अधिकारी कामगार लोकांनीं व गावचे सभ्य गृहस्थांनीं बरीच मेहेनत घेतली. या स्तुत्य कृत्याबद्दल त्यांची तारीफ केली पाहिजे.

एथील संस्थानांत सदावर्त आहे त्याची तारीफ करणें जरूर आहे. कारण कीं, दुष्काळग्रस्त लोक सोलापुर, करमाळें, पंढरपुर, नगर, पुणें वगैरेकडून वऱ्हाडांत येतात त्यांना मार्ग हाच आहे. त्या लोकांस विच्यारतां असें समजतें कीं, नगरास खाण्यास मिळतें व तेथून उपास कढित काढित पांच मजल आल्यावर जालनापुरी खुशाल भाऊ सावकार याचे घरीं सर्वांस आतशेर पीठ मिळतें. व देऊळगावीं दर इसमास आतशेर कणीक, आतपाव डाळ व जासरी नगदी मिळतें. सदावर्ती का[...] कुनाकडून शोध घेऊन पहातां आजपावेतों लोकसंख्या चौदा हजार झाली आहे खर्च किती लागला हें समजलें नाहीं. शोध घेऊन मागाहून कळवीन.

सुमार १९ दिवस झाले एथें देवाचे रस्त्यांत एका ब्राह्मणाचे बाईस मूल झाले होतें त्यास दोन तोंडें होतीं. एक इकडे व एक तिकडे. दोघांचें पोट एकच. पाय चार एके जागींच मात्र निराळे दिसत. व हात चार होते. तें मूल दोन दिवस पावेतों जिवंत होतें. सर्व लोक तें पहाण्यास जात होते. गर्दी जमत होती. दोन्ही तोंडांनीं रडत होतें व दोन्ही तोंडानें सुइ[...]

न दुधाचा बोळा त्यास देत होती तें मी खुद्द दृष्टीनें पाहिलें आहे.

आपले मागील अंकांत या गावचे नाटकाबद्दल आलेलें पत्रावर आपण टीका केली आहे. त्यावरून आपणाकडे कोणी चांगला खेळ झाला याबद्दल लिहिलें असेल असें वाटतें. परंतु या गावचे तिन्ही खेळ नारायणरावांचा फार्स, रास व नवनाथ पैकीं गोरक्षकाव्य नाटक असे झाले. पण तिहींतून दोन्ही पक्षाकडील एकही खेळ चांगला झाला नाहीं. एडिटरराव एथें नाटकाचे दोन पक्ष कलगी तुऱ्याप्रमाणें आहेत. त्यापैकीं एकीकडची तारीफ कोणी लिहिली असेल परंतु खरें बीज पहाल तर दोन्हीकडील खेळ जमले नाहींत हेंच आहे. नाटक करणें हें वजनदार व विद्वान लोकांस थोडें कमीपणाचेंच आहे. एथील नाटक करणारे दोन्ही पक्षाचे मंडळींनीं वर लिहिलेले सप्ताहाचे दिंडीचे दिवशीं तंटा उपस्थित करून लाठालाठीचा बेत आणला होता. पण एथील चीफ कान्स्टेबल व वहिवाटदार यांणीं मधें पडून तो मोडला व उभय पक्षाचे मंडळीची ज्ञानमठीं जाण्याची उमेद खटाविली.

मोगलाईंतील वालर एथें देऊळगावचा बाळाजी गेला ही गप मागें ऐकिली होती परंतु तें सर्व खोटें आहे. तेथील रंगाऱ्यानें हें कृत्य केलें होतें. त्यास सरकारांतून विच्यारपूस होऊन हल्लीं तें सर्व दबलें. हल्लीं या गावीं यात्रा नजीक आली ह्मणून मंडप वगैरे कामाची तयारी सुरूं आहे. बेपारी लोकांस दुकानाबद्दल पैसा पडूं नये ह्मणून रुपये ९०० सरकारांत भरीत असतात. ते देण्यास वहिवाटदार जाणार ह्मणून ह्मणतात.

काल रोजीं एथें दोन इंच पाऊस पडला व आसपास वीस वीस कोस पडल्याची खबर आली आहे पिकें भरगच्या आली आहेत रोगराई कांहींएक नाहीं.

येणेंप्रमाणें एथील हवाल आहे. पत्र विस्तार फार झाला सबब पुरे करितों. कळावें तारीख १३ सप्तेंबर सन १८७७ इसवी. मुक्काम देऊळगावराजा तालुके चिखली जिल्हे बुलढाणें.

आपला भ्रमण करणारा
पक्षी.

---

## वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद वद्य १ शके १७९९

---

दुष्काळ पीडितांकरितां विलायतेंतील उदार लोकांच्या धर्मादायाची रकम दिवसानुदिवस वाढत चालली आहे. आजपर्यंत साडेसोळा लक्ष रुपये लंडानाहून एका म्यानसन हौस फंडाकडून आले. व याचप्रमाणें एडिंबरो, डब्लीन, म्यांचेस्टर, लिवर्पूल, ब्रैटन वगैरे शहरांतून वर्गणीच्या यादी चालू आहेत तेव्हां अजून पुष्कळ वर्गणी येईल असें अनुमान आहे व त्याकरितां आह्मी विलायतेंतील उदार लोकांची तारीफ करितों.

हिंदुस्थान सरकारचा लोकांची खासगी देणगी किंवा वर्गणी जमविण्याकडे विशेष कल दिसत नाहीं असें ह्मणतात. व त्यास असें एक कारण पुढें आणलेलें आहे कीं हा जो कोट्यावधि रुपये आतां दुष्काळानिमित्त सरकारास खर्च होत आहे तो भागविण्याकरितां लोकांवर पुढें कांहीं जबरदस्त कर बसवावे लागतीलच. तेव्हां हें धर्मादाय द्रव्य गोळा केलें ह्मणजे लोकांस ओझ्यासारखें वाटून त्रासरूप होणार आहे सबब धर्मादाय देण्याची गोष्ट लोकांच्या संतोषाची आहे या करितांच ती लोकांच्या खुशीवर हिंदुस्थान सरकारानें ठेविली आहे त्याबद्दल त्यांनीं आपलें मत वगैरे कांहीं दिलें नाहीं.

---

मुंबई इलाख्यांतील कित्येक जिल्ह्यांतील वर्तमानपत्रांवरून कळतें कीं दुष्काळ पीडित लोकांचा बच्याव व व्यवस्था करण्याकडे सरकारानें पहिल्याहून अधिक लक्ष आतां दिलें आहे व कामें बंद केलीं होतीं तींही कांहीं कांहीं सुरूं केलीं आहेत यावरून सरकार उदार हस्तानें खर्च करून रयतेस जगविणार हें खास आहे. आणि असें आहे तर त्या कामीं लागणारा पैसा कसा पैदा करावा याचा विचार सरकारानें केला पाहिजेच. आतां तो एकादा मोठा जबरदस्त कर बसवून एकदम घ्यावा किंवा लोकांपासून कर्ज काढून घ्यावा अथवा कांहीं खर्चांत काटकसर करून थोडथोडा पैसा शिलकेंत पाडून तो पैसा वसूल करावा. या पैकीं कोणती तजवीज करावी हें ठरविणें मोठें विच्याराचें व शहाणपणाचें आहे. व त्या पैकीं कोणता प्रकार हिंदुस्थान सरकारानें योजला त्याविषयीं तथ्य कळलें नाहीं, पण कर बसविण्याची जी भुमका निघाली आहे तिजवरून तसा कांहीं प्रकार असावा असें अनुमान होतें. आणि तें खरें झालें तर दोन वर्षें तापत्रय सोसिलेल्या लोकांस लागलीच तिसरे वर्षापासून नवा कर देणें बरें वाटणार नाहीं. लोकांचीं मनें एक दोन वर्षें चांगलीं आबादानी होऊन खाऊन पिऊन धालीं पाहिजेत व शांत झालीं पाहिजेत ह्मणजे मग त्यांवर एकादा नवा कर आल्यास त्यांस फारसें अवघड वाटणार नाहीं सबब कांहीं खात्यांतून सेव्हिंग करावें व कांहीं कर्ज काढावें हें बरें असें आह्मास वाटतें. तसेंच सेव्हिंग करण्यांतही चांगला विचार झाला पाहिजे. कित्येक युरोपियन हजारों हजार रुपये पगारावर नोकर आहेत व त्यांच्यांतील कित्येक जागा नेटिवांस चालवितां येण्या जोग्या आहेत व त्या नेटिवांस दिल्या असतां कांहीं पगार कमी करतां येतील हा एक प्रकार व आणखी विचार केला असतां कित्येक प्रकार दृष्टोत्पतीस येणार आहेत सबब तसा कांहीं विचार व्हावा व कांहीं कर्ज काढावें आणि नवीन कर बसवूं नये असें बहुत लोकांस वाटतें मग सरकारचा विचार काय ठरतो तो पहावा.

---

## रशियाचा पराभव.

विलायतेहून लढाईसंबंधी जीं वर्तमानें आलीं आहेत त्यावरून समजतें कीं, प्लेवना या जागीं पुन्हा तिसरी लढायी झाली व तिसऱ्यानेंही रशियन लोकांचा पाडाव झाला. काय चमत्कार आहे कीं, रशियासारख्या पराक्रमी राजाच्या पाठीस अपयश लागलें आहे! एकंदर बहुतेक लढायामध्यें त्यांचा पराभव झाला आहे. या जागीं त्यांचे सुमार ३०० आफिसर मेले व १२०० लोक पडले यावरून या लढाईचा शेवट कसा होईल त्याविषयीं कल्पना मनांत येते. तुर्कस्थानच्या लोकांची शाबास खरी. त्यांनां कोणाचें सहाय नसतां नामांकित राजाशी त्यांनीं टक्कर मारिली व जय संपादन केला. रशियाचे जें ८० हजार सैन्य बाल्कन उतरून गेलें. त्यांतून पुष्कळ मेलें व राहिलें आहे तें पुन्हा स्वदेशीं पाहील किंवा नाहीं याविषयीं संशय दिसतो. इंग्लिश वर्तमानपत्रांतून लिहिलें आहे कीं या धोरणावरून बहुधा एक दोन आठवड्यांत लढाई संपेल. तुर्कस्थानच्या मुसलमान लोकांनीं यावेळीं चांगली गाजविली व त्याबद्दल त्यांची तारीफ केली पाहिजे. आतां पुढें काय वर्तमान येतें पाहूं.

---

**सिव्हिल प्रोसिजर**— ह्मणजे दिवाणी कामासंबंधी वहिवाटीचा नवा आक्ट सन १८७७ चा १२ वा हा तारीख १ माहे अक्टोबरपासून अमलांत येणार अशी जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. पण त्याचें मराठी भाषांतर प्रसिद्ध झालें त्यास सारे दोन आठवडेच झाले. ह्मणून इतक्या जलदीनें हा आक्ट चालू करूं नये. कांहीं मुदत द्यावी अशाविषयीं पुण्याची सार्वजनिक सभा कांहीं खटपट करीत आहे. खरेंच एवढा मोठा आक्ट मनन करण्यास व त्याप्रमाणें वर्तन करण्यासाठीं तयार होण्यास लोकांना कांहीं अधिक अवकाश पाहिजे होता यांत संशय नाहीं. व त्याप्रमाणें सरकार जानेवारीपर्यंत थांबेल तर बरें होईल. आमच्या वऱ्हाडासही हा आक्ट लागू व्हावयाचाच. कारण याचे पूर्वींचा सन १८५९ चा आक्ट ८ हा लागूं आहे ह्मणून त्या ऐवजी जो झाला तो लागू होणें आतां अवश्यच आहे. व त्याप्रमाणें ठराव ही लवकर येईलच.

या अक्टाच्या मराठी प्रती छापण्याचे कामीं बऱ्याच लोकांची पुष्कळ गडबड झाली. ठाण्याच्या अरुणोदय छापखान्यानें जाहिरात दिली होती कीं सरकारी मराठी प्रत छापून बाहेर पडल्यापुढें २० दिवसांनीं आह्मी लोकांस पुस्तक देऊ. पुढें पुण्याच्या न्यायाश्रय छापखान्याकडून अशीच जाहिरात प्रसिद्ध झालेली पाहिली व अलीकडे पुन्हा पुण्याच्या गोंधळेकरांच्या छापखान्यांत एक प्रत छापत आहे व कानिटकर वकील एक प्रत छापीत आहेत असें कळतें. परंतु सरकारी मराठी प्रत छापून बाहेर पडण्यास इतका अवकाश झाला कीं या सर्वांतून एकही प्रत अक्टोबरचे पहिले तारखेपूर्वीं गिराईकास मिळत नाहीं. अस्तु. आह्मी या अक्टाच्या प्रती विक्रीकरितां आणविल्या आहेत व त्या येतांच वाचकांस कळवूं.

---

### रसियाच्या संबधानें इंग्लंडाचें मत

रसिया देश अर्धवट सुधारलेला असून कलाकौशल्यें, शास्त्रीय विषय, राजकीय प्रकरणें, धर्म आणि नीति यांच्या संबंधानें तो युरोपांतल्या इतर देशापेक्षां फारच मागें आहे. राजकीय प्रकरणांत इंग्लंड व इताली यांजशीं त्याच्यानें बरोबरी करवणार नाहीं. नोकशोकींत व नेटनेटकेपणाच्या कामांत तो फ्रान्सापेक्षां फार दूर आहे. हल्लींचे बादशहा पदारूढ झाल्यापासून काय तो त्या देशांत सुधारणेंचा पाया पडला. सांप्रतच्या स्थितीच्या मानानें पाहिलें तर तो देश केवळ अडाणी आहे असेंच ह्मटलें पाहिजे. त्या देशांत पार्लमेंट सभा मुळींच नाहीं, तेव्हां अर्थात राज्य चालविण्याच्या कामीं रयतेचें अनुमोदन आहे किंवा नाहीं हें उघड आहे. राज्य चालविण्याचें काय तें सगळें सूत्र झार साहेबाजवळ आहे. झार पुष्कळ दिवस गादीवर टिकेल किंवा नाहीं याचा देखील संशय वाटतो; व कदाचित एखादे दिवशीं त्यास त्यांची रयत पदच्युत करील किंवा ठार मारून टाकील; कारण कीं, त्याच्या विरुद्ध आंतून बंडाचा पुष्कळ प्रभव झाला आहे. यावरून रशियन राज्याची रचना बळकट व खंबीर नाहीं असें वाटतें. पिटर धि ग्रेट मृत्यु पावल्यावर त्याच्या पाठीमागून जे रशियाचे बादशहा होऊन गेले त्यांपैकीं आलेक्झिस, इव्हान ६ था, पिटर ३ रा आणि पाल हे मारेकऱ्याच्या तरवारीखालीं मरण पावले. आलेक्सिझास प्रत्यक्ष त्याच्या बापानें मारविलें व ३ ऱ्या पिटरास त्याच्या बायकोनें मारविलें. नीतींत रशिया आतां थोडाबहुत सुधारला आहे; परंतु पूर्वीं सर्व राजमंडळ अनीतींत बेफाम होतें. पहिल्या पिटरानें दुसऱ्या मनुष्याच्या एका राख स्त्रीशीं लग्न लावून तिला रशियाची मोठी कायराईन बनविली. आणि पुढें त्यानीं एलिझाबेथ आणि थोरली काथराईन ज्या रशियाच्या राण्या होऊन गेल्या त्या तर केवळ अनीति व व्यभिचार यांच्या प्रत्यक्ष मूर्तिच होत्या. सेंट पिटर्सबर्ग एथें राजघराण्यांत अद्यापि सुद्धां असे कांहीं प्रकार घडत आहेत. रशिया देशांत मद्यपानाचा प्रसार फार आहे, आणि बायकांनां मारणें हें तर जसें कांहीं तेथल्या लोकांस पुण्यकर्मच वाटतें. आतांच्या बादशहानें बायकांस रस्त्यांत मारूं नये असा कायदा केला आहे ह्मणूनच कांहीं बरें झालें आहे नाहीं तर ते लोक भर बाजारांत आपल्या नाजुक स्त्रियांस मारण्याला मागें पुढें पहात नसत. रशिया देशांत धन्याला आपल्या चाकरास विकण्याला किंवा फाशीं देण्याला अधिकार आहे; परंतु गुलामाचा व्यापार नुकताच बंद झाला. विद्येंत तर तो देश शून्यवतच आहे असें ह्मटलें तरी चालेल. . देवभोळेपणांत तर त्या देशांतले लोक हिंदुस्थानांतल्या लंगोटी घालणाऱ्या कुळवाड्याला देखील मागें सा-

रतीळ. रशियांत भटाचें महात्म्य मोठें आहे. याप्रमाणें रशियाची स्थिति आहे. पुढें असेंच चाललें असतां येणाऱ्या काळांत रशियाचा उदय खास होईल. परंतु सध्या त्यानें तुर्कस्थानाशीं उगीच धुसपूस करण्यांथ कांहीं अर्थ नाहीं. इं. प.

---

वायव्य प्रांतांतील कित्येक कालेजें सरकाराकडून अनीच बंद करण्यांत आलीं आहेत असें अगदीं ताज्या बातमीवरून समजतें. आमच्या सरकारानें आपल्या राज्याच्या मुळारंभीं जें एक विद्येचें ढोंग पुढें ढकलून दिलें त्यास आतां क्षय लावण्याचें कारण काय असावें हें मुळींच समजत नाहीं. आमच्या लोकांच्या पाठीस लागून सरकारानें जी त्यांस विद्येची अभिरुची लाऊन दिली त्याच्या योगानें आमचे साळी, कोष्टी, तांबट, सोनार, पाथरवट वगैरे लोकांनीं आपले पिढीजादे धंदे सोडून चाकरीच्या आशेनें आपल्यास अन्नास महाग करून घेतलें. यांच्या या अशा करणीनें देशांतील व्यापार धंदा अजीच बुडाल्यामुळें देशांतील सर्व लोकांस प्रत्येक पदार्थाबद्दल दुसऱ्या देशांतील लोकांपुढें तोंड वेंगडावें लागतें. इतकेंही करून दिवसंदिवस या देशांतील व्यापार अगदींच हटत चालल्यामुळें लोकांच्या जवळ अगदींच त्राण उरला नाहीं, हें यंदांच्या दुष्काळावरून सर्वांच्या लक्षांत आलेंच असेल ही सर्व दशा आह्मासवांस विद्येची गोडी लागून ती साध्य झाली ह्मणजे आह्मी दुसरा कांहींएक धंदा न करतां चाकरीच्याच पाठीस लागतों त्याच्याच योगानें झाली असें ह्मणावें लागतें. विद्येनें इतकी आमची घाणेरी दशा करून सोडली व आतां आह्मास त्या दशेतून मुक्त होण्याची मुळींच आशाही नसतां आमचें सरकार आह्मास ती विद्या देण्याचा क्रम दिवसंदिवस कां बंद करतें हें समजत नाहीं. एक आडाणी असावें अगर पूर्ण विद्वान तरी असावें, पण याच्या अधर्लीं मधलीं सर्व मनुष्यें कांहींच कामाचीं नाहींत हें अगदीं ठरलेलें आहे याकरतां आह्मास सरकारानें अशा अर्धवट स्थितींत टाकणें हें त्यांच्या न्यायीपणास मुळींच गैर आहे.

अ. द.

---

## वऱ्हाड.

---

पर्जन्याची फार अपेक्षा आहे. एक जर चांगला पाऊस पडेल तर दाहा पंधरा वर्षांत पीक आलें नाहीं असें उत्तम पीक या वर्षी येईल असें ह्मणतात. पावसाचीं लक्षणें दिसत आहेत. व काल ४॥ वाजतां एक चांगलीच सर आली.

---

मे० जोन्स साहेब कमिशनर सोमवारीं सिमल्याकडून येऊन परभारेंच उमरावतीस गेले. लवकरच अकोल्यास येणार आहेत असें वर्तमान आहे.

---

उमरावतीचे डाक्टर मि० महालिंगपीले हे येथें येऊन खासगी रीतीनें आपला धंदा चालविणार आहेत असें कळतें. या संबंधानें दोन ओळी आह्मांस अधिक लिहावयाच्या आहेत त्या पुढील अंकात लिहूं.

---

जळगाव तालुक्यांतील डाक्याच्या मोकदम्याची येथें डिपुटी कमिशनर साहेबा पुढें चौकशी चालू आहे. अजून निकाल झाला नाहीं.

---

इचलकरंजीकर नाटककार मंडळीनें काल रोजीं "नृसिंव्हअवतार" व चार नवऱ्याचे भांडणांत पांचव्यास लाभ हा लग्नाचा फार्स असे खेळ केले. दोन्ही प्रकारांत बहुतेक पात्रांनीं आपलें बरेंच कसब दाखविलें. ही मंडळी लवकरच देऊळगावराजा एथें बालाजीचे यात्रेकरितां जाणार आहे तेथें बरीच प्राप्ती होईल यांत संशय नाहीं. कारण या मंडळीची टापटीप, गुणग्राह्यता व लोकप्रीति संपादन करण्याची शैली फार चांगली असून हे आपले कसबांतही हुशार आहेत. व या मंडळीचे प्रमुख रा. रा. राघोपंत हे या कामांत निष्णात असून पुष्कळ दिवसाचे अनुभाविक व मुत्सद्दी आहेत तेणेंकरून कोणत्याही ठिकाणीं यांस कांहीं अडचण यावयाची नाहीं. तशांतून देऊळगावास तर यात्रेचा मोसम आहे ह्मणून तेथील लोकांकडून यांस उदार आश्रय मिळेलच. एथें एकंदर तीन महिन्यांत या मंडळीचे १२ खेळ झाले. त्यांत दोन तर अगदी नवीन तयार केलेले केले. हें त्यांच्या धंद्यास भूषणार्ह आहे.

---

मे० डाक्टर आबट साहेबांची स्वारी गेले आठवड्यांत एथें आली होती. त्या प्रसंगीं त्यांनीं ह्या खात्यांत ४ देवीडाक्टर नवीन भरती केले. व कांहीं देवी डाक्टरांचे वर्ग वाढविले. साही जिल्ह्याचे नेटिव सुपरइंटेंडेंट, व देवीडाक्टर एथें जमा झाले आहेत. व लवकरच ते आपापल्या जागीं जातील. मे. डाक्टर आबट साहेब परवाचे दिवशीं उमरावतीकडे गेले तेथें थोडे दिवस राहून नंतर ते चिखलदऱ्यास जातील.

मि. कीज कमिशनर साहेबांचे हेड क्लार्क हे एक वर्षाची ( फेर्लो ) रजा घेणार असें कळतें.

रा. रा. दिनकर नारायण नामजोशी वाशीमचे शाळेतील अ. मा. यांजवर एका गड्याला मारल्याबद्दल फिर्याद झाली होती. तींतून ते निष्कलंक पार पडले.

मलकापुरच्या ए. अ. कमिशनरचे शिरस्तेदार रा. रा. रामराव व्यंकटेश ह्यानां कारंजास नेमिलें व कारंजाचे ए. अ. कमिशनरचे शिरस्तेदार रा. रा. गणपतराव ह्यानां मलकापुरास नेमिलें. उ. अ.

---

इलिचपुर येथें चोरी—मुंगीलाल मारवाडी याचे घरीं चोरी झाली. सुमारें ४।९ हजाराचा ऐवज चोरीस गेला. पोलिस तपासांत आहे.

रा. रा. कृष्णराव सखाराम ऊर्फ बापुसाहेब पो. इ. उमरावती यांची स्वारी गेल्या रविवारीं मित्रमंडळीस भेटण्याकरितां एलिचपूर एथें गेली होती.

---

अकोट येथें गरीब निराश्रित अशा लोकांस धर्मार्थ धान्य देण्याकारितां वर्गणी जमवून धान्य वांटणें सुरू असल्याविषयीं मागील अंकांत मजकूर लिहिलाच आहे. त्यांत ज्या उदार व दयालु गृहस्थांनीं वर्गणी दिली त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—

| नांवें | रकम |
|---|---|
| मि. दोराबजी कावसजी तहशिलदार | १० |
| ,, हसुबाबा देशमुख | १० |
| ,, नजमुद्दीन | १०८ |
| ,, सफदर अल्लीबेग पो. इ. | ८ |
| रा. रा. सदाराम खेमराज | ९१ |
| ,, शंकरलाल जैसीराम | २९ |
| ,, परशराम अंबालाल | २१ |
| ,, सदाराम फत्तेलाल | २९ |
| ,, चुनीलाल शिवचंद | ९१ |
| ,, विठोबा नाईक जोत | ९१ |
| ,, गणोबा नाईक असलकार | ९१ |
| ,, रामराव ठोंबरे | ९१ |
| ,, प्राणसुक हरलाल | २१ |
| ,, मोतीराम जमादार | ११ |
| ,, गबूशिंग जमादार | ९१ |
| ,, रामदत्त किसनदयाळ | ९१ |
| ,, सदाशीव गोविंद दामले | ९ |
| ,, बापुजी मुकुंद नायब तहशिलदार | ३ |
| एकूण रुपये | ४९७८ |

या वर्गणी शिवाय या व दुसऱ्या कित्येक गृहस्थांनीं तेथील दवाखान्यास व शाळेस वर्गणी दिली आहे. कोणत्याही लोककल्याणाच्या व सार्वजनिक कामास मदत देण्याविषयीं तेथील साहू सावकार व संभावित गृहस्थ फार झटत असतात असें समजतें.

---

## वर्तमानसार.

---

इंग्लंडांतील "स्टांडर्ड" नामे पत्रांचा पारिस एथील बातमीदार लिहितो, एथें तारायंत्रानें अशी खबर आली कीं इरानचा शहा हा रशियन सरकाराशीं तह करणार होता पण आर्मीन्या देशांत तुर्क लोकांनीं रशियन फौजेचा कित्येक वेळां पराभव केला हें ऐकून त्यानें तो बेत सोडून दिला. तो आतां ह्मणतो कीं आह्मी कोणाचाही पक्ष स्वीकारणार नाहीं.

अंतर राष्ट्र— इंग्लिश सरकारचे परराज्यसंबंधी प्रधान लार्ड डर्बी यांनीं ता. ६ रोजीं लिवरपूल एथें भाषण केलें त्यांत सांगितलें कीं हल्लीं तुर्की व रूस यांची लढाई चालली आहे तींत तिऱ्हाइतांनीं मध्यस्थी करण्याचा हा प्रसंग चगांला नाहीं पण जेव्हां योग्य प्रसंग येईल ( व तो येण्यास फार दिसव लागणार नाहींत ) तेव्हां इंग्लंडचें सरकार तो व्यर्थ जाऊं देणार नाहीं— कांहीं दिवसांवर आस्त्रिया व जर्नमी या दोहों राज्यांच्या बादशहांची भेट झाली अशी उभयतांचे मुख्य प्रधान कौंट आंद्रेसी व प्रिन्स बिस्मार्क यांचीही लौकरच भेट होणार आहे.— ता. ११ रोजीं वियना एथें मोठा भोजन समारंभ झाला त्या प्रसंगीं आस्त्रियाच्या बादशहानें भाषण केलें त्यांत तो असें ह्मणाला कीं, "रशियाचा झार हा माझा परममित्र व सहाकारी आहे."

दुष्काळग्रस्त लोकांस सरकार सहाय करीत आहे सबब कोणी लोकांनीं खाजगी रीतीनें अन्न वगैरे वाटून कोणाला सहाय करूं नये असा हिंदुस्थान सरकारचा आग्रह होता, तो दुष्काळांची वास्तवीक स्थिति लार्ड लिटन यांच्या पहाण्यांत आल्यावरून त्यांनीं सोडला, असें टैम्स आफ इंडियाच्या समजण्यांत आलें आहे.

ज्ञा० द०

काशमीरच्या महाराजानीं मागें जी एक कित्येक बड्या इंग्रजी कामगारास मेजवानी दिली त्या वेळेस दोघा गोऱ्यांनी कांहीं हचकटपणा केला होता व त्यावरून त्यांस हद्दपार केलें होतें ती शिक्षा रद्द होऊन पुन्हा त्यास आपल्या चाकरीवर रुजू होण्याचा हुकूम झाला.

बंगालचे ९सिविलियन मद्रासेंत दुष्काळाकरतां देण्याचे ठरलें होत तें तूर्त न पाठवण्याचें ठरलें आहे. अ. द.

हिंदु लोकांच्या भविष्याचा ठोक ताळा— तुर्की व रशियन यांजमधील लढाई, हिंदुस्थानच्या सरहद्दीवरचा दंगा, बंगाल्यांतील तुफान, आणि दक्षिण हिंदुस्थानतला भयप्रद दुष्काळ यांनीं हिंदु, महंमदी व ख्रिस्ती या सर्व लोकास एकसारखीच मानस चिंता लावून दिली आहे परंतु यांत हिंदु लोकांना त्यांच्या योगानें पराकाष्टेची धास्ती पडली आहे. हिंदु शास्त्राचें प्रमेय असें आहे कीं राजसुय यज्ञाची समाप्ती झाल्यावर लढाई, रक्तपात, दुष्काळ, रोग व अनिष्टकाळ हीं निश्चयें करून येतात. आणि याप्रमाणें हस्तिापुरास युधिष्ठिर राजानें राजसुययज्ञ केल्यावर या देशीं संकटें आलीं होतीं व आतांही दिल्लीचा दरबार झाल्यापासून तसे प्रकार व्हावयास लागले आहेत. हिंदुस्थानांतल्या रयतेचें मत कसें काय आहे हें न पहातां महाराणी साहेबांनीं चक्रवर्तिनी हें पद स्वीकारून दिल्लीस ह्मणजे हस्तिनापुरास राजसूययज्ञाप्रमाणें समारंभ केला त्यानेंच या देशावर हें अनिष्ट प्रसंगाचें दुःख गुदरलें आहे असें हिंदु लोक स्वतंत्र रीतीचें मत देतात. आतां हें त्यांचें मत कदाचित देवभोळेपणाचें असेल, परंतु त्यापासून राज्यकर्त्यांनीं पुष्कळ शहाणपण घेण्या योग्य आहे असें इंडियन मिरर कर्त्यांनीं ह्मटलें आहे हें त्यांचें ह्मणणें त्यांना कोणत्या कारणानें सुयुक्तिक दिसलें असेल तें असो. महाराणी साहेबांनीं हा राजसूययज्ञ केला असें ह्मणणेंच अगोदर ज्ञात्या हिंदु लोकास अप्रशस्त दिसेल आणि तसें जरी मानलें तरी त्यामूळेंच हिंदुस्थान देशावर असे प्रसंग गुदरलें आहेत असें ह्मणणें विलक्षण कल्पनेचें आहे असें वाटतें. हिंदु लोकांच्या भविष्याचा ठोकताळा या उदाहरणावरून जमतो असाच जर हिंदु लोकांना सिद्धांत करावयाचा असेल तर त्यांनीं दिल्ली दरबारचें कारण पुढें न करतां ईश्वराची अवकृपाच या संकटांस कारणभूत आहे असें मानणें हेंच काळास उचित आहे असें आह्मास वाटतें. इं. प.

गेल्या बारा महिन्यांत बंगाल्यांतून ३ कोटि मण तांदुळ बाहेर पाठविण्यांत आले. त्यां पैकीं २ कोट ४०लक्ष मण दुष्काळ पीडित प्रदेशांत आले.

सु० प०

फेरोजपुर एथें पलटणींतील एका अंमलदारानें आपली बंदुक साफ करण्याकतां गड्याजवळ दिली होती ती तो साफ करीत असतां तिचा चाप पडला व आंत भरलेला बार त्यास माहीत नसल्यामुळें ती उडून जवळच्या एका भिस्त्यास लागून तो मरण पावला.

फ्रान्स देशांतील प्रसिद्ध वक्ते व नामांकित गृहस्थ मोंजी गबेटा यांनीं लिल्ले या ठिकाणीं भाषण केलें त्यांत त्यांनीं सरकारचा दोष दाखविला. त्याजवरून खटला होऊन त्यास तीन महिन्यांची ठेप व दोन हजार फ्राक्स दंड याप्रमाणें शिक्षा झाली.

कलकत्यांतील कांहीं गृहस्थांनीं एक मंडळी काढली आहे ते आस्ट्रेलिआंत जाऊन तेथें कांहीं जमीनी खरेदी करून त्यांत नीळ, चहा व तंबाखू यांची लागवड करण्याचा त्यांचा विच्यार आहे. या मंडळीचें भांडवल २,००,००० रुपयांचें आहे.

मुंबईस मि० बेहेरामजी मंचरजी यांणीं हल्लीं असलेल्या बग्यांत फार अडचण होते सबब गाडी हाकणारास बसण्याकरितां निराळी जागा करून नवीन बगीचा नमुना तयार केला होता. तो नमुना पसंत होऊन म्युनिसिपल कमिशनर यांनीं त्यास ६०० रुपयांचें पहिलें बक्षीस दिलें.

सरकारानें जी. आय. पी. रेलवे कंपनीस असें सुचविलें आहे कीं, मुंबई एथील स्टेशनावर असलेल्या मालाच्या डब्याकरितां जे अर्ज व्यापाऱ्याकडून आले असतील त्यांचा विचार करण्याकरितां एक कमिटी नेमावी. त्यांत डिपुटी कन्सलटिंग एंजिनियर हे प्रेसिडेन्ट असावे व एथील स्टेशनावरील गुडस सुपरिंटेंडेंट किंवा एजंट नेमतील असा दुसरा कोणीहि कामदार, चेंबर आफ कामर्सचे कमिटींतील एक सभासद, व दाणेवाले व्यापाऱ्यांचे तर्फेनें ४ वकील हे सभासद नेमावे.

गवर्नर जनरल हे मद्रासेस असतां तेथील सरकारी छापखान्यांत रात्रंदिवस काम चालत होतें. लार्ड लिटन स्वतः प्रुफें तपासीत होते. आदितवारीं ज्या लोकांनीं काम केलें त्यांस चार दिवसांचा पगार अधिक देणार असें कळतें.

विंचवावर औषध—एक चमचाभर ब्रांडींत [ दारू ] खाण्याचें मीठ मिश्र करून तें जेथें विंचू चावला असेल तेथें जोरानें चोळावें ह्मणजे विंचू उतरतो.

सिंधप्रांतांत वेळेवर चहूंकडे पाऊस पडला यामुळें तेथें आतां दुष्काळाची भीति नाहीं असें लोक ह्मणूं लागले आहेत.

हिंदुस्थानांतील कांहीं मुसलमान लोक कान्स्टांटिनोपल येथें गेले होते. तेथें ते सुलतानाकडे जाऊन त्यांनीं आमचे एक व्हालंटीअर कोर करावे असें विचारलें; परंतु सुलतान कबूल करीत नाहींत यामुळें ते फार त्रासले आहेत असें समजतें.

पेरू देशांत मोयो बाबा ह्मणून एक शहर आहे त्या शहराजवळ एक नवीन वनस्पती सापडली आहे. या वनस्पतीचे अंगीं असा चमत्कारिक गुण आहे कीं तो हवेंतील सर्व ओलावा शोषण करून घेतो व तो ओलावा एके ठिकाणीं जमून कांहीं दिवसांनीं या झाडाच्या पानांतून पावसाच्या सरीप्रमाणें पाणी वाहूं लागतें व त्यापासून आसपासची जमीन अगदी ओलसर होतें परंतु यापेक्षांहीं त्याचा विशेष अधिक उपयोग होतो तो असा कीं, उन्हाळ्यांत ज्या वेळेस पाणी वगैरेचा तोटा असतो त्यावेळेसही याचा उपयोग होतो असें ह्मणतात. हें जर खरें असेल तर आमच्या इकडील बागावरील सुपरिंटेंडेंटानीं इकडे वारंवार पावसाची कमताई पडूं लागली आहे सबब ह्या झाडांची लागवड करावी असें आह्मी सूचवितों.

मृत्यू—आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं, कपूरथळ्याचे राजे यांस धरमशाळा एथें ता० ७ रोजीं देवाज्ञा झाली. यांचें वय २४ वर्षांचें होतें. यांस एक पांच वर्षांचे चिरंजीव आहेत ते वयांत येईपर्यंत संस्थानची सर्व व्यवस्था इंग्रज सरकारचे तांबेत रहाणार असें समजतें.

मुकर्जी मागेझिनचे प्रसिद्ध कर्ते बाबू शंभूचंद्र मुकर्जी यांची आगरथळ्याचे महाराजांनीं आपल्या मुलखाचे दिवाण ह्मणून नेमणूक केली.

ने. ओ.

शांगाई येथें च्यायनीज लोक नवीन एक कापसाची गिरणी काढणार आहेत. यंत्रें वगैरे सर्व विलायतेहून येणार खरीं परंतु काम करणारे सर्व च्यायनीज लोक ठेवावयाचे असें समजतें.

शिंदे सरकारांनीं सर्व सुभ्यानिहाय मिळून ४० लक्ष रुपये पाठवून देवून दुष्काळ पीडित लोकांसाठीं कामें सुरू करावयाचा निश्चय केला आहे.

किरण.

---

## स्वर्ग दूर तसाच जवळ आहे.

दुर्बीणीच्या योगानें आकाशांतील लांब लांब अंतरावरील गोल आपल्या नेत्राच्या जसे जवळ येतात, त्याचप्रमाणें विश्वासाच्या द्वारें स्वर्ग आत्म्याच्या समीप येत असतो. मनुष्यमात्र सर्वदा अशी कल्पना करीत आले आहेत कीं स्वर्ग हा आकाशांत ढगाच्या अथवा समुद्राच्या पलीकडेस आहे; व तो अंतरावर आहे असें वाटल्यामुळें अधिक सुशोभीत असा दिसतो. यामुळेच भक्तीपरायण लोकांच्या ठायीं धर्मनिष्टा व गंभीर कल्पना उत्पन्न होऊन त्यास असें वाटतें कीं वर अथवा पुढें लांब अंतरावर कांहीं सुंदर व रमणीय जागा आहे तेथें साधूंची वस्ती आहे व तें स्थान इंद्र धनुष्यांतील रंगांनीं सुशोभित आहे. त्या स्थानांत सर्व वस्तू निर्मळ चांगल्या व मनमोहक असाव्यातसे त्यांस वाटतें. कोणताही धर्म असो त्यांत स्वर्ग दूर आहे ही कल्पना असते. या सृष्टीपेक्षां अधिक चांगली सृष्टी जी ती दूर अंतरावर आहे हा विचार सर्वत्र साधारण आहे. आपला प्रियकर स्वर्ग मृत्यु नंतर प्राप्त होणार व तो या पृथ्वींत मुळींच नाहीं असें मनुष्यास वाटतें ही गोष्ट कांहींसी चमत्कारीक परंतु खरी आहे. आपले अमोलिक भांडार आणि सुखकारक रहिवासस्थान हीं या भ्रष्ट प्रपंचाच्या छायेपासून व अमंगळ संसर्गापासून दूर अंतरावर ठेवणेंच मनुष्यास बरें वाटतें. स्वर्गाच्या जवळ नाहीं तर त्यापासून कांहीं अंतरावर दूर रहाणें त्यास आवडतें. स्वर्गाचा प्रकाश व त्याच्या रचनेचें सौंदर्य हीं कदाचित् अंतरावरूनच चांगली दिसतात. यद्यपि अंतरामुळें स्वर्ग संबंधी कल्पना कितीही मनोरम भासली तथापि सर्व श्रद्धा त्या अंतराचा नाश करिते. मनुष्यास वाटते त्यापेक्षां स्वर्ग खरोखर अधिक जवळ आहे. हें समजण्याकरितां आह्मास इतकेंच मात्र स्मरण ठेविलें पाहिजे कीं पवित्रता हाच स्वर्ग व अपवित्रता हाच नरक आहे. स्वर्ग ह्मणजे साधूचे पुढील रहिवासस्थान व तेथें ते लोक आपल्या सद्गुणांच्या लाभाचा उपभोग पावतात असें सर्वांचें एकसारखें मत आहे परंतु सद्गुणांतच स्वर्ग आहे ही गोष्ट थोड्यांसच माहित आहे. जर कोणी मनुष्य चांगला व धार्मिक आहे तर तो पुढें स्वर्गवासी होईल अशी कल्पना आहे, परंतु जो चांगला व धार्मिक आहे तो एथेंच स्वर्गवासी आहे या सत्य गोष्टीची जितकी माहिती लोकांस असावी तितकी नाहीं. सर्व कबूल करतात कीं, धार्मिक वर्तणुकेचा परिणाम स्वर्ग आहे; परंतु तशा वर्तणुकेचें मूलस्थानच स्वर्ग आहे असें थोडेच मानितात. पवित्रतेचें फळ स्वर्ग असें मानण्यापेक्षां स्वर्ग हा पवित्रतेचें मूलस्थान आहे असें जर सर्व धर्माविषयीं विचार करणारे लोक मानितील तर त्यापासून मोठा फायदा होईल. चांगल्या किंवा वाईटाचा परिणाम पुढें दूरच्या स्वर्गांत किंवा नरकांत होईल असें मानण्यापेक्षां पवित्रता हाच स्वर्ग असें जर मनुष्यें मानतील तर तीं अधिक चांगलीं व पवित्र होतील. प्रत्येक खरा शब्द, निर्दोष विचार, पवित्र अभिप्राय, भक्ती व प्रेमाविषयीं मनाचा प्रत्येक उद्गार आणि प्रत्येक धार्मिक कर्म हीं स्वर्ग एथेंच आहे असें दाखवितात असें आह्मी जर जाणूं तरच आह्मांस सत्य पवित्रता साध्य करण्याविषयीं सबळ इच्छा होईल. तसेंच दुष्टपणास पुढें नरकगती आहे असें मानण्यापेक्षां जर आपण आपल्या मनास असा बोध केला कीं, पातक हाच नरक आहे; व दुष्ट विचार, दुष्ट शब्द आणि दुष्ट कर्म हीं ओंगळ व निंद्य असून अंधकार व मृत्युसमान आहेत तर आपण दुष्टपणाचा अधिक उत्सुकतेनें त्याग करण्यास झटूं. जे पुरुष नरका प्रमाणेंच अति क्षुद्र पातकाची भीति बाळगून तिरस्कार मानितात ते धन्य आहेत.

सु. प.

---

## नोटिस

दत्तू हवाल माळी सवकार रहाणार मौजे डोंगरगाव तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी चवघा पंचासमक्ष मजला आमचे कर्जांत एक बैल एक गोऱ्हा व एक शेत देऊ केलें व तुह्मी बायको मेली ह्मणून तूं कागद वगैरे करून आमचे ताब्यांत दिले नाहीं ते आठ च्यार दिवसांनीं करून देतों असें बोलला त्या गोष्टीस आज दीडमहिना झाला तरी सदर्हू जिनसा अजून माझे ताब्यांत दिल्या नाहींत ह्मणून आह्मी तुह्मांवर फिर्याद केली आहे हल्लीं असें समजतें कीं, आह्मांस दिलेला माल तुह्मी रा. इयाबु वलद लखाजी देशमुख यास लिहून देणार आहा परंतु अशानें त्या मालावरचा हक्क आमचा रद्द होईल असें तुह्मी बिलकून समजूं नका. सदर्हू माल तुह्मी पंचासमक्ष दिला आहे तो आमचा आहे. कळावें तारीख १९ माहे सपटंबर सन १८७७ इसवी.

याच नोटिसीनें रा. रा इयाबु वलद लखाजी देशमुख यांस व सर्वांस या नोटिसीनें जाहिर करण्यांत येतें कीं, सदरी लिहिलेला माल आह्मांस दिलेला आहे सबब तो कोणी ठेऊं नये कळावें. तारीख मजकूर.

( सही ) उदेभान वलद सुरेभानजी
देशमुख रहाणार मौजे डोंगरगाव
निशाणी खुद हातची.

---

## नोटिस.

राजश्री जयसिंगदास हंसराज वाहिवाटदार नथमलुकजी दुकान खामगाव यांस खालीं सही करणार याजकडून-नोटिस देण्यांत येते कीं तुमचे आमचे शराकतींत दुकाना आहेत त्या पिंपळगावची दुकान देवकर्ण मुलतानचंद या नावची व दुसरी दादलगाव तालुके जळगाव एथील दुकान सिवरतन शंकरदास या नावची अशा सदर्हू दोन्ही दुकाना तुमचे आमचे शराकतीच्या असून आमचे पश्चात आह्मास न पुसतां आमचा अज्ञान मुलगा बजरंगलाल यास तुह्मी फुसलावून त्याजपासून फारकती करून घेतल्याचें कळतें. ती फारकती कोणत्याही प्रकारें आह्मास मान्य नसून कबूल नाहीं कारण अज्ञान आमचा सदरील लिहिलेला मुलगा अल्पवयी याचें पालन करण्याचा व तसेंच दुकान शराकती संबंधीं नफा अगर नुकसान करणें व देवघेव करणें हा सर्व अधिकार आमचा आहे याजकरितां या नोटिसीनें तुह्मास असें कळविण्यांत येतें कीं सदर्हू दोन्ही दुकाना आमचे शराकतीच्या आहेत त्याचा हिशेब आजतारखेपासून १९ दिवसांचे आंत आह्मापाशीं येऊन करून द्यावा आणि दुकानची वाटणी करून द्यावी असें न केल्यास तुह्मावर फिर्याद करून कोर्टखर्चासुद्धांव या नोटिसीचे खर्चासहीत भरून घेण्याविषयीं तजवीज केली जाईल. कळावें ता० २० सप्तंबर सन १८७७ इसवी.

( सही ) रूपा जवजे मुलतानचंद मा
रवाडी दस्तुर गोकुलचं-
द बाई तर्फे

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला, रविवार ता० ३० माहे सप्तंबर सन १८७७ इ० अंक ३९

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| **डांकहाशील** | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

---

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

---

## जाहिराती.

फार उपयोगी व फारच स्वस्त ग्रंथ.
सोमवार तारीख १५ आक्टोबर १८७७ रोजीं विक्रीस तयार होईल.

### नवीन मराठी सिव्हिल प्रोसीजर कोड,

(ह्मणजे सन १८७७ चा आक्ट १० वा.)

विशेष समजूतीच्या खुलासेवार टिपा व इंडेक्स सुद्धा.

सदरील कायद्याचें भाषांतर नुकेंच प्रसिद्ध झालें आहे. हें भाषांतर प्रसिद्ध होण्यास इतकी दीनावधी लागली व तो लवकरच अमलांत येणार आहे. तरी हरतऱ्हेचे परिश्रम करून, हा कायदा अमलांत येण्याचे वेळेवर लोकांस उपलब्ध व्हावा अशी तजवीज केली आहे. या कायद्यांतील प्रत्येक अवघड कलमावर खुलासेवार मजकूर लक्षांत येण्यसारख्या समजुतीच्या टीपा, तसेंच पूर्वीच्या कलमांवर हावाले वगैरे दिले आहेत. ग्रंथ समजुतीस व चालनास सुलभ व्हावा यासाठीं प्रथम, कलमांचे विल्हेवार विवेचन केलें आहे. तसेंच हा कायदा पसार करण्याची कारणें, व त्याचे हेतु हे प्रथम थोडक्यांत दाखविले आहेत. एकंदरींत हा ग्रंथ जितका सुलभ व सोईचा होईल तितका केला आहे.

उत्तम टाईपानें व जाड कागदावर हा ग्रंथ ता० १५ आक्टोबर रोजीं छापून तयार होईल. राहिलेला आल्प काळ तसेच ह्या कामास लागणारी मेहनत यांचे मानानें याची किंमत थोडी ह्मणजे ता० १ आक्टोबरपर्यंत पैसे भरणारांस १ रु० व मागाहून घेणारांस २॥ रुपये ठेविली आहे. याच पुस्तकांत सन १८७७ चा १ ला विशेष न्यायाचा कायदा सामील केला आहे.

विशेष सूचना.—ह्या ग्रंथाच्या प्रती आह्मी थोड्या काढणार आहों ह्या अर्थी मागाहून लोकांस अडचण न पडावी या करितां लोकांनीं पैसे भरण्याची त्वरा करावी. पैसे भरणें ते ज्ञानचक्षूचे मालक भाऊ गोविंद सापकर यांजकडे अगर किरण छापखान्याचे मालक महादेव बल्लाळ नामजोशी, अथवा मुंबईत पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी, यांजकडे किंवा आह्माकडे पाठवावे. तिकिटें पाठविणें झाल्यास वर्ताळ्यासकट पाठवावीं. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. व पैसे आल्याखेरीज पुस्तकही रवाना होणार नाहीं. कळावे ता. १२ सप्तंबर सन १८७७ इसवी.

नारायण बापूजी कानिटकर,
वकील डि. को. पुणें.

---

## जाहिरात.

### प्रश्नसमुदाय पृथःकरण.

विक्रीस तयार.

या पुस्तकाची चौथी आवृत्ति छापून तयार झाली आहे. यांत केरोकृत अंकगणितांतील शेवटील प्रश्नसमुदायाचें पृथःकरण असून आणखी बिमाकमीशन, ठेव, क्षेत्रफळ, घनफळ यांचेंही पृथःकरण करून यास जोडिलें आहे. किंमत आक्टोबर अखेर घेणारास ६ आणे पडेल; आणि पुढें घेणारांस ८ आणे पडतील. टपालांतून मागविणारास १ आणा बंगीखर्च पडेल. पुस्तकें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत अथवा खालील पत्त्यावर मिळतील. रुपयाच्या तिकिटास वर्ताळा पडेल. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.
तारीख १८ माहे सेपटेंबर.
सन १८७७ इसवी.

नारो रघुनाथ गोहोळकर
मास्तर ट्रेनिंग कॉलेज मराठी
भाग अकोला प्रांतवऱ्हाड.

---

## सन १८७८ सालाकरितां रोजनिशी.

सन १८७८ सालाकरितां रोजनिशीचा सांचा पूर्वी पेक्षां सवाईनें जास्त वाढविला असून बरीच जास्त सुधारणा केली आहे. हें पुस्तक येते नोवेंबरच्या २५ वे तारखेस छापून तयार होईल. यांत सरसालचे दीनचर्ये संबंधी मराठी तिथी, वार, महिने व इंग्रजी तारखा, महिने, सूर्योदय, सूर्यास्त वगैरेची माहिती दिली जाईल; शिवाय सरसालांत येणारे विशेष उपवास, ग्रहणें, सण व त्या संबंधे सरकारी हपिसांस असणाऱ्या सुट्या वगैरेचीही माहिती दिली जाईल. हिंदु शास्त्राप्रमाणें मौंजी, विवाहाचे मुहूर्त, तसेच मुसलमानी महिने, तारखा, सण इत्यादिकांचा समावेशही या पुस्तकांत होईल. रेल्वे, तारायंत्र, स्टांप, मनीआरडर्स, पोस्ट, इत्यादि अनेक नेहमीं जरूर लागणारे उपयुक्त विषयांची अवश्य तितकी माहिती दिली जाईल. २० रुपये पर्यंत दरमहा रोजमुरा चुकविण्याविषयीं माहिती मिळेल. स्मरणार्थ टिपणें करण्यांत समय विशेषीं जास्त मजकूर लिहिण्याची पाळी आली तर तो लिहिण्याकरितां पुस्तकाच्या अखेरीस कोरीं पृष्टेंही बरींच जोडलीं जातील.

या खेपेस अशी एक विशेष सुधारणा करण्यांत आली आहे कीं, इंग्रजींतही महिना, तारीख, वार दिला असून महिन्याची प्रत्येक तारीख, वार, तीथ वगैरे संक्षेपानें न देतां पूर्णपणें लिहिलीं आहेत व रवि उदयअस्ताचें कोष्टक तारीखवार निराळेंच दिलें आहे. इंग्रजी महिना, तारीख निराळी इंग्रजींतच घातल्यामुळें ज्यांस मराठी समजत नाहीं अशा गृहस्थांसही या रोजनिशीचा बराच उपयोग होणार आहे; व प्रत्येक तारीख महिना संक्षिप्त अक्षरानीं लिहिल्यामुळें त्याची बराबर समजूत होत नाहीं अशी जी तक्रार होती तीही या व्यवस्थेपासूम दूर होणार आहे. सन १८७९ सालचे महिनेवार तारखांचे एकंदर कोष्टक इंग्रजींत व मराठींत रंगीबेरंगी तयार करून जोडलें जाईल. हरएक प्रकारची होईल तितकी जास्त सुधारणा करण्यांत येईल.

याची किंमत अक्टोबर अखेरपर्यंत अगाऊ भरणारांस दर प्रतीस दहा आणे पडेल व डांक हाशिलाबद्दल दर प्रतीस किंमती खेरीज १ आणा जास्त पाठवावा लागेल. एकदम १० प्रती घेणारांस डांक हशील पडणार नाहीं.

भाऊ गोविंद सापकर
ज्ञानचक्षूचे मालक

---

## मनोरमा नाटक.

आह्मी पूर्वीं जाहिरात दिल्याप्रमाणें हें पुस्तक ठसे छापावर छापून तयार आहे. ह्या पुस्तकाचा सांचा पाकीट डिकसनरी सारखा आहे. त्याची किंमत १॥ रुपया व बंगीखर्च २ आणे एकंदर १॥= एक रुपया दहा आणे आह्माकडे पाठविले असतां पुस्तक रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर,
ज्ञानचक्षूचे मालक

---

## नवा दिवाणी कायदा.

अरुणोदयांत छापत असलेला नवा दिवाणी कायदा विक्रीस तयार झाला. वर्गणीदारांकडे बुकें तारीख २५ रोजीं रवाना झालीं. यांत १८७७ चे पहिला, तिसरा, व दहावा, हे तीन आक्ट दाखल केले असून हीं बुकें घेणारांस याच किमतींत १८७७ चा अक्ट १५ (मुदतीचा) मागाहून दिला जाईल. मात्र त्याबद्दल टपाल व बंगीखर्च निराळा पडेल.

ज्यांणीं सद्या मात्र दिल्या आहेत त्यांणीं दर प्रतीस किमतीबद्दल रु० ४ व टपाल बंगीखर्च आठ आणे व नवीन घेणारांही दर प्रतीस टपाल व बंगीखर्च मिळून रु० पांच म्यानेजर अरुणोदय यांजकडे पाठवावे ह्मणजे बुकें तावडतोब रवाना केलीं जातील.

म्यानेजर अरुणोदय.

---

## नोटिस

हनवती वल्लद बापुजी पाटील राहणार ताजनापुर तालुके अकोट यास खालीं सही करणार याजकडून नोटिसीचा जबाब देण्यांत येतो कीं तुह्मी तारीख ११ माहे सप्तंबर सन १८७७ इसवीची नोटिस वऱ्हाडसमाचार छापखान्यांत प्रसिध्ध करून एक अंक आह्माकडे पाठविला तो पावला त्याचें उतर:—

आह्मी दोघे व बिर्दीचंद व व्यंकटी कवठेकर असे चौघाचे नावे तुह्मी कतवाडी येथिल शेत १० वर्ष वहितीस दिलें व ४६८ रुपयापैकीं १६८ रुपये नगदी देण्याचा चौघानीं करार केला. बिर्दीचंदयानीं दस्तऐवजावरील हक्क सोडला हें तुह्मी नोटिसींत लिहिल्यावरून कळलें बरील शेतापैकीं दोन हिश्याचे शेत निर्दीचंद व आह्मास दिले आमचे पातीप्रमाणें आह्मास कबूल आहे. १६८ रुपयाचे मानानें आमचे दोन हिस्याचे रुपये ७४०१००१ तुह्मास देणें व दस्तैवज रजिस्टर झाल्याबर तुह्मास आह्मी १२ रुपये वसूल दिला. त्यास तुह्मी कबुलच आहात आता बाकी रुपये ६२-०१०-०१ तुह्मास देत असतां तुह्मी ते वेळीं ह्मणाले मग घेईल असे बोलून आजपर्यंत रुपये घेण्यास आले नाहीं व एकदोन वेळेस रुपये नेण्याचे तुह्मास ह्मटलें तरी तुह्मी नेले नाहींत. व्यर्थ नोटिस पाठविली.

तुह्मी जो चौघाचे नावे १० वर्षाचे कराराची शेतें वाहितीचा पट्टा लिहून दिला आहे तो आमचे हिस्याप्रमाणें आह्मास कबूल आहे व तो तुमचे ह्मणण्यानें रद्द होत नाहीं व दस्तैवजापासून आह्मास हसील आहेच हा जबाब तुह्मास पावल्यापासून दोन दिवसांचे आंत तुह्मी रुपये घेऊन जावेत तुह्मी आजपर्यंत रुपये न नेल्याची जबाबदारी आमचेवर नाहीं.

सन १२८७ पासून शेत तुह्मी आह्मास वाहितीस दिलें असून शेत आमचे ताब्यांत दिल्यामुळें हल्लींचे पिकाचे नुकसानीबद्दल हा जबाब पाठविल्याचे खर्चासहीत रुपये घेण्याची तुह्मावर नालिश करीत आहोत कळावे. तारीख २१ माहे सपटेंबर सन १८७७ इसवी.

( सही ) मेघराज किसनलाल मारवाडी
दुकान अकोट यांची ( मारवाडी.)
( सही ) रामजीवन श्रीराम मारवाडी
अकोट यांची ( मारवाडी. )

### नोटिस.

भगवानसा रंगारी मामडे कसबे पातुर्डे तालुके नळगाव यास नोटिस देणार देवीदास कन्हयालाल पातुर्डेकर नोटिस देण्याचें कारण कीं, बाळासा तुकारामसा रंगारी मामडे याहाची जागा आह्मी रुपये ३० तिसास खरिदी घेतली आहे त्या जागेंत मागें तुह्मी दक्षिणेस घर लांबविलें आहे आणि कांहीं कूड भरला आहे त्यास तें घर आणि तो कूड आठ दिवसांत काढून घेऊन जागा मोकळी करावी. नाहीं तर तुमचेवर शिरस्त्याप्रमाणें फिर्याद केली जाईल व त्याचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें. तारीख २९ माहे सेप्तेंबर सन १८७७ इसवी.

( सही ) देवीदास कन्हयालाल पातुर्डेकर दस्तुर खुद.

---

### नोटिस,

इसराम वलद हंजाजी उमाळे माळी वस्ती शेखबाबुचें पातुर यास सेंगी मर्द इसराम वस्ती खानापुर इजकडून नोटिस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून मजला नऊ वर्षें झालीं माझी अन्न वस्त्राची खबर तुह्मी घेत नाहीं. पंचानीं मला दोनवेळा तुमचे घरीं अणून घातलें असतां तुह्मी वागविलें नसून काढून दिले आणि पंचानीं तुमची पुरुषत्वाची परिक्षा करविल्यांत तुह्मी पुरुषत्वांत नाहीं असें पातुर मुक्कामीं ठरलें. आतां या नोटिसीनें कळविते कीं, मला तुह्मी फारकत द्यावी व मागील खावटीबद्दल तुमचेवर अलीकडील तीन सालाबद्दल दिवर्णींत फिर्याद करून खर्चासुद्धां रुपये द्यावे लागतील या नोटिसीचे उत्तर १५ दिवसाचे आंत द्यावें नाहींपेक्षां कायदेशीर रीतीनें मी आपला घरठाव करीन हेंही कळविते कळावें तारीख १० सप्तंबर सन १८७७ इसवी.

( सही करणार सेंगीचा बाप) सिदाजी वलद नागुजी वस्ती खानापुर दस्तुर खुद.

---

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

मौजे मोप प्रगणें रिसवड तालुके वाशीम एथून वि. वि.

सोलापुर पंढरपुर वगैरे लगतात गुदस्त सालीं तर पर्जन्य बिलकूल झाला नाहीं व एंदाही अजून व्हावा तसा झाला नाहीं यामुळें तिकडील पुष्कळ लोक अन्न अन्न करीत या देशांत येत आहेत त्या पैकीं किती एकांचे तर तोंडाकडेही पहावत नाहीं. फक्त त्यांच्या शरिरांत अस्ती आणि चर्म मात्र राहून डोळ्यांत प्राण राहिलेले आहेत व किती एकास तर जागचे हालण्यास देखील शक्ती नाहीं. अशा लोकांस या प्रांतींही अद्याप व्हावी तशी मदत होत नाहीं असें जाणून व त्यांचा कळवळा मनांत आणून मे. बाकरअली तहशिलदार तालुके वाशीम यांणीं मेहेनत घेऊन ठिकठिकाणीं सभा भरवन व्यवस्था केली आहे.

मौजे मोप तालुके वाशीम हा गाव रस्त्यावरचा आहे व येथें दुष्काळग्रस्त लोक नेहमीं येतात असें जाणून एथें तारीख ७ माहे मजकूर रोजीं येऊन सरकारी मराठी शाळेंत सभा भरविली होती व सर्व सभासदांस सभा भरविण्याचें कारण कळविलें त्यावरून लागलीच वर्गणीची यादी झाली त्यांत ९२॥ रुपये व दाणे गहू जवारी मिळून तीन मण साडे पांच पायली जमली व ती लागलीच वसूलही झाली. त्याची व्यवस्था असी केली आहे कीं जे दुष्काळ पीडित लोक दररोज येतील त्यांस दर असामीस दररोज आतशेर पीठ आतपाव डाळ मीठ मिरची असे देत जावें.

येणेंप्रमाणें क्रम तारीख ८ माहे सेप्टेंबर सन १८७७ इसवीपासून सुरू झाला. मोप हा गाव फारच लहान असल्याकारणानें एथें इतकी वर्गणी जमा होईल असा बिलकूल भरवसा नव्हता; परंतु हें सर्व तहशिलदार यांचें मेहेनतीचें फळ आहे. याप्रमाणेंच रिसवडासही सुमार तीनशें रुपये वर्गणी जमा करून असा क्रम चालू केला आहे. याशिवाय वाशिम तालुक्यांत सर्व खेडें पाडें गावीं कोणी दुष्काळपीडित मनुष्य आला त्यास पाटील याणें आपले गावकऱ्यांचे मदतीनें खाण्यास देत जावें अशी व्यवस्था तहशिलार करणार आहेत. असें ऐकतों. कळावें तारीख २९ माहे सप्तंबर सन १८७७ इसवी.

एक
क्ष

---

## वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद वद्य ८ शके १७९९

---

## एकविसांव शतकांतील अजा नातवाचा संवाद.

कलकत्त्याकडे अमृतबाजार पत्रिका या नावाचें एक वर्तमानपत्र छापत असतें त्याच्या निस्पृहीपणाची कमाल आहे त्यानें २ आठवड्यापूर्वीं एक मजकूर लिहिला आहे त्याला असें सदर दिलें आहे कीं, 'हिदुस्थानांतून इंग्लिश लोकांनीं आपलें राज्य कसें गमावलें व या गोष्टीस आजा व नातु यांच्या संवादाचें रूप देऊन २१ वे शतकांतलें ह्मणजे आजपासून सुमारें सवाशें वर्षां नंतरचें हें भाषण आहे असें दाखविलें आहे. नातवाचे प्रश्न आहेत कीं एवढे प्रबळ इंग्लिश लोक असतां त्यांचें हिंदुस्थानांतून समूळ राज्य जाण्याचें कारण काय झालें ? त्यांनीं इकडील लोकांस विद्या शिकवून शहाणे केल्यानें त्यांच्या राज्यास अपाय झाला कीं काय? हिंदु, मुसलमान वगैरे सर्व लोकांचें ऐक्य होऊन त्यांनीं इंग्लिशांस मुलखांतून काढून दिलें कीं काय ? इंग्लिश राज्य आपणास नको आहे अशी साऱ्या २५ कोटि प्रजेची इच्छा झाली कीं काय? व त्यांनीं इंग्लिश लोकांचा जो अल्प समुदाय देशांत होता त्यास वाटेस लाविलें कीं काय ? किंवा इंग्लिश लोकांच्या विलायतेस त्यांस कोणी प्रबल शत्रू उत्पन्न झाला व त्याचे निवारणार्थ त्यांनीं इकडील सर्व लोक तिकडे नेले ? याचीं उत्तरें देतांनां आजोबांनीं सांगितलें कीं लोकांनां विद्या शिकविल्यानें इंग्लिश राज्यास आपले लोक शत्रू झाले नाहींत. उलटे पुस्तकें वाचतां वाचतां दुर्बळ होऊन रोगी व घरांतले किडे असे सर्व लोक झाले व इंग्लिश लोकांचें राज्यकौशल्य इतकें उत्तम आहे कीं पराक्रमानें त्यांस कोणीं हिंदुस्थानांतून काढून देईल असें सहसा घडणार नाहीं. व आपले देशचे लोकांत एकी होऊन सर्व प्रजा राज्य संबंधी गोष्टीचा विचार करील असेंही कधीं घडणार नाहीं. व या करितांच त्यांची संख्या आपले देशांत थोडी आहे तरी तिला कांहीं भय नाहीं. विलायतेसही त्यांचें राज्य समुद्रांतील एका बेटांत आहे व चोहोकडून त्यांचा बंदोबस्त उत्तम आहे ह्मणून परचक्राचें त्यांस भय व हिंदुस्थानांतील फौजा तिकडे नेण्याचें कारणच नाहीं.

पुन्हा नातवानें विच्यारिलें तेव्हां आजोबा ह्मणाले कीं. इंग्लिश राज्यास खर्च फार लागे. त्यांतील कामदारांस पगार फार मोठे असत. मोठाले जागेवरून सर्व इंग्लिश लोक असत ते बहुत पैसा स्वदेशीं नये. इंग्लिश लोकांनीं हिंदुस्थानचा व्यापार व कलाकौशल्य वाढविण्याकडे चांगलें लक्ष्य न दिल्यामुळें तें सर्व बुडालें व सर्वांची उपजीविका जमीनींत जें पिकेल तेवढ्यावर येऊन राहिली व जमीनीवर ही जबरदस्त कर बसले तेणेंकरून लोकांची हालचाल बंद होऊन देश निवळ दरिद्री झाला.

यावर नातवानें विच्यारिलें कीं, इतक्या थरावर गोष्ट आली तेव्हां शहाण्या इंग्लिश सरकारानें आपले खर्च कां कमी केले नाहींत? तेव्हां आजोबा ह्मणाले.

इंग्लिशांच्यानें तें होणें नाहीं. पब्लिक वर्क्स खात्यांत खर्च कमी करावयाचें मनांत आणिलें तर या खात्याचे मुख्याधिकारी हकाटी करणार. दिवाणी खात्याकडे नजर टाकली तर त्याचे मुख्य तक्रारी काढणार. हिंदुस्थान देशांत उद्योग वाढवू ह्मटलें तर इंग्लंडांतील व्यापारी कावकाव करणार. त्यामुळें सरकारास कांहीं सुचेना. व असाच गाडा चालतां चालतां असें होऊं लागलें कीं, एकादे सालीं एकादे ठिकाणीं थोडा पाऊस नाहीं पडला कीं साऱ्या मुलखांत दुष्काळ व सरकारचा खर्च जबरदस्त त्यामुळें हमेशा लोकांवर कर बसूं लागल्यानें साऱ्या हिंदुस्थानांत दुष्काळ माजले तेणेंकरून हजारों लोक जागच्या जागीं मरण पावले, गावचे गाव बेचिराक झाले व प्रांताचे प्रांत ओसाड पडून त्यांत जंगल वाढले. तेव्हां हिंदुस्थानांत कांहीं पिकाऊ जमीन राहिली नाहीं, वसाहती राहिल्या नाहींत व मनुष्यें राहिलीं नाहींत तेव्हां राज्य करण्यास हें स्थळ चांगलें नाहीं ह्मणून इंग्लिश लोक हा देश सोडून विलायतेस गेले.

हे भविष्यपुराण सांगण्याचे असले काल्पनिक लेख काय कामाचे ? आह्मास हे समजत नाहींत. अनंत दुष्काळ पडले, व देशाची कशीही निकृष्ठ स्थिति झाली तरी ती सुधारण्यास इंग्लिश सरकारच समर्थ आहेत. सबब त्यांनीं निराश होऊन राज्य सोडून जावें अशा पल्यावर गोष्ट सवाशें वर्षांतच काय पण सवा हजार वर्षांतही येणार नाहीं. तें कसेंही असो. आमचें मत इतकेंच आहे कीं त्यांत एकंदर ब्रिटिश राज्यसंबंधानें ज्या सूचना आहेत त्यांतील कित्येक चांगल्या आहेत पण त्या अशा पांचापेचानें न लिहितां खुलेपणानें लिहिल्या असत्या तर फार चांगलें झालें असतें.

---

**विलायती नांगर**— स्वीडन देशांत शेतकीचे कामाला ज्या प्रकारचे नांगर आहेत तसे नांगर विलायतेहून मद्रास इलाख्यांत सिदापेठ येथें सरकारी खर्चानें शेतकीचें कालेज केलें आहे तेथें आणिले आहेत. व त्यावरील सुपरइंटेंडेंट मि० राबर्टसन साहेब यांनीं त्या नांगराविषयीं रिपोर्ट केला आहे त्यांतील तात्पर्य असेः—

या इलाख्यांत जमीनीचे कित्येक प्रकार आहेत त्यांतील बहुतेकांत हे नांगर चांगले उपयोगी पडण्याजोगे आहेत. या नांगरास एक चाक जोडलें तर याच्यामध्यें अधिक गुण येतील. व आतां नांगर आणावयाचे ते स्वीडन देशांतून आणवितांनां त्यांस एकेक जोड जोडून पाठवावें असें लिहिल्यास ते तसे तयार होऊन येतील. व एथें चाकें जोडण्यास जो खर्च लागणार त्यापेक्षां तिकडून जोडवून आणण्यास खर्च कमी लागेल. सिदापेठ एथें ज्या प्रकारच्या जमीनी नांगरल्या त्या त्या फार सक्त नव्हत्या ह्मणून सामान्य प्रकारचे नांगर तेथें कामास आले पण सक्त जमीनीला अधिक मजबूद नांगर पाहिजे आहेत असें मि० राबर्टसन साहेबाचें मत आहे. उष्णकाळांत मजबुद व जड नांगर फार उपयोगी पडतो व त्या वेळीं हलका नांगर बहुधा निरर्थक होतो. व सदरीं सांगितल्या प्रकारचे चांगले सुधारून तयार केलेले नांगर मद्रासेस प्रत्येकी बीस रुपये किमतीस येऊन पडतील असें सुप्रिटेंडेंट साहेबांचें मत आहे. व सरकारानें कांहीं नांगर विक्रीकरितां व कृषि कर्माचे प्रदर्शनांत बक्षिसाकरितां ह्मणून अवश्य आणवावे अशी ही त्यांनीं शिफारस केली आहे.

---

**दिवाणी नवीन आक्ट**— याच्या मराठी भाषांतराची बुकें च्यार ठिकाणीं छापत आहेत परंतु तीं या महिना अखेर त

यार होत नाहींत असें आह्मी मागील पत्रीं लिहिलें होतें त्यावरून ठाण्याचे अरुणोदयाचे म्यानेजर यांनीं आह्मांस कळविलें आहे कीं" त्यांच्या छापखान्यांतील बुकें तयार होऊन २६ वे तारखेस जिकडील तिकडे सर्व रवाना झालीं" या त्यांच्यात्वरेबद्दल आह्मी त्यांची तारीफ करितों.

## वऱ्हाड.

मे. जान्स साहेब कमिशनर एक्षा आठवड्यांत फिरावयास निघणार. ते प्रथम इकडून किंवा परभौर कारंजाकडून वाशिमास जाणार असें वर्तमान आहे.

मे० जुडिशियल कमिशनर साहेब बहादूर यांची स्वारी काल रोजीं बुलडाण्याकडे सेशनाकरितां गेली आहे व त्यांच्या बरोबर डिपुटी क्लार्क रा. रा. वासुदेवराव सदाशिव पिसोळकर हेही गेले आहेत.

मे. एदलजी साहेब एथील अस्याची एक महिन्याची हक्काची रजा घेऊन हैदराबादेकडे गेले आहेत.

वाशिमचे डिपुटी क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. श्रीनिवासराव यांनीं पेनशन घेतलें त्यांचे ८० रुपयांचे जागेवर मि. बेदरोद्दीन नाजर यांस नेमिलें व त्यांची ६५ ची जागा एथील असिस्टंट कमिशनरचे शिरस्तेदार मि. सेख कासम यास मिळणार व त्यांची ३५ ची जागा रा. रा. विठोबा नारायण यांस मिळणार असें समजतें.

पर्जन्य पडत नाहीं. ५१६ दिवसांमागें एक दोन दिवस अल्प स्वल्प पाऊस पडला पण तेवढ्यानें भागत नाहीं. एक तरी चांगला पाऊस जरूर पाहिजे. उष्णता मे महिन्याप्रमाणें होऊं लागली आहे.

पिंजरच्या रस्त्यावर एका टोपलीमध्ये गवत हातरून त्याजवर निजविलेलें व वर पांघरूण घालून कोणी बिच्यारीनें सोडून दिलेलें एक वर्षाच्या उमरीचें एक मूल जिवंत सांपडलें आहे. त्याची नीट व्यवस्था राखण्याकरितां डिपुटी कमिशनर साहेबांनीं तें मूल आर्डेसर दिनसाजी तहशिलदार यांच्या स्वाधीन केलें. त्यांनीं लोकांस खबर देतांच ३।४ मनुष्यें मूल मागण्यास आलीं पण त्यांतून चा[illegible]गानें त्यांनीं एका आस्थेवाईक कानस्टेबलाच्या स्वाधीन त्यास केलें त्याची बायको १६ दिवसांची बाळंत असून तिची मुलगी हा मुलगा तिला मिळण्यापूर्वी दोनच दिवस वारली होती त्यामुळे ती या मुलाचें चांगलें जतन करील व त्या मुलाला आंगावरचें दूध चांगलें मिळेल हे पाहून आह्मांस संतोष वाटतो.

रा. रा. श्रीधरपंत आपटे नगरास जातांना एक दिवस एथेंही आले होते व तेवढ्यांत तीन चार स्नेही मंडळीकडून त्यांस मेजवान्या झाल्या. यांची लोकहितार्थ झटण्याची दक्षता, सुस्वभाव व स्नेहाविषयींचे अगत्य वर्णनीय आहे. हे मागें नगरास होते व आतां हुद्याच्या जागेवर तिकडे आपले मित्र मंडळींत पुन्हा गेले आहेत तर तेथेंही लोकांच्या आणि सरकारच्या ते विशेष उपयोगी पडून कीर्तिमान होवोत व त्यांस वारंवार उत्तम मिळो असें आह्मी इच्छितों.

रा. रा. गोपाळराव महादेव भिडे एथील स्माल काज कोर्टाचे क्लार्क आफ धि कोर्ट हे एक महिन्याची हक्काची रजा घेऊन काल रोजीं पुण्यास निघून गेले.

जुडिशियल कमिशनर साहेबांपुढें बारशी टाकळी एथील भग्या नावाच्या खुनी कैदीची चवकशी होऊन त्याला जन्मपर्यंत काळे पाण्याची शिक्षा झाली.

जळगाव तालुक्यांतील डाक्याच्या मुकदम्याची मे. डेपुटी कमिशनर साहेबांपुढें चवकशी होऊन २१ कैदी सेशन कमीट झाले.

अकोला हायस्कुलांतून सात विद्यार्थी म्याट्रिक्युलेशनचे इंग्लिश विषयाचे परीक्षेकरितां बुधवारी एथून मुंबईस गेले.

मंगरूळचे तहशिलदार मि. खाबास खान यांनां सेकंड क्लास माजिस्ट्रेटचा अधिकार मिळाला. उ. अ.

इलिचपुर— मेले आठवड्यांत पर्जन्य मुळींच पडला नाहीं आतां एक पर्जन्य जरूर पाहिजे आहे लवकरच पडेल तर बरें आहे उष्णता अलीकडे फारच भासूं लागली आहे बाजारभाव पुन्हा पूर्वपदावर येत चालले असून रोगराई ह्मणण्यासारखी नाहीं.

मे. मेकंजी साहेब डे. क. यांची स्वारी चिखलदऱ्यास गेली आहे.

इलिचपुरास असलेली सांगलीकर नाटकक्कार मंडळी थोडेच दिवसांनीं उमरावतीस जाणार आहे. व. मि.

उमरावती—उष्णकाळाप्रमाणें कडक उष्णता आहे बऱ्याच दिवसांत पर्जन्य न झाल्यामुळें आतां त्याची लवकर गरज आहे. चढलेले धान्याचे भाव फारसे उतरत नाहींत रोगराई विशेष नाहीं.

भत्ता—पब्लिकवर्क्स खात्यांत कायमचे अगर हंगामी हेडक्वार्टरपासून दररोज पांच मैलावर दवऱ्यावर गेल्यास दररोज भत्ता मिळण्याबद्दल नवीन नियम झाले आहेत ते येणेंप्रमाणें:— चिफइंजिनियर ९ रु. ६ आ. ए. इंजिनियर ७ रु. १३ आ. आ. इंजिनियर ६ रु. ४ आ. सबइंजिनियर ५ रु. सुपरवाझर ३ रु. १२ आणे आणि ओव्हरसियर ३ रु. २ आणे.

रा. रा. श्रीधर बाळकृष्ण आपटे यांची अहमनगर येथें ए. इंजिनियर आफिसांत अकौंटेंटचे जागीं नेमणूक झाल्याप्रमाणें ते कालरोजीं इकडून तिकडे जाण्यास्तव निघाले. हे येथें फार लोकप्रिय असल्यामुळें यांनां मित्रमंडळींत बऱ्याच मेजवान्या झाल्या. परवारोजीं येथील लायब्ररींत सभा होऊन पानसुपारी झाली. काल सकाळीं हैस्कूलचे कांहीं विद्यार्थ्यांनीं पानसुपारीचा समारंभ केला व स्टेशनावर यांना पोंचविण्यास बरीच मंडळी गेली होती. यांच्या बढतीनें मित्रमंडळीस आनंद तर झालाच पण वियोगामुळेंही मंडळीना वाईट वाटलें व सार्वजनिक कामीं मनःपूर्वक झटणाऱ्यांपैकीं एथील मंडळींतील एक गृहस्थ कमी झाले.

प्रश्न— नवीन दिवाणी काम करण्याचे कायद्याचें मराठी भाषांतर प्रसिद्ध झालें आहे व हा कायदा येत्या आक्टोबरचे पहिलें तारखेस चहूकडे अमलांत येणार आहे. याबद्दल इकडील वकिलांनीं आह्मास हा कायदा वऱ्हाडांत कधीं अमलांत येणार ह्मणून प्रश्न केला. परंतु नवीन रजिस्ट्रेशन व स्पेसीफीकरिलिफ आक्ट इकडे लागूं झाल्याचें रे. आ. त प्रसिद्ध झालें होतें त्याप्रमाणें हा कधीं लागूं होणार हें अजून प्रसिद्ध झालें नाहीं सबब व. नीं होग्य अधि. स विचारल्यास खुलासा होईल. प्र. सि.

## वर्तमानसार.

भुसावळ स्टेशन " जि. आय. पी. रेलवे स्टेशनांमध्यें भुसावळ हें स्टेशन सर्वांत मोठें आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. यास भुसावळ जंगशन ह्मणतात. मुंबई जबलपूर आणि मुंबई नागपूर या दोन मार्गांचें हें जबरदस्त नाकें आहे. नित्य रात्रीं ११।१२ वाजण्यापर्यंत मुंबई, नागपूर आणि जबलपूर येथील लोक येथें उतरून पडून पुनः प्रातःकाळीं ६।७ पावेतों आपआपल्या हेतु स्थळास जाण्याकरितां लगबगीनें जमत असल्यामुळें हें स्टेशन, मुंग्यांनीं भरलेल्या वारुळाप्रमाणें सभोंवार मनुष्यांनीं भरलेलें दिसत असून मोठ्या शहरांतल्या गजबजलेल्या मुंबई प्रमाणें गजबजलेलें दिसतें. येथें स्टेशन स्टाफ ह्मणजे स्टेशन संबंधीं हर कामकाजी नोकर व चाकर लोकांचा जमाव मोठा आहे. डेप्युटी ट्र्याफिक म्यानेजर साहेबांचें आफिस असोन मोठमोठाले हुद्देदार साहेब लोक पुष्कळ आहेत. लोकोमोटिव्हाचा कारखाना ह्मणजे बिघडलेली इंजिनें वगैरे दुरुस्त करण्याचा आणि नव्या गाड्या, डबे करण्याचा मोठाच कारखाना आहे. यत्संबंधीं नोकर, कारागीर, चाकर व मजूर मिळून २-३ हजार पर्यंत लोक आहेत. रेलवे म्याजिस्ट्रेट आणि पोलिस यांच्या कचेऱ्या एथें असून उत्तम बंदोबस्त आहे; ह्मणजे रेलवे संबंधीं एक मोठा विस्तृत बगीच्या असून पहाणारांस तत्क्षणीं गार करून आनंद देणारा असा आहे. यांतच एक जागीं साहेब लोकांस स्नान करून पोहण्याचें एक जलमंदीर आहे. बगीच्यांतून तसेंच रेलवेच्या हद्दींतील सर्व बंगल्यांतून प्रत्यक्ष तापी नदी लडिवाळपणानें जागजागीं खेळत आहे. हा गांव वंशपरंपरेनें जहागिरीचा असून याचे मालक कुलीन व प्रतिष्ठित मराठे कुळांतील निंबाळकर उपनांवाचे आहेत. मामलेदार कचेरी, मुनसिफकोर्ट पब्लिकवर्कसकडील असिस्टंट किंवा इंजिनियरचें आफिस, शाळा, पोस्ट ह्या सरकारी कचेऱ्या असून तत्संबंधाच्या इमारती आणि खानदेशच्या पूर्व भागांतील कैदी लोकांस ठेवण्याकरितां सरकारी मोठा तुरुंग बांधलेला आहे. थोडके वर्षांत खानदेशचें धुळें सदर स्टेशन मोडून हीच जिल्ह्याची मुख्य जागा होईलशी अफवा आहे. सारांश १६ वर्षांपूर्वीं जो हा भुसावळ गांव एका लहानशा खेड्यांत गणला जात असे तोच प्रस्तुतकाळीं शहराप्रमाणें आपला झोंक दाखवीत आहे. किरण.

सौरमानाच्या तिथि ह्मणजे ज्योतिषसंबंधी पर्वणी व इंग्रजी वर्षाच्या तारखा यांचा मेळ बहुतकरून बरोबर बसतो, तसा चांद्रमानावर चालणारीं जीं हिंदु व मुसलमान यांचीं वर्षे त्यांचा बसत नाहीं. शीत, उष्ण, व पर्जन्य या काळांचा व संक्रांतीचा मेळ इंग्रजी महिन्यांशीं बरोबर बसतो. मुसलमानांच्या महिन्यांची गोष्ट तशी नाहीं. त्यांची मोहरम मागें हटत हटत उन्हाळ्याची हिंवाळ्यांत व हिंवाळ्याची पावसाळ्यांत व पावसाळ्याची उन्हाळ्यांत येती. आह्मी फार लहान होतों तेव्हां तावूद उन्हाळ्यांत झाले होते. त्यावर ते मागें मागें हटून ३०।३२ वर्षांनीं पुनः उन्हाळ्यांत आले व हल्लीं हिंवाळ्यांत येतात. हिंदु लोक सुमारअडीच अडीच वर्षांनीं अधिक मास धरणार नाहींत तर त्यांच्याहि महिन्यांची गोष्ट अशीच होईल, त्यांचा शिमगा हिंवाळा व उन्हाळा यांच्या संधीवर येत असतो तो मागें हटत जाऊन कधीं हिंवाळ्यांत, कधीं पावसाळ्यांत, व कधीं उन्हाळ्यांत येईल; आणि दिपवाळी, गणेशचतुर्थी वगैरे सणांचीहि गति याचप्रमाणें होईल. पण इंग्रजी वर्षांची गोष्ट तशी नाहीं. दरसाल उत्तरायनाचा आरंभ ह्मणजे मकरसंक्रांत जानुएरीच्या १२व्या तारखेस किंवा एक दिवस मागें पुढें येती; दक्षिणायनारंभ ह्म० कर्कसंक्रांत जुलैच्या १३ किंवा १४व्या तारखेस येती; मृगनक्षत्र प्रवेशरूच्या २६व्या तारखेस अगर एक दिवस मागें लागतें.

आतां हें खरें कीं. सौरमानाशीं इंग्रजी वर्षाचा बरोबर मेळ बसावा ह्मणून त्यांतहि चार वर्षांनीं एक दिवस अधिक धरीत असतात, व शंभर वर्षांनीं तो दिवस सोडतात. पण असें करण्याचें मुख्य कारण हें कीं, दिनरजनीमान व वर्षमर्यादा ह्मणजे पृथ्वीची दैनंदिन गति व वार्षिक गति यांचा मेळ बरोबर नाहीं; ह्मणजे तिच्या आंसासभोंवतीं तिच्या ३६५ फेऱ्या होतात तेव्हां तिची सूर्यासभोंवतीची प्रदक्षिणा न आटोपतां, ३६५ एकचतुर्थांश फेऱ्या होतात तेव्हां आटोपती. आणि जरी युरोपियन लोकांनीं अधिक दिवस धरण्याची वगैरे तजवीज न केली, तरी सौरमानांत व त्यांच्यावर्षांत अंतर पडण्यास फारच काळ लागेल; ह्म० एक महिन्याचा फरक पडण्यास १६१ वर्षे ९ महिनें लागतील. आणि जानुएरीची १ली तारीख हिंवाळ्यांत येती ती पावसाळ्यांत येण्यास ४८७ वर्षे, व उन्हाळ्यांत येण्यास ९७४ वर्षे, व पुनः हिंवाळ्यांत येण्यास १४६१ वर्षे लागतील. ज्ञा. द.

सुरतेस तापी नदीवर सरकारानें पूल बांधिलो आहे व त्यावर दस्तुरी ठरविली आहे ती टाळण्याकरितां गरीब गुरीब लोक बोटींतून व केव्हां पोहून वगैरे जातात त्यांस तसें जाऊं न देतां कर देण्यास टाळाटाळ केली असे फौजदारी मुकद्दमे त्यांवर करोव व त्यानां पुलावरून रवाना करीत जावे अशी तजवीज चालू आहे.

सर रिचर्ड गार्थ बंगालल्या हायकोर्टाचे चीफ जस्टीस विलाय्तेस जाताहेत.

मि. हीनन एक तरुण इंजिनियर यानें साहेब जंग एथें एका नेटिवावर गोळी घातली तो अपराध त्यावर शाबीद होऊन त्याला १८ महिने कैदेची शिक्षा झाली.

आर. रघुनाराव होळकर सरकारचें दिवाण साहेब यांनीं राजिनामा दिला होता; परंतु सरकारची नाखुषी होतें असें जाणून त्यांनीं तो परत घेतला.

हिडेलबरीच्या युनिव्हर्सिटींत बी. ए. ची पदवी संपादन केलेला एक जर्मन गृहस्थ ग्याले येथें आहे त्यास दोहों हातांनीं व पायांनीं सारखें व चांगलें अक्षर काढतां येतें.

कलकत्त्याच्या पोलिस कोर्टांत एका कैद्यानें माजिस्ट्रेटाच्या अंगावर जोडा फेंकून मारला.

कलकत्त्याचे डाक्टर मेंझिज यांनीं आपल्या खिजमतगारास अब्रूबद्दलचा चांगला दाखला दिला नाहीं. या अपराधाची त्यांजवर शाबिदी होऊन माजिस्ट्रेटानें त्यांस ५० रुपये दंड केला व त्यांपैकीं २५ रुपये खिजमतगारास देवविले.

प्रवेश परीक्षा—येत्या म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेकरितां मुंबईस ६२१; पुण्यास १८१; अमदाबादेस १२७; नासिकास ३४; बेळगावास ७२; कराचीस १४, मिळून १०४७ विद्यार्थी व २ युरोपियन विद्यार्थिणी आहेत. इं. प्र.

मारिशसमध्यें हिंदुस्थानांतून मजूरदारांचे काम करण्याकरितां दीड लक्ष मनुष्य गेलें आहे.

नवीन नांगर.—मद्रासमध्यें सैदापेट येथील नमुन्याकरितां केलेल्या शेतांत स्वीडन देशांतील नांगराचा उपयोग करून पाहिला. त्याजवरून त्याप्रकारचा नांगर त्यांत थोडा फेरफार केला असतां फार उपयोगी पडेल असें ठरलें. मद्रासेस या नांगराची किंमत वीस रुपये पडतील असा अजमास आहे.

सिमल्यास सरकारी बंगला बांधण्यास खर्च करण्याची परवानगी स्टेट सेक्रेटरी देत नाहींत.

वर्तमानपत्राचा विलक्षण उद्योग.—हल्लींच्या चाललेल्या तुर्कस्थानच्या लढाईंत जागोजागच्या वर्तमानपत्रांचे बातमीदार गेले आहेत. त्यांजपैकीं डेलीन्यूजच्या बातमीदारानें प्लेवनाच्या दुसऱ्या लढाईबद्दल तार पाठविली तिजबद्दल पांचहजार रुपये खर्च झाला. व शिपकापासच्या लढाईबद्दल त्याहीपेक्षां अधिक खर्च झाला असें समजतें.

तुर्कस्थानच्या लढाई निमित्त रशियास दर आठवड्यास दोन कोटि रु० खर्च होतात असा अजमास आहे; यावरून आजपर्यंत सरासरी चाळीस कोटींवर खर्च झाला असेल असें दिसतें. ने. ओ.

दिल्ली एथें १ रुपयास गहू ८ व तांदूळ ११ शेर विकूं लागले आहेत व तेणेंकरून तेथील बाजारांत लूट झाली.

---

# धनी व चाकर यांजबद्दल कायदा.

आमच्या देशांत हल्लीं इतर सुधारलेल्या देशाचें अनुकरण अवश्य व अनावश्य, योग्यायोग्य अथवा उपयोगी गैरउपयोगी याचा विच्यार न करितां केलें जात आहे. युरोपांतील सुधारलेल्या देशांत कितीएक अडचणीमुळें किंवा तिकडील लोकांच्या स्थितीस अनुसरून कित्येक चमत्कारिक प्रकारचे कायदे व बंदोबस्त करावे लागतात. तसे या देशांत करण्याची अवश्यकता असो अथवा नसो त्याचा फारसा विच्यार न करितां एथें कायदे वगैरे करण्याचा क्रम चालला आहे. हल्लीं हिंदुस्थान सरकारानें धनी व चाकर यांबद्दल कायदा करण्याचें मनांत आणून त्याचा खर्डा गवर्नर जनरल यांच्या कायदे कौन्सिलापुढें सादर केला आहे. आतां या अशा कायद्याची एवढी कोणती जरूर होती हें आह्मास समजत नाहीं. युरोपांतील इंग्लंड, प्रशिया, वगैरे सुधारलेल्या देशांत या प्रकारचे कायदे आहेत ह्मणून तशा प्रकारचा कायदा एथेंही असावा ह्मणून तो करण्याचा विच्यार आमच्या सरकारानें मनांत आणिला असेल तर ती चूक आहे. तसेच युरोपियन लोकांची एतद्देशीय नोकर लोकांच्या वर्तणुकीविषयींची कुरकुर आहे ह्मणून त्याच्या मर्जीसाठीं हा कायदा करण्याचा बिच्यार असेल तर तोही प्रकार गैर आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं कारण युरोपांतील देशाप्रमाणें या देशांची व एथील लोकांची स्थिति नाहीं व थोड्याशा युरोपियन लोकांच्या कुरकुरीकरितां सर्व लोकांस अडचण करणें हें नीट नव्हें. त्यांतून प्रसिद्ध झालेल्या मसुद्यावरून हा कायदा मोठा घोटाळ्याचा व गोंधळाचा आहे असें दिसतें. आतां कायदाच करणें ह्मटलें ह्मणजे कायदा करणारांस सर्व एकपक्षीच विच्यार करतां येत नाहीं. तेव्हां हा होणारा कायदा धनी व चाकर या दोघांसही त्रासदायक होण्याचा विशेष संभव आहे. सदर्हू कायदा सर्व प्रकारच्या नोकर लोकांस लागू नसून फक्त घरगुती चाकरांकरितां आहे. हा कायदा पास झाल्यावर इलाख्याचे सरकार जाहिरनाम्यानें कांहीं प्रदेशाची हद्द ठरवून नोकर लोक नोंदण्याकरितां हपिसें नेमील. हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आंत जे लोक घरांत चाकर ठेवितात त्या सर्वांनीं आपल्या नोकर लोकांच्या नावांची यादी, त्याचें कामें व त्यास चाकरीवर ठेविल्याची तारीख सुध्दां लिहून त्या नोंदणीच्या हपिसांत पाठवावी. तसेच सर्व घरगुती नोकर लोकांनीं तीन महिन्याच्या आंत नोंदणीच्या आफिसांत रजिस्ट्रारपुढें हजर होऊन त्यांस पाहिजे असेल ती सर्व माहिती कळवावी. तो चाकर नोंदला जाऊन त्याची हकीकत नोंदली जाईल व त्यास एक नोंदणीबूक जवळ ठेवण्याकरितां दिलें जाईल. तसेंच ज्या मनुष्यास नोकर व्हावयाचें असेल आपलें नाव त्या हपिसांत नोंदवावें व त्यासही नोंदणीबूक मिळेल. आतां या प्रकारच्या नोकराचा सर्ववेळ यजमानाचा असें समजलें जाईल. या नोकरीच्या संबंधाच्या परिणामाचा सर्व धोका नोकरानें सोसला पाहिजे. त्या चाकरानें आपल्या यजमानाचे सर्व कायदेशीर हुकूम व त्याजकडून ज्या कोणास अधिकार असेल त्याचे हुकूम मानिले पाहिजेत. त्यानें आपल्या यजमानाच्या चाकरींत प्रामाणिकपणानें व हुशारीनें वागलें. पाहिजे चाकरानें आपल्या यजमानाशीं व त्याच्या कुटुंबांतील मंडळीशी त्यांची प्रतिष्ठा राखून व सन्मानपूर्वक वागलें पाहिजे. त्यानें आपल्या ताब्यांती यजमानाच्या सामानाचा जबाबदाराप्रमाणें सांभाळ केला पाहिजे. यजमानाच्या सामानाचे नोकराच्या हेळसांडीनें अगर गैरशिस्त प्रकारानें नुकसान होईल तें त्यानें भरून दिलें पाहिजे. दुसरे चाकर धन्याचें नुकसान करतील ते त्यानें न होऊं देण्याविषयीं सक्त प्रयत्न करावा. त्यानें आपल्या यजमानाच्या पैशाचा अथवा सामानाचा हिशेब वेळच्यावेळेवर न मागतां दिला पाहिजे. त्याप्रमाणें चाकराच्या वागणुकेविषयीं नियम त्या कायद्यांत आहेत याप्रमाणेंच धन्याच्या वागणुकेचे आहेत. त्यांत विशेषेंकरून धन्यानें नोकरास कामावरून दूर करी तोंपर्यंत नेमलेला पगार देणें, कोंडून वगैरे न ठेवणें, मारहाण न करणें, पगार न कापणें वगैरे नियम आहेत- परंतु हा इतक्या घोटाळ्याचा कायदा करण्याची कांहीं जरूर आहेंसें बाटत नाहीं. याजपासून विनाकारण धनी व चाकर या दोन्ही वर्गांच्या लोकांस अतिशय त्रास मात्र होण्याचा संभव आहे.

एतद्देशीय लोकांस व त्यांच्या स्वदेशीय चाकरांस एकमेकांशीं दांडग्या रीतीनें वागण्याची मुळींच सवय नाहीं आणि योजलेला कायदा युरोपियन व अमेरिकन नोकरांस लागू नाहीं. तेव्हां ज्यांची इच्छा असेल त्याच धन्यांनीं व चाकरांनीं याचा लाभ करून घ्यावा असें तरी या कायद्यांत एक कलम घातलें पाहिजे. याविषयींची तजवीज आमच्या सार्वजनिक सभांनीं जरूर व लवकर करावी नाहीं तर ज्यांस गरज नाहीं व ज्यांस त्यापासून किंचितही फायदा न होतां मोठा त्रास व नुकसान होण्याचा संभव आहे अशा हजारों गरीब गुरीब लोकांवर या कायद्याचें जोंझें पडणार आहे. सु. प.

---

नोटिस.

बापुन्या वलद भिका महार रहाणार कसबे हिवरखेडे परगणे अडगाव याजकडेस सावित्री मर्द बापुन्या महार रहाणार मौंने अकोलखेडें तालुके अकोट इजकडून देण्यांत येते ऐसिजे तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न होण्यास सुमारें १४–१५ वर्षे झालीं त्यांत पांचसात वर्षे तुझे आई बापानें मजला वागवून माझी नीट व्यवस्था ठेविली व पुढें सातआठ वर्षांपासून तुझे व आई बापाचे मनांत मजविषयीं कायें विपर्यास उत्पन्न झाला असेल हें मजला कांहींच कळत नसून माझी फार टाकसांड केली ती अशी की, मजला खाण्यास देखील पुरें मिळूं नये व मी गृहकृत्य संबंधी कांहीं जरी कामकाज चांगले प्रकारें केलें तरी तें तूं व तुझे आई बापाचें मनास न येऊन विनाकारण मजला अपशद्ब बोलून मारठोक करावी. व दोन दोन दिवस मजला उपाशी ठेऊन अन्न पाण्याशी गांठ पडूं देऊं नये. अशी बहुत प्रकारें जाचणी मजला केली अखेरीस माझी मरणोन्मुख अवस्था झाली हे हिवरखेडे एथील सर्व लोकांस माहित आहे. इत्यादि संकटाचा प्रसंग मजवर गुदरला तरी मी तुझे घर सोडिलें नव्हतें शेवटीं मी जात नाहीं असें तुह्मी पाहून सुमारें १॥ वर्ष झाले माझे आंगावरील डागिणे वगैरे सर्व हिसकाऊन घेतलें आणि मजला घराचे बाहेर काढून दिलें असा अखेरचा परिणाम तुह्मी केला व डागिणे काढून घेतले त्यांत माझे बापाचे एथील सरी चांदीची एक तोळे १२ ची व अर्शी चांदीची तोळे ३ व नथ सोन्याची मासे ६ ची व अंगुळदाणा चांदीचा तोळ्याचा असे ४ डागिणे होते तेही काढून घेतलें आणि तुझे बापाकडे आह्मी पाठवून देऊ ह्मणून मजला सांगून बाहेर घालविलें त्या दिवसापासून मी आपले बापाचे एथें निर्वाहा करून राहिली आहे. परंतु तुह्मी कोणीच आज पावेतों मजला घेण्यास आले असून तूं दुसरी बायको करण्याचा निश्चय केला असून सोयरीक झाली आहे असेंही माझे खास ऐकण्यांत आलें आहे. यावरून माझी तुजला आतां जरूर राहिली नाहीं असें मजला खचित दिसून आलें.

वास्तव हल्लीं या नोटिसीनें तुजला कळविण्यांत येते कीं, ही नोटिस पोचल्यापासून १५ दिवसांत तूं मजला दीड वर्षाचे खर्चाबद्दल ७५ व माझे बापाचे येथील डागिने काढून घेतले असे पाठवून देऊन मजला आपले येथें घेऊन जाऊन पंचानुमतें चांगलें प्रकारें नांदविण्याची तजवीज करावी अगर मजला सोडून दिल्याबद्दल फारकती लिहून द्यावी. जर या प्रमाणें न करशील तर पुढें तुजवर झालेले खर्चाबद्दल व माझे बापाचे डागिने घेतले आहेत त्याबद्दल या नोटिसीचे खर्चासह फिर्याद करून भरून घेईन आणि दुसरा घरठाव करण्याची तजवीज करीन हें पक्केपणें समजावे कळावे. तारीख २६ माहे सप्तंबर सन १८७७ इसवी.

( सही ) सावित्री मर्द बापुन्या महार राहणार अकोलखेडे तालुके अकोट निशाणी खुद हातची बांगडी.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.